म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2800



# उत्थानगुंफा

- यशवंत मनोहर

REFBK-0022625

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचनाः**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

27 JAN 1987

(क्र. मा. प.)

काव्य

22625
2400

REFBK-0022625

REFBK-0022625

# उत्थानगुंफा

यशवंत मनोहर

प्रबोधन प्रकाशन

प्रबोधन प्रकाशन–४
उत्थानगुंफा : यशवंत मनोहर
@ यशवंत मनोहर
आठ, हनुमाननगर, नागपूर–९.
पहिली आवृत्ती १५ ऑक्टोबर १९७७
किंमत १० रुपये
मुखपृष्ठ : भाऊ समर्थ
मुखपृष्ठ छपाई : खंडेलवाल प्रेस.
प्रकाशक : वामन निंबाळकर
४२६, इकबाल बंगला, छावणी, औरंगाबाद.
मुद्रक : भा. वै. वराडपांडे, तरुण भारत प्रेस, रामदासपेठ, नागपूर-१०

येथील ईश्वरशाही, अध्यात्म व कर्मविपाकशाही यांच्या नावाखाली शतकानुशतके चाललेल्या अमानुष शोषणाचा जळजळीत आयुष्याने मृत्युलेख लिहिणाऱ्या
**बाबासाहेब आंबेडकर**
नावाच्या सर्व दलितांच्या युगप्रवर्तक विद्रोहाला

आणि

माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदिविद्रोही कवी
**केशवसुतांना**

—यशवंत मनोहर

'जो जे होऊनी असे तेचि बोले.' हेच खरे. पुस्तकातील काही अभिप्राय याचा प्रत्यय देतील. निर्मळ मनाच्या रसिकांना सांगणे एवढेच, या कवीचा स्वत:वरचा विश्वास कुणापुढे शरण पत्करण्याकाठी जन्माला आला नाही –

# यशवंत मनोहरांची कविता : बाबुराव बागुल

यशवंत मनोहर यांची कविता म्हणजे अग्निप्रलय. ती क्रांतीसारखी भव्योदात्त आहे. हिंदु धर्म आणि त्याची वर्णव्यवस्था म्हणजे अवमान, तुच्छता, तिरस्कार, दुःख, यातना यांचा वाऱ्याएवढा व्यापक पसारा. या सर्वव्यापी विषवायुपासून थोडेसेही तोंड लपवायला एकही छत नाही. पंथ नाही. संत नाही. विचार नाही. करुणा नाही. काही काही नाही. फक्त बहिष्कार. फक्त तिरस्कार. त्याच्या प्रतिक्रियेतून एक महायुद्ध साकार झाले. आणि डॉ. बाबासाहेबांनी इतिहास घडविला. युग घडले. बाबासाहेब प्रेरणा, प्रकाश देणारे सूर्य झाले.

सिद्धार्थाला दुःख दैन्य दास्य दिसले अन् एक महान तत्त्वज्ञान, एक जीवनमार्ग जगाला मिळाला. मार्क्सला शोषण दिसले आणि एक समाजवादी शास्त्र उदयाला आले. आणि जन्मापासून विजय मिळवित त्याने अर्ध्या जगावर शासन सुरू केले. अन् ज्याच्या कानावर पडले त्याचे मनच व्यापून बसले. हे सारे लक्षात येताच यशवंत मनोहरांची कविता रूद्रसुंदर का आहे. क्रूरकोमल का आहे, क्रांतीसारखी भव्योदात्त का आहे, ती अंगावर अग्नीचे अलंकार का ल्याली आहे आणि तिच्या हातात वादळे अन् वणवे का आहेत ते मला कळले. ज्या वेदनेतून आंबेडकरी आंदोलन जन्मले अगदी त्याच जाणीवेतून, वेदनेतून यशवंत मनोहरांची कविता जन्म घेते.

जे दुःख, दैन्य, दास्य सिद्धार्थाला दिसले तेच दुःख, दैन्य, दास्य मनोहरांच्या कवितेने 'सम्यक दृष्टीने' पाहिले आहे. कार्ल मार्क्सला जे शोषण दिसले, त्याची कारणपरंपरा जाणवली अगदी तेच ज्ञान यशवंत मनोहर यांच्या कवितेला झाले आणि म्हणून त्यांची कविता क्रांतीसारखी भव्यादात्त झाली आहे.

मनोहरांच्या कवितेने आणखी एक पाहिले आहे. चंद्रावर माणूस गेला. चिमुकले व्हिअेतनाम एका कवीच्या पुढारपणाखाली विजयी झाले आहे. जीवन, शांतता, स्वातंत्र्याकांक्षा वसाहतवादी राष्ट्रांवर विजय मिळवित आहे. अफ्रो आशियाची राष्ट्रे विजयी होत आहेत. आणि स्वदेशमात्र एकाच वेळी दोन जगात, दोन शासनात वावरतो आहे. एक सत्ता आहे भांडवली लोकशाहीची आणि दुसरी आहे वर्णवादी मनुची. मनु आणि वर्णव्यवस्था सतत विजयी होत आहेत. कारण त्यांच्या पाठीशी अज्ञान आहे. आंधळे मन आहे. संस्कार आहेत. पक्षपाती संस्कृती आहे. देव आहेत. धार्मिक पुस्तके आहेत. ते लिहिणारे ऋषिमुनी आहेत. विषमतेवर आधारलेली ग्रामव्यवस्था व ग्रामअर्थरचना आहे. स्वर्गातील देवापासून मातीवरच्या संतमहंत आणि मूर्खांपर्यंत विषमतेचाच पुरस्कार करणारे आहेत. त्यामुळे कथा, दंतकथा, लोकगीते, वाक्प्रचार, म्हणी इ० जडवादी, समतावादी विचाराची निर्भत्सना करणाऱ्या झाल्या आहेत.

लोकशाही चालविणारी सारी मंडळी ही मनूने ज्यांना विशेष अधिकार दिलेले आहेत त्या वर्णातील आहे. म्हणून वर्णव्यवस्था उध्वस्त करणे त्यांच्या अहिताचे आहे. संकट आहे.

लोकशाही अशी कागदावर अन् वर्णव्यवस्था मन, समाज, संस्कृती, साहित्य, भाषा, अर्थरचना या सर्वांद्वारे अस्तित्वात असल्यामुळे सैन्य शिपायी प्रचाराची साधने हाताशी असूनही लोकशाहीवर मात करते आहे. वर्णव्यवस्था व लोकशाही ह्या स्वभावतःच परस्पर वैरी संस्था आहेत. त्या एकमेकीचा प्राण घेऊनच जगू, वाढू शकतात. त्यांच्यातील एकीचे मरण हे दुसरीचे जीवन आहे. पण भारतात ह्या दोन वैरी संस्थात संघर्ष वाढत न जाता समजदार शेजाऱ्याप्रमाणे त्या गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. अर्थ असा की भारतातील लोकशाही जनतेची नाही. वर्गाची आहे. आजचा प्रस्थापित वर्ग-वर्ण हा वर्णव्यवस्थेचा लाडका लेक आहे. तो सत्ता धर्मसत्ता यांचा

नियंता व साहित्याचा नायक होता. वर्णव्यवस्थेने दलिताचा निषेघ केला आहे. म्हणून वर्णव्यवस्थेचा व तिच्या समग्र आधारांचा विध्वंस झाल्याशिवाय दलितांना स्वातंत्र्य नाही.

या स्थितीत सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी सर्व बहिष्कृत जाती एकत्र आल्या पाहिजेत. आज आंबेडकरी चळवळ व डावी चळवळही वेग घेत नाही. पण हिंदुत्ववादी पुराणमतवादी प्रत्येक निवडणूकीत शक्ती वाढवीत आहेत. शासन यंत्रणा वर्तमानपत्रे साहित्य आणि उद्योग धंद्यांचे मालक त्यांना सर्व प्रकारे साह्य करीत आहेत. ते सत्तेवर यावेत असे प्रयत्न चालू आहेत. ते सत्तेवर आले आहेत. पण जगात ठायी-ठायी दलित श्रमिक विजयामागून विजय मिळवित आहेत. खेड्यापाड्यात दलित जनतेवर अत्याचार वाढत आहेत. भूकबळी, दारिद्र्य वाढत आहे. आदिवासी तर पाषाण युगात जगावेत तसे जीवन जगत आहेत. हे डोंगराएवढे, हे अरण्याएवढे विपूल व विराट प्रश्न यशवंत मनोहर यांना दिसत आहेत. कवी दुर्बळ असेल तर हे प्रश्न पाहून पळून जाईल. प्रस्थापिताला प्रिय होणारी कविता लिहिल. अथवा लिहिणारच नाही. विसरण्यासाठी वाटेल ती निमित्ते, मद्ये स्वीकारील. पण यशवंत मनोहर पळत नाहीत. अंधारात शिरत नाहीत. दु:ख देणाऱ्याला देवाधिदेव म्हणून पूजत नाहीत. ते सरळ मैदानात शत्रू समोर उभे राहतात. आणि आपली प्रज्वलीत प्रज्ञावंत आणि शूर कविता अस्त्राप्रमाणे शत्रूच्या अंगावर भिरकावून देतात.

मी विघ्नसंतोषी.
उतट समाधानाने मला पाहाविशी वाटतात
असल्या विषविलासाची चटपट मरणे
त्याच्यातील बाटग्या श्रद्धानिष्ठांसहीत
अवसानघातकी मूल्यपरंपरेसहित . . . '

कारण... 'ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले. कपटी चांडाळ ते आहेत. ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले'

'... त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो.' कारण
' ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली.
'... ते सर्व देवदैववादी माझे वैरी आहेत...'
'... ते शब्दप्रामाण्यवादी सगुणनिर्गुण वैरी आहेत. माझे...' म्हणूनच ते म्हणतात.

'मला मान्य नाही तुम्ही माझ्या पहाटेची आई म्हणून
मला मान्य नाही मी तुमचा कुणी नातलग म्हणून
मला मान्य आहे फक्त आता माझ्यापुढची अटळ युद्धभूमि
तिथे प्रथमच जमिनदोस्त होणारी तुमची संस्कृती तुमचा परमात्मा...'

यशवंत मनोहरांची कविता मेघासारख्या गुरुगर्जना करते. विजांसारखा कडकडाट, लखलखाट करते. मनोहर क्रांतीकारक कवी आहेत. ते निसरडी गूढ कविता लिहित नाहीत. 'फसवणूक' ही कविता असाच लखलखाट, कडकडाट करते. भारतात आणि हिंदू धर्मात जन्म घेतल्यामुळे जन्माचीच महाभयंकर फसवणूक कशी होते यांचे जळते चित्र काढते.

यशवंत मनोहर निष्ठावन्त पक्षधर आहेत. ते दलितांच्या बाजूचे आहेत. अस्पृश्यतेच्या ज्वलंत विरोधात आहेत. जे जडवादी आहेत. चैतन्यवादाचे विरोधक आहेत. ज्ञान विज्ञान निरीश्वर, अनात्म, गतीवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांची कविता म्हणूनच स्वप्नरंजन, मद्य देणारी

कविता नाही. ती शहाणपण व शस्त्रे देणारी आहे. जिथे कार्यकर्ता नसेल तिथे कार्यकर्ता होऊन कार्य करणारी, कार्यकर्ता, पुढारी निर्माण करणारी कविता आहे. मोर्चे काढणारी, लोकांना संघटीत करणारी कार्यक्रम देणारी कविता आहे. अशी कविता पाब्लो नेरुदाची आणि मायकोवस्कीची आहे.

गीतेतील कृष्ण जितक्या प्रमाणात 'मी' बोलतो त्यापेक्षा अधिक 'मी' मनोहर यांच्या कवितेत आहे. कृष्णाचा मी कौरवपांडव युद्धाला उभे असताना प्रकटला. मनोहर यांचा 'मी' वर्णविषमता दुःख दैन्य दास्य यांच्या विरोधात चालू असलेल्या संघर्षात प्रकटतो.

कौरव पांडवांपेक्षा श्रीकृष्ण मोठा आहे हे कृष्णाचा 'मी' सांगतो. मनोहरांचा 'मी' देव धर्म देशापेक्षा माणूस मोठा आहे हे सांगतो. मोठमोठी सिंहासने, संकल्पना तो उध्वस्त करीत आहे. निसर्गावर स्वामित्व मिळवीत, मरणावर मात करीत, अनेक क्रांत्यांना आपल्या रणपांडित्याने जिंकीत आहे. युगायुगाच्या सत्ताधाऱ्यांना तो धूळ चारीत आहे. या विश्वासातून, विसाव्या शतकातील माणसाच्या सर्वजयीत्वातून त्यांचा मी आलेला आहे. हा मी दीनदलितांच्या विश्वाचा उद्‌गार आहे.

मनोहर यांचा मी कृष्णाप्रमाणे आपले परमेश्वरत्व सिद्ध करण्यासाठी येत नाही. तर माणूसपण सिद्ध करण्यासाठी येतो. शब्दप्रामाण्यवाद, ईश्वरवाद माणसाला दुय्यमत्व देतो. हे दुय्यमत्व आंबेडकरी आंदोलनाची आग प्राशून आलेल्या बंडखोरांना अजिबात सहन होत नाही. वर्णव्यवस्थेने व मनुस्मृतीने चिरडून टाकल्याची ही तीव्र प्रतिक्रिया आहे. यशवंत मनोहर यांच्या 'मला पाहून आता' या कवितेतील 'मी' कृष्णाच्या मी' पेक्षा– विराटरूपापेक्षाही विराट आहे. वास्तव आहे. ही भयंकर कविता आहे. पण ह्या कवितेतील अहंकार केवढा मोठा ! हा येतो कोठून ? जगातील सर्वच क्रांतीकारी कवीच्या कवितेत हाच पर्वतप्राय अहंकार– 'मी' असतो. हा अहंकार ह्या युगाने, मार्क्सवादी सिद्धांतानी क्रांतीकारी कविना दिला असावा. या क्रांतीकारी कवितेत धन, व ईश्वर, सत्तांना ठोकरले आहे, अन् आपली समाजवादी सत्ता स्थापण्याचे स्वप्न बाळगले आहे. पूर्वी कवी प्रष्टा होता. आता तो क्रांतीकारक असल्यामुळे एक जगनिर्माता झाला आहे. आणि ही भावना पाठीशी असलेली -जागतिक जनता ही क्रांतीकारी कवितेची ताकद ठरली आहे.

मनोहर यांच्या कवितेत शौर्य निर्भयता क्रांतीकारी प्रखरता आणि या युगात चाललेल्या दलितांच्या मुक्तिसंग्रामाच्या विजयाचा विश्वास आहे. म्हणून त्यांची कविता प्रकाशाप्रमाणे स्वच्छ होते. डॉ. आंबेडकर, मार्क्स, बुद्ध, यांच्या विचाराप्रमाणे भाष्य होते. केशवसुती काव्य-परंपरेचा आजचा प्रखरतम टप्पा होते. विद्रोही काव्यपरंपरेचा कळस होते.

मनोहरांच्या कवितेला शास्त्रीय दृष्टीकोण लाभल्याने ती इतर कवितेप्रमाणे व्यक्तिशी न भांडता व्यवस्थेच्या विरोधात उठाव करते. त्यामुळे तिला विश्वात्मकताही येते. निग्रो, चिलीयन, आफ्रिकन, रशियन कविता जशी इथे कळते तशीच मनोहरांची कविताही जगातील कोणालाही कळेल. कारण क्रांतीत्व ही विश्वजाणीव आहे. मनोहर यांच्या कवितेत ही विश्वजाणीव पुरेपुर आहे.

विषमता घालविण्यासाठी अनेक ग्रंथ, देव, पिळवणूकीचा पुरस्कार करणारे अनेक सिद्धांत, चैतन्यवाद यांचा बळी द्यावा लागेल. त्यासाठी जडवाद सांगितला पाहिजे. मनोहर यांची विद्रोही वणव्यासारखी अग्निबंबाळ कविता विज्ञानाचा उद्‌गार आहे. जडवादाच्या दूधानेच ही प्रतिमा एवढी ज्वलज्जहाल झाली आहे.

नकार, विद्रोह, मानवमध्यवर्तीत्व, अनात्मवाद, अनिश्वरवाद, गतीवाद ज्ञानविज्ञान आणि त्यांच्या योग्य उपयोगासाठी सत्ता, अर्थसत्ताच दलितांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे आहे. हीच दलित जाणीव आहे.

'परमात्मा आमुचा शत्रु सर्व काळ
शोषकांचे बळ हेतुसिद्ध.'

'काळचा गोऱ्या साऱ्या वाळल्या पोटांनी
बेहिशेबी वन्ही व्हावे आता.'

'आणि पेरुन ठेवू येथील खोपटातील
यातनांच्या ऐतिहासिक अरण्यात विक्राळ विजांचे शिस्तशीर काफिले.'

'क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
आपण उद्याच्या सूर्याशी करू दोस्ती
आपण विजांशी करू गोष्टी, आपण नाचू वादळांच्या मोर्चात
उजेडाची आपण उभारू वस्ती.'

'माफ कर सिद्धार्था तुझ्या शत्रूंनी तुला दिलेल्या
पाखंडी या बिरुदामुळे तू मला अधिकच जवळचा वाटतोस
तू अनात्मवादी म्हणून माझा सोबती वाटतोस
निरीश्वरवादी म्हणूनच माझा साथी वाटतोस ?
'ज्योतिबा, तुझ्याही पराक्रमाच्या विजा आमच्या मनगटात सळसळत आहेत.'

'मार्क्स तुझ्या हृदयाचे वणवे
या कवितांच्या हाती मी दिले आहेत.

'अरे. या बेशरम अत्याचाऱ्यांना फाडतांना आम्ही विजयी होऊत
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस, कुठे ठेवलेस ?'

युद्ध अटळ आहे. क्रांती अटळ आहे. हा क्रांतीकारी कवी यशवंत मनोहर यांचा विश्वास आहे. क्रांतीची त्यांची हत्यारे-शब्द ते फार विचारपूर्वक वापरतात. हिन्दुवर्णवादी पुराणातून इतिहासातून कथाकाव्यातून आलेल्या प्रतिमा, प्रतिके, आदर्श, पुराणकथा, अलंकार, उपमा ते वापरत नाहीत.

जाणीव व अभिव्यक्ती यांचे अपूर्व दर्शन मनोहरांच्या कवितेत साकारले आहे. म्हणून ती इतर पुरोगामी क्रांतीकारी कवींच्या कवितांपेक्षा अधिक युगसमान्तर आहे. अधिक क्रान्तीपूर्ण आहे. म्हणूनच ती अहिन्दु आहे. म्हणून पूर्णपणे मानवी आहे. म्हणजेच दलित कविता आहे. म्हणून विश्वात्मक आहे.

दलित साहित्य नवे युग आणणारे युगकर्ते साहित्य आहे. ते विश्व साहित्य आहे. ईश्वर व त्याची पूजापद्धती धर्म इ. मुळे माणसे वेगवेगळी होतात. पण माणूस आणि व्यवस्था माणूस आणि निसर्ग असा पुढे आला तर तो विश्वमानव होतो. क्रांती येण्याआधी असे काही कवी, लेखक, बुद्धिवंत येतात. क्रांतीच्या आगमनाच्या शुभ वार्ता देतात. युरोप अमेरिकेमध्ये असे लेखक आले आहेत. रशियामध्ये तर केवढी मोठी परंपरा आहे. भारतातही ही क्रांतीची शुभवार्ता घेऊन दलित साहित्य येत आहे, मनोहरांची कविता याच युगंधर कार्यात अग्रभागी उभी आहे. यापूर्वि येवढे कलावंत दैन्य दास्य अस्पृश्यतेच्या विरूद्ध आपल्या ताकदी, लेखण्या

घेऊन सरसावले नव्हते. त्यांनी वर्णव्यवस्था व तिच्या वैचारिकतेविरूद्ध, मांडवलशाही विरूद्ध एवढा नकार-विद्रोह पुकारला नव्हता. तुक्या चोख्या ह्यांना दु:ख दैन्य देणारा दिसला काय ? तो त्यांनी नाकारला नव्हता. धर्म, सत्ता, अर्थसत्ता, कलासाहित्य, सौंदर्यशास्त्र, त्याचे आदर्श यांच्या विरूद्ध शूरपणे कुणी लेखक कवी बोलला नव्हता. परंतु दलित साहित्यातील लेखक कवी धर्म, सत्ता, अर्थसत्ता, नीती, संस्कृती, साहित्यसंकल्पना, मानसिकता या सर्व केंद्रांना बदलू पाहत आहेत. आणि दलिताला सत्तेचे संस्कृतीचे शासनाचे केंद्र करू पाहत आहेत. हे लेखक, कवी चाळीचाळीतून खेड्या-झोपड्यातून येत आहेत. क्रांतीची आवाहने करताहेत. नवे जीवन, नवा देश, नवा समाज उभारू बघताहेत. असे एवढे झपाटल्यासारखे मराठी साहित्य त्याच्या इतिहासात घडले नव्हते. कलावंत क्रान्तीत्वाने, क्रोधाने, कारुण्याने गद्‌गदून आपले अंत:करण घेऊन मैदानाकडे धावतो आहे. आपले मनोगत मैदानातील माणसाना सांगतो आहे. हे कशाचे लक्षण ?

क्रांती मनामनाचे दार ठोठावते आहे. शब्दात उद्‌गारात, कवितेत साकारते आहे. दु:खाचा दैन्याचा दवा क्रांती होते, बेकारी दूर करणारे स्वप्न क्रांती होते. अपमानीत जीवांना सन्मानीत करणारी शक्ती क्रांती होते. आशा, उत्साह, प्रकाश क्रांती होते तेव्हा त्या देशात क्रांती येणार असते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील साहित्य, क्रांती आधीचे रशियन साहित्य, पॅरिस कम्युन घडविणारे फ्रेंच साहित्य याला साक्ष देईल. मराठीत मनोहरांच्या कवितेत आज हीच साक्ष एका अजोडतडफेने आणि काव्यपूर्ण दर्शनातून पुढे आली आहे.

भारतातील चिरडलेल्या समाजातून दु:ख सांगत, संतापत, चिडत शिव्याशाप देत आणि क्रांतीला आवाहने करीत पक्षामागून पक्षी यावे, आकाशात ओळच्या ओळ लागावी, ढगामागून ढग यावे अन् आकाश गदगदून यावे तसे दलित साहित्यिक येताहेत.

यावरून नक्कीच म्हणता येते की युगारंभ होत आहे. क्रांतीची शुभवार्ता घेवून एकेक पक्षी, अेकेक ढग येतो आहे येवढे म्हणून आणि मनोहरांची कविता देऊन थांबतो.

'डोळ्यात तेल घालून भोवताल पाहा
नजरेतील क्षितिजे सांभाळा आणि ध्यानात ठेवा
माती ज्यांच्याजवळ आपली मनोगते मांडते
त्यांचा विचार उजेडाच्या युगासाठी कळस होत असतो.'

● ●

# प्रस्तावना

माझे कवीमित्र प्रा. यशवंत मनोहर यांची कविता चिकित्सक वाचकांना आता नवी राहिलेली नाही. गेल्या कित्येक वर्षांच्यापासून ती नियतकालिकांच्यामधून सारखी वाचकांच्या भेटीला येतच आहे. सर्वसामान्यपणे आणि स्थूलपणे मराठी साहित्यात जो प्रवाह दलित साहित्याचा प्रवाह म्हणून ओळखल्या जातो त्याचा भाग म्हणून आरंभी ही कविता पुढे आलेली आहे. पण आरंभीची काही पावले सोडली तर या कवितेत दलित म्हणावे असे फारसे काही आढळत नाही. एका दलित समाजातील कवीने आपले सुखःदुख कवितेतून मांडावे असे या कवितेचे स्वरूप नाही. ती कविता दलित असल्याच्या पेक्षा विद्रोही जास्त आहे. आणि परंपरागत समाजरचनेच्या विषयी वाटणारा आत्यंतिक शोक व त्यातून निर्माण झालेली विद्रोहाची जाणीव ही अशी बाब नाही की जिचा दलितांशीच संबंध आहे. दलितांच्या मनात विद्रोह असेलही पण विद्रोही मन असणे ही दलित असण्याची अपरिहार्य खूण नाही. आणि जे दलित नाहीत त्यांच्यांही मनात विद्रोहाची ज्वाला अतिशय उग्रपणे प्रगट झालेली आढळेल; कारण विद्रोहाचा संबंध नेहमी एका वैचारिक जाणिवेशी असतो. समाजाच्या कोणत्या थरातून तुमचा उदय होतो आहे, या वस्तुस्थितीवर विद्रोह अवलंबून नसतो. विद्रोहाचे एक सामर्थ्य जे आहे त्याला ठाम नकार देण्यात आणि कोणते तरी भव्य स्वप्न आपल्या मनात बाळगून त्या स्वप्नाचा पाठलाग करताना बेभानपणे वाळवंट तुडवण्यात असते. यशवंत मनोहरांची कविता ही मुख्यत्वे करून विद्रोही कविता आहे. आजही दलित साहित्याचा भाग म्हणून जर कुणी या कवितेकडे पाहणार असेल तर तो या कवितेच्या आनुषंगिक अशा पैलूचा एक मागोवा आहे असे म्हणावे लागेल.

मला स्वतःला दलित साहित्याचा विचार करीत असतांना ही विद्रोहाची जाणीव जास्त महत्वाची वाटते. या जाणीवेचा नेमका असा धागा आपण जर मान्य केला नाही तर नानाविध प्रकारचा घोटाळा होण्याचा संभव असतो. दलित समाजात जे साहित्यिक जन्मले, मग ते कवी असोत, कथाकार असोत वा नाटककार; कादंबरीकार असोत, हे लेखक एका विशिष्ट समाजात जन्माला आले म्हणून जर त्यांचे साहित्य आपण दलित मानू लागलो तर कांही अडचणी येतात. दलित समाजातील काही लेखक फक्त स्वप्नाळू आणि रंजनप्रधान असे वाङमयच लिहित बसले. हे वाङमय मनोरंजन आणि करमणूक करण्यासाठी म्हणूनच लिहिलेले असते. ते तसे लिहायलाही हरकत नाही. पण ज्या वाङमयाचा हेतू स्वप्नरंजन आणि मनोरंजन इतकाच आहे किंवा जे वाङमय कलात्मक असले तरी व्यक्तीचो व्यक्ति म्हणून असणारी सुखःदुखे रंगविण्यात गुंतलेले असते ते वाङमय दलितांचे वाङमय म्हणण्यात कांहीच अर्थ नाही. दलित साहित्याचा आधार एखाद्या जातीत जन्माला

येणे हा नसतो तो आधार सामाजिक जाणीवेत शोधला पाहिजे. या उलट दुसऱ्या बाजूने दलित साहित्याचा विचार करताना अजून काही अडचणी व गुंतागुंती निर्माण होतात. लेखकाची जन्मकुंडली न पाहता लेखक ज्यांच्या जीवनाचे चित्रण करतो त्या आधारे दलित साहित्याची कल्पना स्पष्ट केली जाते.

ज्या वाङमयात दलिताच्या जीवनाचे चित्रण असते ते वाङमय दलित साहित्य म्हणून स्वीकारावे, अशी ही भूमिका असते. कैं. श्री. म. माटे यांना आद्य दलित साहित्यिक मानण्यामागे हीच कल्पना आहे. एक व्यापक कल्पना म्हणून हिचा स्वीकार अधून-मधून करायलाही हरकत नाही पण खरा प्रश्न दलितांच्या जीवनाच्या चित्रणाचा नाही. खरा प्रश्न आहे कोणत्या जाणीवेतून या जीवनाचे चित्रण होते हा. हे चित्रण जर अनुकंपेचे हळवे रंग घेऊन येत असेल आणि कुणाला फक्त अनुकंपेचा विषय झालेले गांजलेपणच जाणवत असेल तर अशा साहित्यिकांनी तेही चित्रीत करायला हरकत नाही. शेवटी कलावंताने कशाचे चित्रण करावे आणि कोणत्या दृष्टिकोनातून चित्रण करावे हे ठरविण्याचा त्या कलावंताचा अधिकार आपण मान्य केलाच पाहिजे. पण मला स्वतःला अधिक आस्था असेल तर ती दलितांच्या जीवनाच्या चित्रणाविषयी नाही. ती दलित साहित्यात जो विद्रोही प्रवाह आहे त्या विद्रोही प्रवाहाविषयी मला जास्त आस्था आहे. या विद्रोहाच्या जाणीवेला समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने जे महत्व आहे त्याची मातब्बरी कवितेच्या क्षेत्रात मी सांगत बसणार नाहीं. पण कवितेच्याही क्षेत्रात जेव्हा विद्रोहाची भावना एक वाङमयीत रूप म्हणून आविष्कृत होते तेव्हा त्या साहित्याच्या सामर्थ्याच्या-मुळे या जाणीवेचे वाङमयातील मोठेपण सांगणे भाग असते.

हे विद्रोही जाणीवांनी भारलेले साहित्य दलितसाहित्यच मानले पाहिजे असा आग्रह मी धरणार नाही. पण वाङयमीन परंपराच्या विरुद्ध बंड करून उठण्याच्यापेक्षा सर्व गुलामांच्या गुलामगिरीविरुद्ध बंड करून उठणे ही गोष्ट मला महत्वाची वाटते. कारण ज्यावेळेला आपण सर्वच गुलामांच्या गुलामगिरीविरुद्ध बंड करतो त्यावेळी पर्यायाने आपण सर्वांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कारही करीत असतो. ललित वाङमयात ही एकच जाणीव व्यक्त व्हावी दुसरे कांही व्यक्तच होऊ नये असा हट्ट मी धरणार नाही. पण त्याबरोबरच ही सामाजिक विद्रोहाची जाणीव वाङमयात येऊच नये असा एकारलेपणा करणेही मला समर्थनीय वाटत नाही.

एखाद्या व्यक्तिने जे जे पटत नाही त्याविरुद्ध बंड पुकारणे यापेक्षा सामाजिक जाणीवेतून येणारा, जीवनमूल्यांची नवी आस्था असणारा विद्रोह हा काहीसा निराळा असतो. प्राध्यापक मनोहरांची कविता ही सामाजिक जाणीवेतून येणारा विद्रोह व्यक्त करणारी अशी चिंतनशील कविता आहे. आणि चिंतनशील कवितेच्या बाबतीत त्या चिंतनाने वाङमयात रूप कोणते धारण केलेले आहे हे पाहणे जसे महत्वाचे आहे तसे ते चिंतन पाहणेही महत्वाचे आहे, असे मला वाटते. विद्रोह ही

जाणीव सार्वत्रिक आहे. ती जशी दलितांच्या पुरती मर्यादित नाही तशी विसाव्या शतकापुरतीही मर्यादित नाही आणि भारतपुरतीही मर्यादित नाही. ही सार्वत्रिक जाणीव कैक शतकांपूर्वी होऊन गेलेल्या भारतीय चार्वाकात आणि भारताबाहेर झालेल्या मार्क्ससारख्या विचारवंतातही आढळते. या सार्वत्रिक जाणीवाचे जे आविष्कार मानवी संस्कृतीत व्यक्त झालेले आहेत त्या सर्वांशी आपले नाते काय ? हा विचार विद्रोही कविंना कधि ना कधि करावाच लागतो. प्राध्यापक मनोहरांच्याही मनात हा विचार येऊन गेलेला आहे. चार्वाकांशी आपले नाते काय ? मार्क्स आणि बुद्ध यांच्याशी आपले नाते काय ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न या कविने केलेला आहे. विद्रोहाची जाणीव हाच जिचा स्थायीभाव आहे अशी कविता जर प्रा. मनोहर लिहित असतील तर त्या कवितेचे आकलनही याच संदर्भात करणे भाग पडणार आहे.

आपल्याला मागचे काही नको, तुमचा देव नको, धर्म नको, परंपरा नको हे जे जे परंपरेने चालत आलेले आहे ते सगळेच मोडून टाकण्याजोगे, दहन करण्याजोगे आहे असे विद्रोही मनाला वाटणे स्वाभाविक आहे. विद्रोहाचे सामर्थ्यच या तडजोड नाकारणाऱ्या प्रवृत्तीत असते. जे आहे त्याची सुधारणा अशक्यच आहे असे मानूनच विद्रोह विकसित होत असतो. पण मागची सर्व परंपरा नाकारायची असे म्हणत असतांनाच परंपरेचे काही अवशेष विद्रोही अंदोलनात दबा धरून बसत असतात आणि ते वेळेवर डोके वर काढतात. विद्रोहाच्या सर्व आंदोलनांना जर विकृत वळण लागले असेल तर त्याचे महत्वाचे कारण दबा धरून बसलेले परपरा प्रेम अनपेक्षितपणे बलवान होते या ठिकाणी शोधावे लागते. समतेच्या सर्व चळवळी क्रमाक्रमाने एका गटाचे वर्चस्व नाकारून दुसऱ्या गटाचे वर्चस्व स्थापन करणाऱ्यात होतात. कारण आपल्या जातीचे प्रेम संपतच नाही. एका अंधश्रद्धेविरूद्धचा विद्रोह दुसऱ्या अंधश्रद्धेचे दास्य पत्करून विश्रांती घेतो कारण मनाचा श्रद्धाळूपणा संपतच नाही. अधश्रद्धेविरूद्ध बंड करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांविषयीची बुद्धीवर मात करणारी श्रद्धा मधेच कुठेतरी उफाळून येते. हे सर्व मनाच्या परंपराप्रियतेचेच भाग आहेत. मानव जातीच्या सगळ्या इतिहासात विद्रोहाचा शाब्दिक जयजयकार करणाऱ्या परंपरावाद्यांनीच विद्रोहाच्या खऱ्या जाणीवेचा पराभव केलेला आहे. हा महापुरूष सोडून त्या महापुषाला शरण जाणाऱ्या मंडळींना लागलेली स्वातंत्र्याची आच व तहान कितीशी समृद्ध मानावी? याचीच मला शंका आहे.

फ्रेंच राजक्रांतीतील एक गोष्ट अतिशय प्रसिद्ध आहे. क्रांतिकारकांनी माता मेरीचा पुतळाच उखडून टाकला होता आणि त्या ऐवजी तर्काच्या देवतेची स्थापना त्यांनी केली होती. माता मेरी गेली आणि तर्क देवता आली पण लोक जर तर्काच्या देवतेला मुले वाचावीत म्हणून नवस करू लागले तर मग नेमके बदलले काय

हा प्रश्न चिंतेचा होऊन जातो. देवतेचे नाव आणि रूप बदलले म्हणून अंधश्रद्धेचा पसारा बदलत नसतो. मानवी मनातील परंपरावाद किती चिवट आहे आणि फसवी रूपे धारण करण्याचे त्याचे सामर्थ्य किती विविध प्रकारचे आहे या विषयी पुरेसी जागरूकता नसणे हाच आजवर विद्रोहवाद्यांचा अपराध ठरत आलेला आहे. मला आस्था विद्रोहाविषयी आहे, विद्रोहाचे नाव घेऊन झेंडे बदलून गर्जत जाणाऱ्या परंपरावादाविषयी मला फारशी आस्था नाही. प्रा. मनोहरांच्या कवितेतील उग्र विद्रोही जाणीवेकडे मी याच दृष्टीने पाहतो.

यादृष्टीने मला त्यांनी व्यक्तिना अभिवादन करणाऱ्या ज्या कविता लिहिल्या आहेत त्या महत्वाच्या वाटतात. प्रा. मनोहरांनी चार्वाकांना अभिवादन केले आहे. चार्वाकाने वेदांच्या प्रामाण्याविरूद्ध बंड पुकारले ही गोष्ट फारशी महत्वाची नाही. भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास असे सांगतो की सर्वांनीच चार्वाकाचा शक्य तितका कठोर निषेध केलेला आहे. चार्वाक वेदांत्याना अप्रिय होते हे खरेच आहे पण वेदांताचे जे प्रसिद्ध प्रतिपक्षी सांख्य यांनाही चार्वाक अप्रियच होते. वेदप्रामाण्या-च्या विरोधी चार्वाक होते म्हणून सर्व वैदिकांना ते अप्रिय होते यात नवल नाही, नवल आहे ते हे की अवैदिकांनाही चार्वाक अप्रियच होते. ग्रंथप्रामाण्य मानणाऱ्या सर्वांच्याच विरोधी चार्वाक होते. म्हणून वेगवेगळे ग्रंथ प्रमाण मानणारे एकमेकांचे जेवढे वैरी नव्हते तेवढे सर्वजण मिळून चार्वाकांचे वैरी होते. चार्वाक विचार ही एक प्रवृत्ती आहे. सर्वच धर्मांना आधार असणाऱ्या ग्रंथप्रामाण्याच्या विरोधी उभी असणारी, पुराव्याच्या विरूद्ध जाणाऱ्या सर्व श्रद्धांच्या विरूद्ध जाणारी अशी ही प्रवृत्ती आहे. एका श्रद्धेच्या विरोधी दुसरी श्रद्धा घेऊन उभे राहणारे लढवय्ये चार्वाकांचे मित्र नसतात. चार्वाकांचा प्राय: पराभवच होत आला आहे. कारण माणसांना कोणत्या तरी श्रद्धेच्या आहारी जाणे आवडते. चार्वाकांचा विजय ही फार कठीण गोष्ट आहे. अतिप्राचीन युगात जेव्हा विज्ञानाचा फारसा विकासच झाला नव्हता तेव्हा चार्वाक पराभूत झाला पण जेव्हा विज्ञान अणि तंत्रज्ञान येवढे विकसित झाले आहे तेव्हा तरी चार्वाक विजयी होणार आहे काय ? कारण चार्वाकाना आपले डोके मनुला विकणे मान्य नाही. हा सत्याचा एक भाग आहे. पण बुद्ध असो, मार्क्स असो, महमद असो कि महावीर असो कुणालाच चार्वाक आपली बुद्धी विकण्यास तयार नाही. चार्वाक सतत पराभूत होत राहिले आणि तरीही चार्वाकांची धास्ती सतत राहिली यातच त्यांच्या भूमिकेचे मोठेपण आहे. कारण सर्वांच्याच सर्व विद्रोही जाणीवेचा चार्वाक हा गाभा असतो. चार्वाकाशी आपले नाते सांगतांना यशवंत मनोहर आपल्या विद्रोहाची जातकुळीच तपासून पाहत आहेत, असे मला सारखे वाटते. कारण चार्वाकांच्या विषयी कमालीचे ममत्व माझ्या मनात आहे. शब्दांचे सर्व खेळ चार्वाकांच्या समोर उघडे पडतात.

जगाची अडचण ही आहे की चार्वाकांच्या विरुद्ध केव्हाही झुंडीचे बळ उभे करता येते आणि या झुंडी पुष्कळदा चार्वाकाचा जयजयकार करीतच मोठ्या उल्हासाने त्याला दफन करण्यासाठी नेत असतात.

भारतातील विद्रोही जाणिवेला अनेक पदरी अस्तित्व आहे. या अनेक पदरांच्या पैकी आर्थिक आणि सामाजिक असे दोन पदर महत्वाचे आहेत. जी विशिष्ट समाजरचना भारतात आहे तिचा पाडाव आर्थिक परिवर्तनाशिवाय शक्य होईल असे मानणे म्हणजे स्वत:ची वंचना करून घेणे आहे. म्हणून विद्रोही जाणिवेला मार्क्सशी आपले नाते सांगता आलेच पाहिजे. पण भारतातील समतेचा प्रश्न केवळ आर्थिक नाही तो आर्थिक आहे तसा सामाजिक आहे. आर्थिक प्रश्न सुटला तरी सामाजिक प्रश्न सुटेलच असे नाही. सामाजिक विषमतेच्या जाणीवा मनात अगदि बद्धमूल आहेत. म्हणून विद्रोही जाणीवेला महात्मा फुले आणि आंबेडकर यांच्याशीही आपला सांधा जोडता आला पाहिजे. मार्क्स, फुले आणि चार्वाक यांच्या भूमिकेचा समन्वय करणारे विद्रोही आंदोलन उभे करता येईल काय? हा आमच्या समाजासमोरचा अजून न सुटलेला प्रश्न आहे. यशवंत मनोहरांच्या सारखे कवी निदान हा समन्वय साधण्याची गरज आहे या जाणीवेशी प्रामाणिक राहून त्या प्रकाशात आपली वाटचाल करण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक आंदोलनांच्या प्रवर्तकांना अजून उत्कटतेने ही गोष्ट जाणवलेली दिसत नाही. निदान आपल्या काव्यजीवनात विद्रोही जाणीवेचे हे सर्व धागेदोरे एकमेकांत गुंफण्याचा आग्रही प्रयत्न व्हायला पाहिजे तरच ती खऱ्या अर्थाने उत्थानगुंफा होईल एरव्ही सर्व विद्रोह कोणत्या तरी एकारलेपणाच्या आहारी जावून वेगवेगळ्या दिशेने जीवदान देण्याचा संभव असतो.

म्हणून कवीने व्यक्तिना जी अभिवादने केलेली आहेत त्यांचा रोख आपण नीट समजून घेतला पाहिजे. कार्ल मार्क्सला अभिवादन करतांना प्रा. मनोहरांच्या डोळ्यांसमोर मनु उभा असतो. मनुचा पाडाव जर करण्यात यश येणार असेल तरच भारताच्या संदर्भात मार्क्सच्या अभिवादनाला अर्थ असतो. खरे म्हणजे मार्क्सही धर्मपरंपरांचा विरोधकच होता. विषमतेवर आधारलेल्या सर्वच परंपरावादाचा मार्क्स हा विरोधक होता. चार्वाकांच्या मध्ये जी वर्माची उणीव होती ती उणीवच मार्क्सने भरून काढलेली आहे. चार्वाक हे एका अर्थी आमच्या समाजसुधारकांचे पूर्वज होते. समाजव्यवस्था न बदलता धर्मश्रद्धेवर आघात करता येईल असे मानणे किंवा अर्थव्यवस्था न बदलता समाजव्यवस्था बदलता येईल असे मानणे फोलच असते. नागवे हे नागवे राहतील, दरिद्री हे दरिद्री राहतील, सधन हे सधन असतील तरीही माणूस समता आणि बंधुता विकसित करू शकेल असा भ्रम न कळत सुधारकांच्या मनात होता. अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था यावर मूलगामी आघात न करता धर्मश्रद्धेचा आपण पाडाव

करू असे चार्वाकांनाही वाटत होते. मार्क्सने चार्वाकांच्या विद्रोहातील ही वर्माची जागा सांधून दिलेली आहे. ती सांधताना मार्क्स ही मानवी मनातील जाणीवांचा चिवटपणा किती दीर्घजीवी असतो याचे भान विसरलेला दिसतो.

ज्यावेळी आपण समाजव्यवस्थेचा पाया अर्थव्यवस्था आहे हे विसरूनच जातो आणि अर्थव्यवस्था न बदलता विषम समाज रचनेत समता निर्माण करता येईल असे समजू लागतो त्यावेळेला एक फार उशीरा लक्षात येणारा अपयशी मार्ग आपण स्वीरलेला आहे याची जाणीव होऊ लागते. समाजव्यवस्थेचा पाया अर्थरचना आहे हे सत्य नोंदवणारा मार्क्स काही पहिला माणूस नाही. मार्क्सच्या पूर्वी राष्ट्र सधन, श्रीमंत करावे यासाठी म्हणून राष्ट्रीय संपत्तीच्या वाढीचा शोध घेणारे विचारवंत होऊन गेले. अगदि जुन्या काळात जरी आपण गेलो तरी कौटिल्यासारख्या जाणत्या विचारवंताला लोकव्यवहाराचा पाया अर्थव्यवहार आहे हे जाणवत होतेच. कौटिल्याने धर्म आणि काम अर्थमूलक असतात असे मत दिलेले आहे. अर्थरचनेचे हे मूलगामी महत्व अनेकांना जाणवत होते पण त्यांना प्रस्थापित हितसंबंध उचितच वाटत होते ते त्यांना दृढ, बळकट करायचे होते. मार्क्स आणि कौटिल्य यांच्यात साम्य हे आहे की दोघांनाही जीवनाची अर्थमूलकता कळत होती. फरक इथे आहे की सत्ताधारी वर्गाचे हीतसंबध जतन करण्यासाठी कौटिल्य प्रस्थापित अर्थव्यवस्था सुव्यवस्थित करु पाहत होता. आणि मार्क्स सर्व दरिद्रयांना जीवनाचे नवे दालन उघडावे म्हणून अर्थरचना बदलू पाहत होता. सर्वांना स्वातंत्र्य आणि समता हवी असेल तर अर्थरचना बदलावीच लागते आणि जेव्हा अर्थरचना बदलते तेव्हा तिच्यावर आधारलेली समाजरचना बदलूनच जाते. पण अर्थरचना बदलल्यानंतर समाज आणि मन बदलायला किती दिवस लागतील ? या गणिताचे उत्तर ताबडतोब असे देता येत नाही. हळू हळू दमाने असे याचे उत्तर आहे. आणि समाजव्यवहारात हळू हळू दमाने हा सहजच कांही शतकांचा काळ असू शकतो.

मानवी मनातील परंपरावाद हा अतिशय बलवान आहे. कोणे एके काळी वन्य अवस्थेत असणारे वृक्षपूजक समूह बदलतात पण वृक्षपूजक समूह बदलले आणि सुसंस्कृत समाज अस्तित्वात आले म्हणजे वृक्षपूजा संपेलच याची खात्री नाही. आधुनिक मनाला समर्थनीय वाटतील अशा नव्या कथा जुन्या प्रथांना चिकटतात आणि मग जुनी वृक्षपूजा नव्या कथेसह वडाच्या पूजेत रुपांतरित होते. शहरे वाढतात, वड मिळेनासा होतो तेव्हा झाडाच्या ऐवजी फांदी चालते. जिथे वड असेल तिथे जाऊन पूजा करण्याऐवजी जिथे पूजा करणारे असतील तिथे वडाची फांदी घेऊन जाणारे पुरोहित जन्माला येतात. आणि शेवटी वडाच्या झाडाचे चित्र तर काढता येतेच. उपयोग संपून गेलेल्या प्रथा शतकानुशतके मनाला तशाच चिकटून राहिलेल्या असतात. कालबाह्य झालेले

धर्म आपला काळ संपल्यावर शतकानुशतके मनावर प्रभाव गाजवितच राहतात आणि हा प्रवाह इतका मोठा असतो की आपल्या इहलौकिक प्रश्नाला उत्तर या धर्मात नसेल तर त्या धर्मात सापडेल असा मोह थोरामोठ्यांना वाटतो. मनाचा हा चिवटपणा लक्षात घेऊन आर्थिक परिवर्तनाच्या कार्यक्रमाबरोबर सामाजिक परिवर्तनाविषयीसुद्धा आग्रही भूमिका घेणे भाग असते कारण या मुद्यावर जर थोडासा ढिलेपणा झाला तर मार्क्सची चळवळ सुद्धा मनूला फार लवकर हादरा देऊ शकत नाही.

बाबासाहेब आंबेडकरांना या बाबतीत फार कटू अनुभव घ्यावे लागले. मजुरांच्या संपात आर्थिक मागण्यांच्यासाठी सर्व मजुरांच्या बरोबर राहावे अशी त्यांचीही इच्छा होती. पण त्याकाळी बॉबीनच्या खात्यात अस्पृश्यांना नोकऱ्या मिळत नसत. हा विभाग दलितांच्यासाठी मोकळा व्हावा असा आग्रह धरण्यास कम्युनिस्ट तयार नव्हते कारण त्यांना सवर्ण हिंदू मजूरांचा पाठिंबा यामुळे गमवावा लागेल अशी धास्ती वाटत होती. आणि पगारवाढ मात्र मिळेल पण अस्पृश्यता कायम राहील अशा चळवळीत रस घेण्यास बाबासाहेब तयार नव्हते. विद्रोहाची जाणीव नुसती सर्वांगिण असून चालत नाही. विशेषत: मागासलेली मने असणाऱ्या देशात विद्रोहाचा कार्यक्रम एकाचवेळी सर्व आघाड्यांवर तीव्र आणि उग्र असावा लागतो.

यासाठी विद्रोहाची घोषणा करणाऱ्या मनाचा परंपरावाद आधि गळून पडावा लागतो. सर्वच गुलामांच्या बाजूने आणि गुलामगिरीच्या सर्व प्रकारांच्या विरोधात बंडखोरास एकावेळी बोलण्यास तयार व्हावे लागतें. मी दलितांच्या पुरते बोलतो पण दरिद्र्यांच्या पुरते बोलत नाही, हिंदू समाजातील अस्पृश्यतेविषयी बोलतो पण मुस्लिम समाजातील स्त्रीदास्याविषयी बोलत नाही आणि शहरांच्याविषयी बोलतो पण खेड्यांच्याविषयी बोलत नाही अशाप्रकारची वर्गवारी विद्रोहात नसते अशा वर्गवारीतून जे आपल्या कक्षा ठराविक करून घेतात ते समतेच्या शत्रूंना दबा धरून बसण्यासाठी कांही बुरुज सुरक्षित ठेवीत असतात. आणि तुम्ही शत्रूंना विसावा घेण्यासाठी जर गढ्या सुरक्षित ठेवणार असाल तर त्यांचा पराभव कठीण असतो. विद्रोहाची ही सर्वकष जाणीव नव्या जीवनाचे एक सर्वव्यापी चित्र डोळ्यांसमोर ठेवित असते. शेवटी चिंतनशील कवितेत चिंतन कशाचे आहे ? त्याचा व्याप किती आहे ? आणि हे चिंतन भावनेची उत्कटता घेऊन किती प्रभावी झाले आहे ? हेच मुद्दे महत्वाचे ठरणार. म्हणूनच मनोहरांच्या कवितेकडे वळण्यापूर्वी विद्रोहाविषयी मला काय म्हणावयाचे आहे त्याची थोडीफार कल्पना द्यावी लागली.

अशा या विद्रोही कवींना केशवसुतांचे स्मरण करणे भागच असते. निदान मराठीत तरी केशवसुत हा विद्रोहाचा पहिला प्रतिनिधी आहे. आपण कवितेचे

हत्यार घेऊन रणमैदानावर उभे आहोत याचीही त्यांना जाणीव होती. आणि आपली कविता भांडणासासाठी आहे हेही ते जाणत होते. आपले शब्द कठीण गोटे आहेत, त्यांनी आपण हाणाहाण करतो आहोत, भूतकाळाचे वैभव गाणाऱ्या आणि वर्तमान अध:पतनात निर्मितीची क्षमता संपलेल्या रुद्धगतिक पंढ परंपरेशी आपले वैर आहे याची त्यांना पक्की जाणीव आहे. ज्या रणांगणावर आपण उभे आहो त्या रणांगणावर विजय सहजासहजी होणार नाही. गतशतकांची घोर पापे धुण्याच्यासाठी रक्तच द्यावे लागेल याचीही जाणीव असणारा असा हा नव्या काळच्या, नव्या आशेची शिपाई म्हणून द्वाही फिरविणारा एक विद्रोही कवी होता. आजच्या वंडखोरांना या जुन्या वंडखोराची आठवण येणे अगदि स्वाभाविक आहे.

ज्या वेळी प्रा. यशवंत मनोहर केशवसुतांच्याविषयी विचार करतांना असे सांगतात की हाती येईल ते हाणून इथे असणाऱ्या काळोखाशी तू धगधगत्या वनव्यासारखा भांडलास, त्यावेळी त्यांच्यासमोर एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी उभे असणारे केशवसुतच फक्त असतात असे नव्हे ते स्वत: ही आपण काळोखाशी भांडतो आहोत या जाणिवेने पेटून उठलेले असतात. मनामनातल्या मनुच्या डोक्यावर पोलादाचा पाय देऊन परंपरेच्या तक्ताच्या ठिकऱ्या उडविणारे केशवसुत नसतात त्यात कवीच आपले प्रतिबिंब पाहत असतो. विद्रोहाच्या केशवसुतांनी उभारलेला तळचावर आपण नतमस्तक होण्यासाठी जातो, हे सांगतांना कवी नेहमीच सर्व विद्रोही जाणीवांचे आपण वारस आहोत हे सांगत असतो. केशवसुत काय कि फुले आणि आंबेडकर काय, मार्क्स असो की भगवान बुद्ध असो ज्या विद्रोहाच्या ज्वालेचे ते प्रतिनिधी होते त्या ज्वालेचा वारसा सांगणारे, या जाणीवेची पूजा व्यक्तिचे निमित्त पाहून करीत असतात. शेवटी व्यक्तिपूजेला जर विद्रोहाच्या जाणीवेच्या पूजेचे रूप नसेल तर मग होऊन गेलेल्या नेत्यांच्यावर उधळलेली स्तुती सुमने आपल्या जखमांना औषध म्हणून फारसे उपयोगी पडत नाही.

या ठिकाणावर प्रा. मनोहर अतिशय सावध आहेत. महात्मा फुल्यांना अभिवादन करणारी त्यांची कविताच त्या थडग्यावर विजलेली ध्वजा पुन्हा चेतवून आपल्या खांद्यावर घेण्याची भाषा बोलते. परंपरेला जशी परंपरा असते तशी विद्रोहालाही परंपरा असते. शतशतकांचा साठलेला कचरा कोणीही महापुरूष एका पिढीत नष्ट करू शकत नसतो म्हणून विद्रोहाचाही इतिहास महत्वाचा असतो. कवी म्हणतो आमच्या उत्थानाच्या इतिहासालाही हृदय आहे. काळजांना आग लागल्याशिवाय हात तलवारी होत नसतात आणि पायाखालची जमीन पेटल्याशिवाय नवे पीळ उफाळून येत नसतात. ज्योतिबांचे नेमके मोठेपण कवीने जाणलेले आहे, महाराष्ट्रातील समाज सुधारकांत महात्माफुले हे आद्यकर्ते सुधारक होते हे त्यांचे वर्ण अपुरे आहे. तसेच पाहिले तर काळाच्या ओघात एकूण भारतीय संदर्भात राजा राममोहनराय ज्योतिबांच्या आधी येतात आणि महाराष्ट्राच्या

संदर्भात जरी पाहिले तरी लोकहितवादीचे चिंतन ज्योतिबांच्या आधी आहे. लोकहितवादींनी फारशी कृती कधी केलीच नाही. पण राजा राममोहनराय हे कृतिशील सुधारक होते. खरा प्रश्न आधि आणि नंतर हा नाही. कृतिशील असणे आणि नसणे हाही खरा प्रश्न नाही. खरा प्रश्न जाणीवेचा आहे. राजा राममोहनराय काय किंवा लोकहितवादी काय यांना जाणवते ते असे की आपल्या समाजात अज्ञान फार वाढलेले आहे, घातक अशा रूढी बलवान झालेल्या आहेत या रुढींचा पाडाव करून नव्या सुधारणा आत्मसात केल्याशिवाय आपल्याला तरणोपाय नाही. या मंडळींनी दोष परंपरेच्या प्रवाहात साठलेल्या अज्ञानाला आणि नकळतपणे निर्माण झालेल्या त्या अडाणीपणाच्या अभिमानाला दिला आहे. जुने राजा राममोहनराय मधले लोकहितवादी आणि नवे न्यायमूर्ती रानडे अडाणीपणाच्या विरूद्ध लढत आहेत. ज्योतीबांचा सर्व दृष्टिकोनच याहून भिन्न आहे. समाजरचनेत हीतसंबंधियांनी केलेले लबाडी व क्रूरता जाणवलेला हा पहिलाच आर्ष ओबडधोबड क्रांतिकारक आहे.

समाजाची रचना हीतसंबंधाच्यावर आधारलेली असते आणि म्हणून या समाजव्यवस्थेत वरीष्ठ वर्गीयांनी लादलेली आणि जाणीवपूर्वक लादलेली गुलामगिरी आहे. मागासलेपणा आणि अज्ञान हे या समाजरचनेचे रहस्य नव्हे तर ते रहस्य गुलामगिरी आणि शोषण यात आहे म्हणून हा प्रश्न चालिरिती बदलण्याचा नाही सगळी रचनाच उलथीपालथी करून नव्याने मांडण्याचा आहे हे ओबडधोबडपणे का होईना पण उत्कटतेने जाणवलेला हा आमच्याकडचा पहिलाच महापुरूष आहे. इतिहासाचे संधीसाधू सांधे खिळखिळे करून वर्तमानाची क्षितिजे परंपरेच्या बंदिवासातून सोडवित आलेला एक प्रकाश हे ज्योतिबांचे वर्णक अधिक अचूक म्हटले पाहिजे.

प्रा. यशवंत मनोहर बाबासाहेब आंबेडकरांचा विचार कसा करतात हेही एकदा पाहण्याजोगे आहे. कवी स्वत:ला आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य समजतो. पण त्याबरोबरच त्याला कांही गोष्टीचे भान आहे. बाबासाहेबांनी आणलेले निधी हे आपल्या हातून हरवून गेलेले आहेत हे त्याला जाणावते आहे. म्हणून बाबासाहेबांना अभिवादन करतांना तो आपण हरवले काय याचे चिंतन करीत असतो. लक्तरलेली आयुष्ये शिवणारा सुई दोरा हरवलेला आहे. ज्याची 'भक्ति' करावी असे इमान हरवलेले आहे, सागरासारखं प्रचंड शहाणपण हरवलेले आहे, असत्याला तुडवणारे कठोर निर्णयशास्त्र हरवलेले आहे, मनुच्या मुलांना माणूस होणे भागच पडेल अशी घटना हरवलेली आहे, कर्मविपाकाला मूठमाती देणारी युगदर जिद्द हरवलेली आहे, अत्याचार करणाऱ्यांना पराभूत करणारे विजांचे शस्त्रसाठे हरवलेले आहेत. कवीने विचारलेले नाही पण आपण हे विचारले पाहिजे की जर हे सगळेच हरवले असेल तर मग नामघोषा पलिकडे

शिल्लक काय राहिलेले आहे ? एका कवितेत कवी म्हणतो, त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतांना सुद्धा आता अपराध्यासारखे वाटते कारण गरजणारे सूर्यसंदेश आपणच मोहल्या मोहल्यात दफन केलेले आहेत. गावकुसाबाहेरची आपली घरे गावात शिरतांना आपणच परतवून गावाबाहेर आणीत आहोत. सूर्याने आग ओकावी ते व्यासपीठ हिजड्यांच्या हवाली करणाऱ्यांना इतिहास निर्दयतेने लाथा घालीत असतो. ज्यांच्या म्यानातून फक्त शब्दच बाहेर पडत असतात त्यांना युगाचा जरासंध चिरता येत नाही. अजून एका कवितेत कवी म्हणतो, दिशांच्या या आंधळ्या घरास पुन्हा एकदा दिवा दाव. तुझ्या वाटेवरची झाडें पुन्हा कैदी झालेली आहेत, तू ज्यांना उजेड दिलास त्यांची गावे अनाथ होऊन गेली, मुद्दाम या सगळ्या बाबी नोंदवण्याचे एक करण 'आहे ते कारण असे आहे की कवी हा व्यक्तिना अभिवादन करतांनाही जाणीवांचे चिंतन करतो आहे. इकडे लक्ष वेधावे.

सर्वांच्या विषयी थोडे थोडे सांगून झाल्यानंतर प्रा. मनोहरांनी महात्मा बुद्धाच्याविषयी जे लिहिले आहे तिकडे डोळेझांक करणे बरोबर होणार नाही. कारण सिद्धार्थ गौतमही शेवटी कवीच्यासाठी एका जाणीवेचाच प्रतिनिधी आहे. सिद्धार्थ गौतमबुद्ध हा एका राजाचा मुलगा होता ही गोष्ट कवी विसरून जाण्यास तयार आहे कारण बुद्ध जे जीवन जगला त्या जीवनाने त्याच्या जन्मकुलाचा प्रश्न निरर्थकच करून टाकला आहे. बुद्ध हा दलितांना एक प्रकाश होऊन आला, त्याने मरणासन्न उजेडाला फाशीच्या तक्तावरून सोडवले हे सगळे खरे, पण बुद्धाची पाठ फिरल्याबरोबर त्याच्या विचाराच्या पराभवाची पाने त्याच्याच रक्ताने लिहून टाकली. शेवटी नेत्यांचा पराभव करण्याचे सामर्थ्य त्याच्या अनुयायाच्या ठिकाणी जेवढे असते तेवढे इतरांच्या ठिकाणी कुठून असणार? कवी हा भगवान बुद्धाला भगवान म्हणू इच्छित नाही जो स्वत: नास्तिक होता आणि अनात्मवादाचा प्रवक्ता होता त्याला त्याच्या अनुयायांनी जर भगवान मानले असेल तर हे अनुयायी बुद्ध या व्यक्तीचे अनुयायी म्हणावे लागतील ते बुद्धाच्या विचाराचे शत्रूच होत. महान प्रज्ञाशाली, महान करुणाशाली पण एक माणूस म्हणूनच कवी बुद्धाचा विचार करु इच्छितो. त्याला 'भगवान' ही शिवी वाटते. हे भिकूंनो मी जे सांगतो त्याचा विचार करा, त्याची परीक्षा करा आणि जर माझे म्हणणे पटले तर ते पटले म्हणून स्वीकारा, माझ्या गौरवासाठी काहीही मान्य करु नका, कांही स्वीकारू नका असे सांगणारा सिद्धार्थ माणूस असतो, तो माणसांच्या विचाराला आवाहन करणारा विवेकवादी असतो. एकदा या बुद्धाचा 'भगवान' करुन टाकला आणि एकदा या क्रियेत यश आले म्हणजे मग हीतसंबंधीयांच्या हीतसंबंधांना मरण नसते. विष्णू हा तर राजाच. तेव्हा त्याची वैभवशाली मंदिरे पुरोहितांच्या राजविलासाचा आधार होतात. पण शंकर स्मशानवाशी आहे म्हणून काय झाले? त्याच्याही नावाने संस्थाने उभी

करता येतात. बुद्धाचा भगवान झाल्यानंतर पुरोहितशाहीला मरण नसते फक्त देवतेचे नाव बदलेल, शोषकाचा वेष बदलेल, शोषणाच्या करवतीचे दात बदलत नसतात.

मला या कवितेतील चिंतनाचा एक झपाटा मोठा अर्थपूर्ण वाटला. मनोहर हे शेवटी कवी आहेत. माझ्यासमोर कविता उभी असली तरी इतिहासाचा पुरावाही उभा असतो. इच्छा असो वा नसो हा पुरावा टाळता येत नसतो. गौतमाच्या मुखमंडलावर असणारी चिरशांती हे एक विवाद्य ठिकाण आहे. बुद्धांच्याकडे दोन दृष्टीने पाहता येते तो वैराग्यशाली तपस्व्यांचा सम्राट आणि तृष्णेचा कंद छेदणारा, सदेश देणारा संत म्हणूनही पाहता येते. हे जगच दु:खमय आहे म्हणून जगाचाच त्याग करणाऱ्या व इच्छेचे मूळ उपटून टाकणाऱ्या अनासक्त संताजवळ जी शांती असावी ति बुद्धाच्या चेहऱ्यावर दिसते पण जगाच्या दु:खावर उपाय म्हणून इच्छाच सोडणारा संत दलितांना काय देऊ शकेल. ज्यांच्याजवळ कांहीच नाही पण ज्यांना कांही मिळविण्याची इच्छा आहे त्यांना आकांक्षाही सोडण्याचा उपदेश मुक्तीचा कोणता मार्ग दाखवील? याविषयी मलाही शंकाच आहे. करुणा या शब्दाचा अर्थ जर दया आणि अनुकंपा असा आपण करणार असू तर मग हे सांत्वन दु:खाचे मूळ संपवू शकेल असे मला वाटत नाही. अनासक्तीचा उपदेश ज्यांना आसक्ती वाटण्याजोगे हीतसंबंध आहेत त्यांना पटतच नसतो आणि उरलेल्यांना या उपदेशाचा उपयोग नसतो. जर करुणा या शब्दाचा अर्थ सामाजिक दु:खाचे मूळ छेदून टाकण्यासाठी विद्रोहाला प्रवृत्त झालेल्या क्रांतिकारकाच्या मनातील सर्व दु:खितांच्या विषयीचे प्रेम असे आपण करणार असू तर ती करुणा विजांच्या कडकडाटांपेक्षाही गर्जत येणारी वादळाच्या स्वरुपाची झपाटून टाकणारी करुणा असते. या करुणेच्या सम्राटाच्या अंत:करणात जे वादळ उफाळलेले असते त्या वादळाचे प्रतिनिधीभूत मुखमंडल म्हणून त्या प्रेपिताच्या चेहऱ्याकडे पाहिले पाहिजे. बुद्ध जर सर्व शोषितांचा त्राता असेल तर मग त्याच्या चेहऱ्यावरील भाव करुणाजन्य विद्रोहाचे असले पाहिजेत. मग त्या मुखमंडलावरील चिरशांती भाविकांची भाकडकथाच मानली पाहिजे. खरा प्रश्न अडीच हजार वर्षांपूर्वी इतिहासात होऊन गेलेला बुद्ध कसा होता हा नाही, आज जे लक्ष लक्ष अनुयायी बुद्धाकडे त्राता म्हणून पाहतात त्यांना बुद्ध म्हणजे कोणती जाणीव वाटते हा आहे. मनोहरांनी सहजगत्या या ठिकाणावर अचूक बोट ठेवलेले आहे.

माझे मित्र यशवंत मनोहर एक प्रश्न विचारित नाहीत. पण मी तो माझ्या स्वत:च्या मनाला सदैव विचारित आलो आहे. चार्वाक आणि बुद्ध होऊन गेले, विषमता तशीच राहिली. महात्मा फुल्यांच्या पासून बाबासाहेबांच्या पर्यंत एक लाव्हा चौरस फेकला गेला आणि आज परंपरेची भूमी तडकली किती?

हे आपण पाहू लागलो तर पुन्हा निराशाच पदरी येते. विद्रोहाच्या जाणीवेला असे वारंवार पराभूत का व्हावे लागते? अनुयायीच नेत्यांचा पराभव का करतात? बंडखोरांचे नवे देव होतात आणि त्यांचा प्रकाश पुन्हा चोरांनाच नवी संधी मिळवून देणारा ठरतो असे का होते? खरोखरच गुलामांना मुक्तता नको असते काय? पिडितांना दु:खावर उतारा नको असतो काय? मग विद्रोह पेटून का उठत नाही? सर्व ठिणग्या विझल्यासारख्या का होतात? सगळ्या ज्वाला चित्रातल्या वन्ही सारख्या दिसायला भडक आणि स्पर्शाला शितळ अशा का होऊन जातात? विद्रोहाचे चिंतन करणाऱ्यांनी हाही प्रश्न कधी स्वत:ला विचारायला पाहिजे की नाही?

विद्रोहाचे सर्वच प्रयत्न आजतगायत विफल होत आलेले आहेत. पण ते विफल होतात म्हणजे वाया जातात असे मात्र नाही. त्यांना जेवढे यश यायला पाहिजे तेवढे येत नाही. जो आधीचा जोम त्या चळवळीत शिल्लक राहिला पाहिजे तो राहत नाही. अपेक्षेइतका बदल होत नाही पण बदल होतोच. प्रत्येक चकमक थोडा थोडा विजय मिळवित पुढे जाते. समाज बदलतच असतो म्हणून विद्रोहाला अर्थ असतो. असे जर नसते आणि बंडाच्या प्रत्येक प्रकरणाला संपूर्ण अपयश येऊन जर समाज तसाच परिवर्तन न होता शिल्लक राहिला असता तर काळाच्या ओघात सगळेच निर्जिव झाले असते. फार तर जनावरांचे जग शिल्लक राहिले असते. कै. माटे यांनी मोठा मार्मिक उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात, सगळेच कावळे कावळे असतात पण त्यांच्यात प्रतवारी नसते. कावळे समुहाने जगतात पण त्यांचा समाज नसतो. त्यामुळे त्यांच्यात गुलामगिरीही नसते. माणसांचा समाज असतो, माणसात प्रतवारी असते हेच मुळात एक परिवर्तन आहे. संस्कृतिविहीन पशूंच्या समूहापासून आरभ करून पूर्ण सुसंस्कृत अशा मानव समाजापर्यंत मानवी संस्कृती जाते हा सगळा प्रवास जनावराच्या समतेपासून माणसांच्या समतेपर्यंत चालू असतो. या प्रवासात पहिले परिवर्तनच गुलामगिरीच्या रूपाने येते. इथून परिवर्तने होतच असतात. शेवटचे परिवर्तन सर्वांच्या स्वातंत्र्याच्या रूपाने सिद्ध होईल तो क्षण अस्तित्वात येई पावेतो विद्रोहाची गरज असते.

ही विद्रोहाची जाणीव निरनिराळ्या मान्यतांना नकार देत येते. जीवनाची नग्नता झेंड्यासारखी हाती घेऊन आजवरचे वदनिय हिशोब नाकारावे लागतील हे कवीने सांगितलेलेच आहे. भारतीय परमात्म्याने घोषित केलेल्या गुलामगिरी सारखी जीवनातील सर्व षंढ तत्त्वज्ञाने नाकारावी लागतील परमात्मा नेहमीच गुलामगिरी घोषित करीत आला आहे. मग तो भारतीय हिंदूचा परमेश्वर असो की हिब्रू भाषेतून बोलणारा ज्यू ख्रिश्चनांचा परमेश्वर असा, अगर अरबीतून संदेश पाठविणारा मध्य आशियातला परमेश्वर असो. भारतीय परमेश्वर आपल्याळा जवळचा फार म्हणून त्याने घोषित केलेली गुलामगिरी आपण

नित्य भोगतो ती अनुभवानें जाणतो उरलेल्या परमात्म्यांची ओळख आपली इतकी घनिष्ट नसते. कारण ज्ञात असणारे सर्वच भगवान जनतेला कल्याणाची ग्वाही देत गुलाम करीत आले. अडचण या भगवानांची नाही कारण ते गुलाम करतात हे आपल्याला माहिती आहे. अडचण परमात्म्याच्या दास्याविरूद्ध वंड करणाऱ्या नास्तिक जडवादांची आहे. कारण तेही कल्याणाच्या नावाने धर्माला शोभून दिसेल अशी गुलामगिरी आणित असतात. जे ईश्वराच्या नावे बोलतील ते गुलाम करतील इतके सत्य उघडे आहे पण जे ईश्वराच्या नावे बोलणार नाहीत ते स्वतंत्र करतील ही हमी मात्र देता येणार नाही. माणसाला स्वतंत्र करणारा हवा असतो आणि दुसरा कोणी आपल्याला स्वतंत्र करू शकत नाही.

प्रा. मनोहर विचारतात सर्वच वेरजा कशा होऊ शकतात ? कांही कटू भागाकारही करावे लागतात. हे अगदि बरोबर आहे. भूतकालात होऊन गेलेले सर्वच थोर मोठे लोक जर जनतेच्या स्वातंत्र्याचे कैवारी मानले तर माणसाच्या जातीला गुलाम करणारे वास्तव कोणी निर्माण केले ? आणि ते जतन तरी कोणी केले ? सर्वच जर लोककल्याणाच्या इच्छेने प्रेरित झालेले असतील तर गुरांच्या बाजाराप्रमाणे माणसांचे बाजार या देशात एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भरत होते, त्या प्रथा सुरू कोणी केल्या ? अडाणी पायावर उभे सर्वच शतकांचे आंधळे मजले एकदा अग्निसंस्काराने तपपुत करून घ्यावे लागतात. उगीचत दीर्घजीवी ठरलेले सन्माननीय आशय नव्या ज्ञानाच्या चाळणीने चाळावे लागतात. जे मृत झालेले आहे ते उगीच श्रृंगार म्हणून जतन करण्याच्या ऐवजी नष्ट करावे लागेल. जीवंतांना जीवंत राहण्याच्यासाठी मृतांचे सर्व शेजार नाकारावे लागतात. अगदि साधेसुधे गद्य आतल्या आवेगाने स्वत:ची लय सांभाळणारे काव्य कसे होते याचे ही कविता एक चांगले उदाहरण आहे. म्हणून एक निषेधनामा कवीला घोषित करावाच लागतो. जातांना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन असे कवी सांगतो. गप्प बसणे हे अत्याचार करणाऱ्यांना फार मोठे आश्वासन असते. सहन करणे आणि गप्प बसणे जोपर्यंत चालू आहे. तो पर्यंत जुलुमाला कधी शेवट नसतो. माणूस वाईट नसतो, वाईट असते ती व्यवस्था. माणूस क्रूर नसतो तो दयाळू आणि प्रेमळच असतो पण स्वत:ची सोय सांभाळणारी व्यवस्था तो मोठ्या अभिमानाने आदर्श न्याय म्हणून जतन करीत असतो. आपली सोय मोठ्या प्रेमाने जतन करतांना इतरांचे जीवन तो उजाड करतो, स्वत:वरच्या प्रेमाखातर तो अगदि उल्हासाने क्रूर होतो. आपली बाजू न्याय्य आहे असे जोपर्यंत माणसाला वाटते तो पर्यंत त्याला पश्चाताप होण्याचे तरी काय कारण आहे ? इतरांच्या द्वेषातून माणूस क्रूर आणि सूडघेऊ होतो पण अशी ठिकाणे फार थोडी. स्वत:विषयीच्या प्रेमातून माणूस जितका क्रूर होतो तितका इतरांच्या द्वेषातून तो क्वचितच क्रूर होतो. माणसाच्या दयेला स्वार्थाची

मर्यादा असते म्हणूनच बोलणे भाग असते. जे गप्प बसण्यास आणि सहन करण्यास शिकवितात त्या सर्वांशी माझे वैर आहे असे केशवसुतच म्हणून बसले आहेत. अशावेळी निषेध नोंदविणे, निदान विरोधाचा उच्च स्वर जागा ठेवणे हेच एक महत्वाचे काम असते. हा पसारा मोडता आला आणि नवीन जग मांडता आले तर ते हवेच असते. पण निदान निर्भयपणे या पसाऱ्याला शाप देता आला पाहिजे.

येतांना उत्तरे घेऊन आलो होतो, जातांना प्रश्न घेऊन निघून जाईन ही भूमिकाही अत्यंत महत्वाची आहे. कारण परंपरेजवळ सर्वच प्रश्नांची सोपी उत्तरे आहेत. माणूस दरिद्री का? कारण गतजन्मी त्याने पाप केले होते. नालायक लोक वैभवात का? कारण गतजन्मी त्याने पुण्य केले होते. आजही सज्जनांच्या नशिबी अवहेलना का? कारण ते प्राक्तन भोगून संपवित आहेत. व पुढच्या जन्मासाठी पुण्य शिल्लक टाकीत आहेत. अशा सगळ्याच प्रश्नांची सोपी उत्तरे देणे विषमतेला दैवी मानणाऱ्या समाजात मोठे स्वाभाविक वाटते. हे उत्तरे नाकारून न सुटणारे नवे प्रश्न निर्माण करणे हेच बंडखोराचे किमान काम असते. प्रत्येकालाच प्रश्न सोडवता येतील असे नाही पण निदान उत्तरे नाकारावीत आणि छातीशी प्रश्न कवटाळून मरावे इतके तर जमायला हवे? निष्पर्ण जंगलात सगळे आयुष्य गेल्याच्या नंतर पदरात पाचोळा घेऊन डोंगर कपारीतून वेड्याप्रमाणे हिंडतांना एवढे तर लक्षात यावे की प्रेमळ आमंत्रणे देत आहेत त्या सर्व अंधाराच्या निर्लज्ज गुहा आहेत. या शतकाना ज्यानी दास्याचे समर्थन केले त्यांना कोणत्या सबबीवर क्षमा करता येणार नाही हे अगदि उघडे वागडे सत्य.

डोळ्यांच्या या खाचात फक्त सूर्यास्तांची रांग लागलेली आहे. शतकांचे आढावे घेऊन झाले तरी त्यात सूर्योदय कुठे दिसलाच नाही. दलितांच्यासाठी सगळा इतिहास एक स्वयंसिद्ध स्मशानच होते. कबधांच्यावर सावली धरील असा एकही तुकडा मौजुद नव्हता. सगळा जन्मच त्यामुळे बेईमान झालेला, अशावेळी मरत मरत जगावे कसे एवढेच फक्त विचारता येत असते. बहिष्कृत पर्वताच्या दूभंगलेल्या कड्याप्रमाणे जिथे सगळे अस्तित्व ओसरत असते त्याला दिलासा नुसता शब्दांचा जरतारी साज देत नसतो.

अशावेळी काय आठवावे यालाही अर्थ नसतो, सगळेच वाळवंट तृपेसारखे कासाविस असते. जर सगळेच ओसाड वैराण असेल, जर सगळेच मुकाट गुदमरलेले असेल आणि आठवणीसुद्धा जर फक्त आयुष्यावर निखारेच पसरल्यासारखे होत असतील तर मग आठवणी तरी कशाला करायच्या? ही मोहरून आलेली झाडे विषाची आहेत आणि राने छिनाल आहेत हे जाणवल्याच्या नंतर श्वासावर पसरणाऱ्या वर्फाला काय मागावे! आणि या अंधार कोठडीचे उपकार तरी काय सांगावेत? दिसणाऱ्या सर्व समुद्रांना जर ओहोटी लागली असेल आणि रक्तात काळोखच नाचत असेल तर कोणत्य क्षितिजाला आपण इमानी सूर्य मागावा?

असा हा सर्व नकार देता देताच कवी हा नव्या आशेचाही हुंकार जागवित असतो. क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांना तो प्रथमच सांगतो की, मातीच्या पायात ज्वाळांचे चाळ बांधले पाहिजेत. कधी नव्हे असे आभाळ जर आज भरून आले असेल तर स्मशानेही पेटावीत येवढा विद्रोहाचा पाऊस आपल्याला पाडता आला पाहिजे. इथून पुढे निदलेल्या ओठांतून सूर्यकुलांची लागवड आपल्याला करावी लागेल पण त्यासाठी हे लक्षात ठेवावे लागेल की कालचे कुठलेही शतक आपल्याला मूठभर प्रकाश देऊ शकणार नाही. जे वृक्ष पानाच्या वैभवाने हिरवळले नाहीत, ज्यांच्या अंग प्रत्यंगातून फुलाचे चांदणे उधळले नाही त्या अन्यायग्रस्त झाडांच्या साक्षीच आपण काढण्यात अर्थ नसतो. वेळोवेळी इतिहास गिरकी घेतो आणि मूळपदावर येऊन तेच आख्यान सुरू करतो हे पुन्हा घडू नये म्हणून पडीत जनिनीच्या नजरेत जी स्वप्नें रांगू लागलेली आहेत ती जतन करतांना शब्दांना खिडारे पडणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागेल. दगड हाताच्या दिशेने झेपावत नसतात हाताची वाट पहात बसलेले असतात. अशावेळी कवींना आपल्याच डोळ्यांच्या पेटत्या चुलीत जळून उजळावे लागते. हाडांच्या हुड्यावर जळणारा बेचैन दिवा आपल्याच हिरमुसल्या रक्ताचा आहे हे मान्य करून खचून न जाता जीवाची काहिली शब्दात ओवावी लागते.

आणि मग एका बाजुला वारंवार झालेल्या विद्रोही प्रयत्नात घायाळ झालेले अस्तित्व सावरावे लागते. आणि दुसऱ्या बाजुला स्वप्नातच विजयानंतरचे निर्मळ आकाश पहावे लागते. इतिहासाच्या गळ्यात माळा झालेले क्षण अंधश्रद्धांच्या गळ्यात पडून रडत आहेत. कृतकृत्य गटारांचे थवे भोवताली हसताहेत याची स्वच्छ नोंद घेऊनही उद्याची सकाळ पाहण्याइतके मन अपराजित असू द्यावे लागते. हे सगळे कुणाच्या द्वेष मत्सरामुळे नसते. आजचे सगळेच राग लोभ उद्याला येणाऱ्या जगात जे समतेने माणसे म्हणून जगतील त्यांच्या कौतुकासाठी असतात. ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देऊन ज्यांच्या श्वासाला दिशा नाहीत त्यांच्यासाठी ही कविता गायची असते. कारण ही कविता म्हणजे शब्दांची पूजा नाही. ती उद्या उदयाला येणाऱ्या नव्या माणसाची आरती आहे. या नव्या माणसांच्यासाठी झाडाना पुष्प पिसाऱ्यांच्या चमत्काराची सिद्धी मागावी लागते आणि आकाशातील नक्षत्रांना स्वतंत्र सुगंधी रांगोळी मागावी लागते. कंठासाठी भयमुक्त गाणे आणि मोहरणाऱ्या पायासाठी उजेडाची उजाड न होणारी वाट मागायची असते हा सगळा उद्याचा ऊज्वल भविष्यकाळ साकारणार आहे काय ? त्या विजयाच्या नि:शंक खात्रीवरच विद्रोह उभा असतो. म्हणूनच कवी अतिशय मोकळेपणाने हे सांगू शकतो की, तुमचा सर्वशक्तिमान परमात्मा माझ्या संतप्त पायावर नम्र डोके ठेऊन माझी क्षमा मागणार आहे.

प्रा. यशवंत मनोहर यांच्या विद्रोही कवितेचे स्वरूप थोडक्यात हे असे आहे. एक जळजळीत चिंतन कवितेच्या पातळीवर साकार करण्याच्या धडपडीत यशस्वी,

अयशस्वी होणारी, कधि मुठीत जाळ धरणारी तर कधि त्या प्रयत्नात ठेचाळणारी अशी ही कविता आहे. या कवितेला केवळ कविता म्हणून पाहता येणार नाही ती कविता म्हणून पाहावी लागेल तसे ते उग्र उत्कट चिंतन म्हणूनही पहावे लागेल. या आपल्या चिंतनाला समर्थ प्रतिमांची त्यांनी जोडही दिलेली आहे. चिंतनशील कवितेतील चिंतनाला भावोत्कट पातळीवर नेणारी प्रतिमासृष्टी सुद्धा निराळीच असणार. कुठे उन्हाचे ससंदर्भ कळप दिसतात तर कुठे आचके देत मरणारे, शब्दातल्या सुगंधाला वनवास देणारे लूत भरलेले आसमंत दिसते. डोळयांपुढून सरणांचे पूर वाहत जातात, ओठ विजा ओकणारे असतात, ज्वालांच्या धगधगत्या पारावर आपल्या वाटा आपणच बांधलेल्या असतात. अंधार गुहांचे महासागर समोर दिसत असतात शेजारी रक्तातल्या गायी हंबरत असतात. ज्या जन्माने फसवणूक केली त्याची कहाणी सांगावे म्हटले तर ज्यांना सांगायचे त्यांची भाषाच येत नाही. अस्तित्वाचा कापूस पिंजून काढणारी एकेक क्रूर धनुकली अध्यात्मात दिसायला लागते. कुठे आभाळच चिध्यानी बनलेले असते. नासक्या शब्दांची आर्ष पठारे उगीचच कुणी खांद्यावर ओझे म्हणून देतो. धूर्त शतकांच्या जंगलात भावडी स्वप्ने बेपत्ता होतात. अंगावर दुःखाचे थर घेऊन पालथी नगरी जगण्यातून नित्य उगवते आहे, आपले उब्द तडफडते आहेत म्हणून ते प्रक्षिप्तच आहेत की काय असे वाटू लागते, कुठे पर्वतच बहिष्कृत असतात ही यादी अजूनही पुष्कळ लांबवता येईल. मुख्य प्रश्न प्रतिमांची यादी करण्याचा नाही तर आपल्या उग्र व्यथेला कवितेच्या पातळीवर नेणाऱ्या समर्थ प्रतिमा घडविण्याच्या त्या क्षमतेचा आहे. यशवंत मनोहरांच्या रूपाने सर्वंकष विद्रोहाची उत्कट गाणी गाणारा एक समर्थ बंडखोर कवी कवितेच्या दालनात ज्वालांचे निःश्वास फुंकीत येत आहे हे अग्निनृत्यही मोठे स्तिमित करणारे आहे. एक चिंतन म्हणून हे विद्रोही गाणे मोलाचे आहेच. पण निळसर काळसर अशा धुराने भरलेल्या वातावरणातील भडक लाल आणि केशरी ज्वालांचे नर्तन कविता म्हणूनही मोठे विलोभनिय आहे. या नव्या समर्थ कवीचे स्वागत करतांना आपण आपल्या मित्राचेही स्वागत करीत आहोत, एका सहधर्मी प्रवाशाचेही स्वागत करीत आहोत ही जाणीव मला आनंदायक वाटते. या कविता थंड पडलेल्या मनाला काही ऊब देओत आणि ऊब असणाऱ्या मनाला पेटून उठण्याची इच्छा देओत एवढी शुभेच्छा विद्रोहाला पुरेसी असते.

—नरहर कुरुंदकर

आभाळाचे कडू तोंड चुकवतो म्हटले तरी जमत नाही
हे इथल्या माडांनाही चांगले माहीत आहे
सोडतो म्हटले तरी सोडवत नाही भूई
हा इथल्या गडागडाचा अनुभव आहे.
कितीतरी तुटले तारे जेव्हा मी धडपडलो
अडलो पावलोपावली
झडलो जशी ग्रीष्मात पाने
एकटाच भटकलो काळोखाचा, वेदनांच्या
जिद्दी प्रकाशात
आक्रोशत माझे घायाळपंखी गाणे
रात्री आल्या. निखाऱ्यावर काळीज भाजत गेल्या
दिवस लचके तोडीत आले. खात गेले.
भीक म्हणून वाढलेले श्वास घेतले उदासवाणे
संस्कृतीभर तगमगलो तुरुंगवाणे
आणि कितीही घासला परीस तरी लोखंडाचे नाही झाले सोने

# यापुढे

मला मान्य नाही
तुमच्या बोटांपुढची दिशा
मला मान्य नाही
परंपरांची वर्णपाती नशा
मला मान्य नाही तुमची दया
जिच्यावर दिशा डोलतात
मला मान्य नाही माझे श्वास
जे तुमच्या बळावर चालतात
मला मान्य नाही तुम्ही
माझ्या पहाटेची आई म्हणून
मला मान्य नाही मी
तुमचा कुणी नातलग म्हणून
मला मान्य आहे फक्त आता
माझ्यापुढची अटळ युद्धभूमि
तिथे प्रथमच जमिनदोस्त होणारी
तुमची संस्कृती
तुमचा परमात्मा
तुमचे अध्यात्म
तुमची मंदिरे
ही तुमची समग्र शस्त्रागारे
आणि त्यांचे लाडके मायबाप तुम्ही
आणि मला मान्य
माझ्या शब्दातील शहाण्या धरतीला मान्य
आमच्या विजयानंतरचे पहिले निर्मळ आभाळ
पहिले निर्मळ डोळे
पहिली निर्मळ स्वच्छंदी हवा
आणि सदासाठी उन्नत माणूसकीचा माथा
माणसाचे भाळ

●

# एक दुःखयात्रा

मी उकलून पाहिले
चवचाल रेषांचे छिनाल जाळे
श्वासांना मी वणव्यातून नेले
असे काही पावसाळे उधळून दिले
मोजल्या
आणि योजल्या खाष्ट म्हाताऱ्या संदर्भवाटा
अडगळीतील काजव्यांचे कंदील घेऊन
काळोख हुसकावण्याचा खटाटोप केला
आणि गुंतत गेलो प्रश्नांच्या रहस्यमयी जाळ्यात
माझे डोळे दुबळे ठरलेत सुटकेसाठी
पोकळ ठरले इथल्या नासक्या अन्नाने आलेले बळ
आणि चार्वाकांच्या चारित्र्याची
मार्क्सच्या माणूसकीची
केशवसुतांच्या कवितेची
आंबेडकरांच्या आक्रांताची
शपथ घेऊन सांगतो
तेव्हा तोडावेसे वाटले मला माझे कालचे हात
आणि पाडावेसे वाटले असल्या हृदयशून्य व्यवस्थेचे दात
जेव्हा बेसुमार जखडत गेलो
त्या रेषांमधून आकारलेल्या शापात
भिरंगत गेलो
माझेही झाले एक आशयशून्य आवर्त
आणि स्वत:भोवती फेर धरीत फिरत राहिलो
त्या घातकी परिघात
त्यातून घडली त्या व्यवस्थेची कायम दिवाळी
गुदमरणाऱ्या माझ्या श्वासांवर पकली त्यांची पोळी
आणि आत कोसळणाऱ्या उन्हात मी करपत राहिलो
त्यांच्या सुखाच्या भर श्रावणात

●

## खवळलेला तांबडा समुद्र

मरणांच्या घनघोर पुरात
असहाय पंख तुटका पक्षी फडफडतो आहे.
जीर्ण पाने पोटात घेऊन
अगतिक झाडे घुसळून निघत आहेत
प्रमाथी अंधार
आटलेल्या नद्यांना फरफटत नेऊ पाहतो आहे
आणि माझ्याहि कवितेच्या मनगटातून आता
सूर्य उगवू लागला आहे
सर्वहारा क्षितिजांच्या पिंडप्रदेशात
प्रखरता पेरू लागला आहे
कालच्या काळ्या सूर्यांचा निषेध
तो आपल्या सुरुंग झाल्या किरणांमधून हाणतो आहे
आणि पराभूत हाडांच्या पाण्याच्या लाटा
युद्ध झालेल्या किनाऱ्यावर फुटून विझत आहेत
इतिहासाच्या गळ्यात माळा झालेले क्षण
अंधश्रद्धांच्या गळ्यात पडून रडत आहेत
आणि कैक दरोडेखोर श्वासांच्या सांगाड्यांचा पाऊस
खवळलेल्या तांबड्या समुद्रात कोसळतो आहे.

●

# श्रद्धांजली

दररोजच्याच अळणी सूर्यप्रकाशात
माझ्याभोवती हसताहेत कृतकृत्य गटारांचे थवे
मी निघतो पिळवटून
भोवती घोंगावणाऱ्या कार्पण्याने
भावना थुंकून टाकताहेत किळस
छळणाऱ्या कुबट दुर्गंधीची
दुर्गंधी हारतुऱ्यांची
निराधार ऐसपैस थोरत्वाची
अभिनयाच्या तल्लख स्पर्धेची
संस्कृतीच्या मठ्ठ फेसाळ अभिमानाची
नेमांची
बोगस प्रेमाची
समग्र चामडी बचावू गणिती व्यवहाराची
त्या सुफलांना नमस्कार थक्क
त्या सुजलांना नमस्कार थक्क
त्या ज्ञानोकिरड्यांना नमस्कार थक्क
त्या बेशरम मग्रुरीला नमस्कार थक्क
त्या अमानुष वंदनियांना नमस्कार थक्क
त्या तृप्त कीटकांना अभिवादन थक्क
आणि अभिवादन त्या बेईमान अप्रामाणिक
भक्तांना वक्तांना थक्क
मुलाबाळांप्रमाणे ज्यांनी ही घाण
जन्माला घातली कैफात
आणि संगोपिली आटोकाट कैफात
ही अनुभवमोकळी भावश्रद्धांजली त्या जिवंताना, मृतांना
मला झाकोळून टाकणाऱ्या त्यांच्या कद्रु सावल्यांना

●

# क्रांत्युत्सवासाठी

मी विघ्नसंतोषी
उतट समाधानाने मला पहाविशी वाटतात
असल्या विषविलासांची चटपट मरणे
त्यांच्यातील बाटग्या श्रद्धानिष्ठांसहीत
अवसानघातकी मूल्यपरंपरेसहीत
आणि मातीच्या बेचाळीस थरांखाली असाव्यात
श्रद्धांची वर्गणी जमविणाऱ्या त्यांच्या समाध्या
नव्या क्षितिजाच्या संततीला
त्या दिसल्याचे विपरीत पुन्हा घडू नये
ते 'पाप' नको
नव्या पालवीला छळणारे जुने माप नको
डोळे दुखविणारे पोपडे
माणूस दिसू न देणारी झापडे
फांद्या खरेदुन बसलेली
मनुस्मृतिची लाडावलेली पाने
आता पोलादी वाऱ्याने गळून पडावीत
जळून जावीत भूतकाळाची अध्यात्मबने
पापण्या वाळून गळून जाण्याआधी
डोळ्यांच्या अपमानाचे हे लांबलेले आख्यान थांबावे
आणि आभाळाखाली साचावेत प्रेतांचे खच
दिलाच्या दुनियेतील अख्ख्या दलितांच्या
क्रांत्युत्सवासाठी.

●

# आगच झालो आहे

मी उन्हाच्या तलावातील जळत्या रक्तकमळांच्या शय्यवर
ज्वालांच्या लहरींनी हेलावत्या
ग्रंथींमधून गुरफटलेल्या चांदण्याच्या कोमल वेली
रक्त घ्यावे तशा काढून घेतलेल्या
पोलादाचे कवच प्राणांवर माठून
दगडाच्या ओठांनी मी पचवितो
इथे विषाहूनही जलाल भीषणता
शुक्रतारा सुरकुत्या पडून संपावा
तसा तुमच्यावरील विश्वास काळवंडून कोसळला आहे
आणि घायाळ आयुष्याने
मी काळोखाचे उकळते अंतराळ पितो आहे
क्षण क्षण विजेच्या पावलांनी येतो
तरंग तरंग अध्यात्माचा गजर करीत येतो
वाद लवाद ग्रंथ पंथ येतो तो तो
पिंडीब्रह्मांडीची मादक दिंडी घेऊन येतो
आणि श्वासात उधाणून येतात विवस्त्र वाळवंटे माझ्या
मीही आता अलिकडे असा झालो आहे
माझ्यात मुकाट मावेनासा झालो आहे
माझ्यातही मी अवघडू लागलो आहे
माझेही किनारे आता मला सोडून गेले आहेत
माझ्या दयेलाही आता माझा उबग आलेला आहे
आता माझीही भीति मला वाटेनाशी झालेली आहे
माझ्यासाठी मीच आता निर्वाणीचा निर्दय संताप
झालो आहे
मी राग राग झालो आहे
मी आगच झालो आहे.

●

## भीषणभूत

माझ्यापुढे माझ्या मनातील भूकंपाने कोसळणारे
अनंत जुजबी कडे. बिनबुडे
साक्षात्कारानंतरही स्वधर्म स्ववर्ग स्वजात
स्वक्षुद्रहेतू विसरू न शकणारे संत
तसे रंग बदलणारे माणसांचे ठिपके
माझ्याभोवती अनंत
माझ्या मनात उकळणारे विध्वंसाचे रसायन
माणसे परंपरेचे सक्तबिमार मदिरायन
पुन:पुन्हा तापवून पित झिंगणारी
प्रत्येकाच्या मनातील काखेत झोळी
वंचना लपवून नाटकी ओठावर
केविलवाण्या पिवळ्या मढेल ओळी
मला दिसतात त्यांचे स्वत:पासून पळणारे पटाईत पाय
त्यांचे परस्परांसाठी रंगवलेले विदग्ध चेहरे
जन्मांधळ्या श्रद्धांची विद्रूप गर्दी
तिचा डोळे थडगवून स्वीकार
खिशाबाहेर स्वतंत्र नटराज उदात्त मूल्ये
पोटाच्या खड्ड्याजवळ उभी संस्कृतीची लक्तरे
कमरेच्या कुंपणाजवळून डोळे बांधून चालणारे विदुषक अध्यात्म
त्याला रिवाजप्रचूर कलात्म रंगकाम
आणि डोळ्यातील खरचट झाकताना उडणारी तिरपीट
ही जगतात भूते अभिनयाधीन
जुळवीत उराचे सैरभैर तुकडे
आणि धावत असतात मृगजळामागे
पलिकडच्या अरण्याच्या काळोखरोखाने
परमेश्वरपुत्रांच्या वठवीत भूमिका भीषणभूत.....

●

मी पाहतो मरणांचे थवे
संध्याकाळच्या सावल्यांना जेव्हा चढते भरती
मी पाहतो उन्मळून पडती झाडे
घाईतच हवेत हलणारे त्यांचे फांद्यांचे हात
आणि होणारी त्यांची माती माती
मी पाहतो उन्हाचे संसदर्भ कळप
हिरवे कुरण चरणारे
मी पाहतो माझे लूत भरलेले भवताल
आचके देत मरणारे
अनादि अनंतापासूनचे शहाजोग
शब्दातल्या सुगंधाला वनवास देणारे
कवितेच्या चारित्र्याला विद्रूप करणारे
आणि एका आभाळाच्या काळजाला विस्तव बांधणारे
…आणि माझ्या डोळ्यांपुढून जळत्या सरणांचे पूर जातात
आटलेल्या मेघांच्या मांडवाखाली

●

## माझी प्रेतयात्रा

मी पाहतो उघड्या डोळयांनी
रक्ताळ बुबुळे
पुरातन डोंगरांना फुटलेली
ऐकतो काळचा वाऱ्याची सावध भाषा
अस्तक्षितिजातून सुटलेली
दिसते ताऱ्यांनी माझ्याविरुद्ध मांडलेली कैफियत
आकाशाच्या प्रांगणात
जाणवते इथला बांधील प्रकाश
मला टाळीत फिरतो एका भीषण कोरीव रिंगणात
मी पाहतो माझ्याविरोधी जलाल योजना
अवकाशभर पालवलेली
मी पाहतो माझी प्रेतयात्रा
या मनूंच्या मनातील
मातीच्या बिथरलेल्या मुलांनी चालविलेली

●

## अटळ स्फोट

जन्मव्याकूळ
एकेक संवेदन. एकेक याद ज्वालामुखी होऊन उरी
उकळणारी
इथून विजा ओकतील ओठ
अटळ आता इथून स्फोट
सांस्कृतिक काळोखाच्या सुसाट अस्तित्वाने
धाड घालून माझा चेहरा लंपास केला
आणि प्रत्येक शब्दाच्या उपसंहारापाशी
थुंकून घेत
पुढील शतकांना माझा परिचय करून दिला
असे तटबंदीबाहेरून पोरके चालताना
या जहराच्या शिदोरीने भुकेचा गळा सोडला नाही
आता नको आहेत मला
कुणी भरविलेले जीवनाचे अर्थ
माझ्या वाटा बांधतो मी ज्वालांच्या धगधगत्या पारावर
आणि घाबरले तेव्हा झोडपून काढले माझ्या श्वासांना
मीच बसून माझ्या उरावर
वळवळत आहे माझ्यापुढे आजही

आडव्या तिडव्या ग्रीष्म रेषांचे गणित
जमेल तोवर घेईन मीच
माझ्या क्षमतेचा अस्तित्व शोध
मला नको आहे फुकटही
कुणाची आयती साधी उलटणारी रीत
भोवती झाडांचे निष्पर्ण सापळे
निरर्थकाचे निबर पुतळे
मातीवर गिरकत पडणारी नक्षत्रांची एकेक मांडणी
डोळ्यात सजलेल्या दिशेवर सैरभैर होत राहणारे
संकल्पातील मणी
माझे दु:ख वाहून नेईन मीच
हिरवी हाडे उभी असेतोवर
तोवर
जन्मव्याकूळ
एकेक सवेदन. एकेक याद ज्वालामुखी होऊन उरी
उकळणारी
अनावर विजा ओकणारे ओठ
अटळ सशिस्त इथून स्फोट

उत्थानगुंफा : बारा

# वैरी

ते ग्रीष्म माझे वैरी आहेत
ज्यांनी इथे प्रामाणिकपणा रुजू दिला नाही
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येवू दिला नाही
सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिद्ध झाला
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो
ज्यांनी इथल्या सूर्याला दगडांनाही
ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले
संचित निश्चित केले
त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो
ते सर्व देव दैववादी माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली
ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे
ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही

●

# उत्थानासाठी

डोळ्यापुढे पेटून येतात अंधारगुहांचे महासागर
उपेक्षेने मारलेल्यांच्या अतृप्त अपेक्षांच्या
ज्वाळा मनाच्या अवकाशभर
दिशा शिलगवितात माझ्या काळजाला
पूर्व पिढ्यातील सांगाड्यांच्या तोडलेल्या हातांनी
आजतागायतच्या वर्णांध न्यायाची सावत्र संतान
सांगते निर्घृण तुरुंगवासाची कथा
दाखवतात इथल्या पान्हाचोर संस्कृतीच्या गाईने
मारलेल्या लाथांचे अमिट व्रण
पाठीवरील ताजे रक्ताळ वळ
उमटलेले गाठाळ परंपरांच्या प्रहारांनी
आक्रोशतात माझ्या भोवती
अंधारातच झोडपून मारलेले पोरके पोरके श्वास
तेव्हा औट हात देहातही
उधाणून येतात अनंत जिद्दी वादळे
उत्थानासाठी

## नाकारावे लागतील

जीवनाची नग्नता झेंड्यासारखी हाती घेऊन
आजवरचे वंदनीय हिशेब नाकारावे लागतील
भारतीय "परमात्म्याने" डिक्लेअर केलेल्या गुलामी सारखी
जीवनाची सर्व षंढ तत्त्वज्ञाने पुसावी लागतील
सर्वच बेरजा कशा होऊ शकतात
कटू भागाकारही करावे लागतील
अडाणी पायांवर उभे सर्वच शतकांचे आंधळे मजले
आजच्या आगीत पूजेपूर्वि जाळून पाहावे लागतील
उगीच दीर्घायू ठरलेले सन्मानीत आशय
आजच्या उजेडात चाळावे लागतील
मेंदू लुबाडणाऱ्यांवर मन:पूर्वक थुंकतांना
संतापाच्या इतरही जागा मांडाव्या लागतील
जीवनासाठी जीवनाचे आजार नाकारावे लागतील
साऱ्याच जिवंतांना मेलेल्यांचे शेजार नाकारावे लागतील.

●

काढिला खणुनि काळोख
घर कुठेच दिसले नाही
जन्माचे घेऊन ओझे
उन्मळलो ठाई ठाई
मी फुटुन मारिल्या हाका
नात्याचे येतील म्हणुनी
त्या तृप्त बंद दाराशी
थांबलो भिकाऱ्यावाणी
अस्तित्व घेऊनी हाती
प्रारब्ध पाहिले त्याचे
कुणी आधिच पुसले होते
गर्भातच सर्व भरोसे
दुनियेंत चंद्रसूर्याच्या
मज कुणिच घेतले नाही
या जन्माची कधी माझ्या
कुणी आई झाले नाही.

●

# विद्रोहाची नौबत

जळण जळावे तसा चाललो जळत मुक्याने
हृदयावर क्रूर नाचत हासत होती मरणे
हाक न फुटली कधी नि मन मोहरले नाही
नित्य उभ्या हुंबरल्या रक्तामधल्या गाई
आज नभाने निवांत माझी भेट घेतली
फुटून वाहिले बांध विजाळून तगमग आली
विद्रोहाची नौबत झडली आजच ओठी
आला हिरवा सूर्य उधाणून विराण कंठी.

●

# पुन्हा एकदा

दिशांच्या या आंधळ्या घरास
पुन्हा एकदा दिवा दाव
कोटी सूर्य उरात घेऊन
किंवा डावच पेटवून लाव

तुझ्या वाटेवरची झाडे
इथे पुन्हा कैदी झाली
तूच दिलेस उजेड ज्यांना
त्यांची गावे अनाथ झाली

रस्तोरस्ती फासे मांडून
कुटील हेतू टपून आहेत
पुन्हा एकदा त्यांची पावले
कालच्या तमात शिरली आहेत

चिंध्या जोडून साऱ्या पुन्हा
ब्रह्म इथे उभे केले
पलिकडच्या निरर्थाला
स्वस्थ सोयीचे अर्थ आले

तुझ्या शक्यतांचा इथे
चोरून जगतो घट्ट धाक
तेव्हाही तू आलास तेव्हा
कोणीच नव्हता तुला बाप

तुझ्याच दिशा मागतो म्हणून
मीही इथे परका होतो
घरीदारी माझा नित्य
तुझा म्हणून निषेध होतो

दिशांच्या या आंधळ्या घरात
पुन्हा एकदा दिवा लाव
कोटी सूर्य उरात घेऊन
किंवा डावच उधळून लाव

●

# बांगला देश

बांगला देशा ! निरर्थक करून टाकतात गा आज जगण्याचे सर्व आधार
तुझ्या देहभर विझून पडलेल्या तडफडत्या आकांतांच्या चिता
बेचिराख मनाने कुरवाळून घे ही सगळी हाडे आणि कवट्या
रक्तओली तुझी भूमि तुझ्या विध्वंसाची दुर्भागी कविता...!
थरथरतात अस्तित्वाचे खांब प्राणांतिक किंकाळ्यांनी
गोठतात प्राणांच्या वाटा अगतिक आर्त चित्कारांनी
डोळ्यापुढून हलत नाहीत तुझ्या कुशीच्या चांदण्या
वासनांचा पाशवी खद्खदाट
चिध्या चिध्या रक्त रक्त त्यांची जननेंद्रिये फोडणाऱ्या संगिनी
वज्रलेप झाली आहे बुबुळांवर विटंबना त्यांच्या अब्रूची
आणि तेव्हाही फाटले नाही अंबर
फाटली नाही धरती हंबरड्यांनी !
कुठल्या संस्कृतीचा गजर मांडला होता त्यांची स्तने कापणाऱ्या हातांनी
सूर्यही शरमेने काळवंडून जावा
पाहून त्यांच्या स्त्रीत्वाची अघोर विटंबना
आणि निरपराध देहांचा तडफडाट
कुणाला बोल लावून त्यांनी जीव सोडले आपले
कोण होता त्यांचा त्राता
होते देव ? होते मानव ? होते कुठले वाद, होते कुणी अध्यात्म ?
होती कुठली तत्त्वज्ञाने
कोण आले त्यांना वाचवायला ?
या शहाजोग जगात. नेहमी. नेमाने
आज इथे उद्या तिथे निघते साऱ्या विकासाचे मढे
होतात बेईमान सारी तत्त्वज्ञाने
अजूनही नंगा नाच करतात पशूंचे कळप इथे निर्धोकपणे
अजून इथे बलात्कारिली जाते जगजाहीरपणे निष्पाप मानवता
बांगला देशा ! निरर्थक करून टाकतात गा आज जगण्याचे सर्व आधार
तुझ्या देहभर विझून पडलेल्या तडफडत्या आकांतांच्या चिता
बेचिराख मनाने कुरवाळून घे ही सगळी हाडे आणि कवट्या
रक्तओली तुझी भूमि तुझ्या विध्वंसाची दुर्भागी कविता !

आता प्रत्येकच श्वासाजवळ जीव शरमेने काळवंडून येतो
ह्या रक्तपाताजवळ हवालदिल मेंदू रक्ताळून येतो
फाटत जाते नजर जिवाचे पाणी पाणी होते
ऊर फुटून आक्रोश आक्रोश झालो आहे मी
अंगाची लाही लाही होते
आणि दरक्षणापाशी आता जगताना अपराध्यासारखे वाटते
कुठून येतात गा या पृथ्वीवर विखार ओकीत वारे
कोण पाठवितो गा मरणांची वादळे नि करतो जमिनदोस्त घरेदारे !
कोण पुरवितो प्रेरणा पददलित दिव्यांचे गळे घोटणारांना
कोण कशास्तव पुरवितो श्वास गरिबांच्या गावात विध्वंस पेरणारांना
कुठल्या बळाने गा बालकांच्या गळ्यांवरून सुऱ्या फिरतात
कुठल्या तत्त्वज्ञानाच्या बळाने जख्ख मातान्यांची शकले होतात
कशी शक्य होते गा फुलांच्या वस्त्यांवर क्रूर बाँबफेक
पाठीमागे हात बांधलेल्यांच्या पोटात कशी शिरतात लखलखती पाती
कोण होते त्या पोरक्या तडफडाटाची महाकारुणिक आरती ऐकायला
आणि निर्दय कल्पांताच्या वासनेच्या वणव्यात जळताना
तुझ्या लेकरांनी या सुप्रसिद्ध विश्वाशी
नामवंत परमेश्वराशी, ख्यातनाम न्याय्यमूल्यांशी
कुठली नोंदविली असतील नाती ?
मी अंतसमयी कुरवाळू शकलो नाही त्यांना
देवूही शकलो नाही त्या मानवतेला मांडी
आयुष्यभर दाटून आली आहे सूर्य वधून आलेली
काळी कराल रात
ठाई ठाई चुकल्यासारखे वाटते
संवेदनाही ठार बधीर होतात
बांगला देशा ! निरर्थक करून टाकतात गा आज जगण्याचे सर्व आधार
तुझ्या देहभर विझून पडलेल्या तडफडत्या आकांतांच्या चिता
बेचिराख मनाने कुरवाळून घे ही सगळी हाडे आणि कवट्या
रक्तओली तुझी भूमि तुझ्या विध्वंसाची दुर्भागी कविता—!
डोळ्यापुढून हलत नाही हा काळोखाचा प्रदेश अपरंपार
थांबत नाही प्राणभेदी विमानांची घरघर तोफांचा विदारक भडिमार

थडथडतेय काळीज कापतात दिव्यांची भयभीत अंतःकरणें
सभोवार घिरट्या घालताहेत अनंत क्रूर काळी मरणे
मला फसवी वाटते आज आभाळाची सावली
फसवे वाटतात गळे काढणारे बेईमान ग्रंथ
फसवे वाटतात ज्ञानाचे विश्वविख्यात भूईनळे
फसवे वाटतात धर्मांचे मुखवटे
फसवे वाटतात लबाडांचे लबाड देव सगळे
आज मला निरर्थक वाटतो प्रचलित प्रकाशाचा दावा
सांस्कृतिक संचिताचा गवगवा
निरर्थक वाटतात मानवतावादाची देखणी वस्त्रे
निरर्थक वाटतात अघोर आंधळेपणा निर्मिणारी शास्त्रे
निरर्थक वाटतात लक्षलक्ष अणूबाँब होऊ न शकलेले माझे शब्द
निरर्थक वाटतात लाव्हारसाची बेफाट लक्षलक्ष विध्वंसक वादळे
होऊ न शकलेले माझे हात
आणि निरर्थक वाटतात वणव्यांचे विद्रोही कारखाने
होऊ न शकलेले माझे श्वास
विश्वास उडालाय आज सर्वांवरचाच
प्रच्छन्न मृत्यूसारखे झाले जगणे अवघे
या शिकाऱ्यांच्या निर्दय गावात
गरगरून पोरके वाटते आज मला
पोरका वाटतो पशूंच्या निरंतर विजयी जल्लोशात
नेक माणसाचा आवाज
पोरक्या वाटतात माझ्या भावभावनांच्या बहरलीला
पोरक्या वाटतात स्वच्छ माझ्या संवेदनांच्या
लक्षलक्ष बोगनव्हिला
पोरके वाटते इथे माझे असणे
पोरकी वाटते माझी अगतिक कविता
पोरका वाटतो बिचाऱ्या माणूसकीचा माथा
बांगला देशा ! निरर्थक करून टाकतात गा आज जगण्याचे सर्व आधार
तुझ्या देहभर विझून पडलेल्या तुझ्या आकांतांच्या चिता
बेचिराख मनाने कुरवाळून घे ही सगळी हाडे आणि कवट्या
रक्तओली तुझी भूमि तुझ्या विध्वंसाची दुर्भागी कविता !

## फसवणूक

अभागी भावनांना श्वासांचे मचूळ दाणे घालीत
अनिच्छेनेच आयुष्य ओढीत आणले
अजून पोटाशी घेतले नाही कोणत्याही दिवसाने
फाटक्या वाटेवर एकाकीच आक्रंदन करतात माझी स्मरणे
दिसतील म्हणून
थडगी उकरून साथीदारांचा शोध घेतला
कुठेच कधी मन विसावून थांबले नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही

तुमच्या पूजनीय अशा सांस्कृतिक विकृतींची
शपथ घेऊन सांगतो
तत्त्वज्ञानाचे हवाले देऊन माणसांना खाणाऱ्या तुमच्या जगात
मला नितांत चुकल्यासारखे वाटते
जीव लागत नाही भयंकरांनो तुमच्या जमावात
भडभडून परक्यासारखे वाटते
अजून तुमच्या जगण्याची सवय मला होत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही.

विसाव्या शतकाच्या मध्यावर तुमच्यात आलो
दीणवाणा झालो
जेव्हा दिसला धाप लागलेला म्हातारा सूर्य
एका समग्र झाडांच्या गावात बिमार
तुम्ही भ्रांतीच्या लेकरांनी स्वत:वर लादून घेतलेले
आवकाशव्यापी धुके सोयीने
तशी तुमच्या डोळ्यांभवतीची तटबंदी
तुमच्या आंधळ्या सुखांचा हलकल्लोळ...
मला द्यावेसे वाटले तेव्हा माझे निरर्थकत्व सुळी
जेव्हा मी गलबलून जाताना ऐकली
तुमच्या वांझपणाने बिनादिक्कत चालविलेली
विझल्या दिव्यांची उजळणी
आणि माझे प्रारंभ मुके झाले
थिजत चाललोय तुमच्या सर्वंकषत्वाचे केविलवाणे ध्यान पाहून
तुमच्या घाटांवरती मला माझी जागा दिसत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही

शतके तुडवीत तुम्ही वाहून आणलीत
हजारो हजार वर्षापूर्वीच्या शब्दांची प्रेते सादर
त्या कायम बाल उत्साहात
जगत्या श्वासांचे उगम तुम्हाला दिसलेच नाहीत
मरणेच सिद्ध करीत येताना केवळ
तसे आदिअंती निर्मिलेत मृगजळाचे सोयीस्कर प्रदेशही.
तुम्ही फितवून ठेवलेला हा विश्वपसारा
तारका झाडे डोंगर नद्या कुणीच माझ्याशी बोलत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही

हाकांमधून रक्तच फुटत आले निरंतर
फक्त गुहांमधील काळोखच निनादत राहिला
तुमच्या अध्यात्माने भीतीचा गाळ थापला माझ्या डोळ्यांवर
आणि स्वत:लाही मी पाहू शकलो नाही कधी
आणि अध्यात्मासकट तुमच्या सर्वंकष मयसभेने
फसवीत फसवीत मला लोळागोळा केले
आणि जेव्हा दिसले तुमच्याकडून
मी प्रयत्ने फसविला जातो आहे तुमच्या जमावात
तेव्हा मी चिडलो स्वत:वर तुम्हावर
तुमच्यात मला आणून सोडणाऱ्या या माझ्या जन्मावर
मतलबाच्या या जत्रेत मला माझे साथी दिसत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही

आता स्वत:च्याच श्वासांवर मी क्रूर सूड घेतो
मेंदूमधल्या स्मशानात काळातून तुम्हातून
स्वत:ला वजा करून घेतो
हा वणवा. हा स्वार्थ. हे मतलब. हे अघोर हेतु.
ही बेईमानी
ही पिळवणूक
ही तत्त्वज्ञाने
हा सक्रीय दुस्वास
ही गळचेपी
ही नाकेबंदी
हे खच्चीकरण. हे मृगजळ. ह्या भिंती. ह्या वृत्ती
अस्तित्वाचा कापूस पिंजून काढणारी
ही एकेक क्रूर धनुकली
परमेश्वराच्या लाडक्या पोरांनो
इथे जीव लागत नाही
इथे जीव जगत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही

## निषेधनामा

जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन
मला आनंदच देत नाही कुठली कला. सृष्टीच्या नाना लीला
मी असूच कसा शांत समतोल
छळतात सारी शास्त्रे पुराणे वेदान्त
गळा आवळणारे नाना धर्मपंथ
मला आता पहाविशीही वाटत नाही कुणाची वाट
मी झालो आहे आता अपरंपार अफाट
तुम्ही निर्मिलेल्या सर्वच चकव्यांचे प्रदेश
तीक्ष्ण चोचींनी तोडतात माझे लचके
भोवती जिवघेणा आकांत
आणि शोभिवंत कुजकेपणाला तुम्ही म्हणता साहित्य
गुलामीला पशुत्वाला दीर्घायुष्य मागणाऱ्याला
केवळ जरतारी शब्दांना दिपून तुम्ही महाकवी म्हणता
तुम्ही करता पूजा पुष्पावगुंठीत घाणीची
आणि अठरा विश्वे दारिद्र्याला गोष्ट सांगता राजा आणि राणीची
तुम्ही लिहा साहित्यशास्त्रे
लिहा तत्त्वज्ञाने सोयीची
परंतु इथे मिरासदारी आहे काहींची
हे मी ओरडून आकांतून सांगत जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन

मी पाहिली सर्वनाशात विव्हळणारी रुग्णाईत दारे
पाहिले काही डोळ्यांच्या वाळवंटानी जपलेले चिंध्याचे आभाळही
लांबवलेले काही प्रतिष्ठित ठेकेखोरांनी
पाहिल्या कितीएक शहाण्या गर्भांनी केलेल्या आत्महत्या
आणि मी पाहिला तेव्हाही ब्रह्मांडाचा निर्विकार नूर
इथल्या दिशा कधी हळहळल्या नाहीत जखमांच्या पुरांनी
मी पाहिली गावाबाहेरील झाडांची निरपराध आयुष्ये
केविलवाणी

काढून घेतलेले पेशींमधून त्यांच्या ऋतुउत्सवाचे पोरके संभव
मी हैराण झालो तडकलो ठाई ठाई
जळतात नित्य दिवस माझे
जळतात माझ्या रात्री
येणाऱ्या प्रत्येकच पहाटेचे कान फुंकणाऱ्या
आर्ष काळोखाच्या अर्धांगिनी ऋचा
प्रतिज्ञावंत पायांखाली आता मी तुडवीत जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन

निष्पर्ण जंगलात आयुष्य गेले
तसे पाठ झाले झाडांचे ओसाडविलेले लाचार जन्म
पदरात पाचोळा घेऊन डोंगरकपारीमधून वेड्यागत वणवणलो
सर्वांना विचारले. पावसाला विचारले.
सागराला विचारले कारण
परंतु गुन्हेगाराला नसते तोंड.
नसतात डोळ्याला भिडविता येणारे डोळे
घुबडाला नसते प्रकाशाचे उत्तर
वांझेला नसतात प्रसूतिच्या कळा
मी कळवळलो
मी तडफडलो
आणि रक्त पेटवीतच गेली तुम्ही चिरडलेल्यांची मनोगते
इथे तिथे मला त्यांची वाळवंटे दिसली
त्यांच्या संबंधितांचे अवशेष दिसले.
आणि तिथूनही बोलावीत होत्या मला निर्लज्ज अंधारगुहा,
लाच देऊन फितविण्यासाठी
तेव्हा माझ्या पेशींमधून आग भडकली चौफेर
इथे बहर गुलाम आहे
इथे प्रकाश रूजू दिला जात नाही
सभोवतीच्या या बेवारस दुःखाला मी माझा शब्द देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन.

एका निर्वाणीच्या रात्री
ओठात सूर्य घेऊन समग्र उभा राहिलो
आणि विचाराला संस्कृतीचा हिशोब
तेव्हा तोंडे लपवून सारी दिवाळखोर शतके हवालदिल झाली
नद्या थरथरत थरथरत आटत पळाल्या उगमाकडे
त्यांची कमाई भुंकत होती माझ्यावर त्यांच्या पुराणांची हाडके चघळीत
आणि भर पाऊसमाऱ्यात मी खणतच गेलो
त्यांच्या हेतूंचे अंतस्थ पठार
शेवटी विषाचे झरे लागले आणि चिडीचिप प्रकाशबंदी
कुठल्या सबबीवर
कुठल्या सबबीवर मी क्षमा करू या शतकांना
या कसाबांच्या जगात
माणसे कतल केली जातात हे आकांतून सांगत जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन.

दुभंगून जाऊ दे पृथ्वी
मला विझविण्यासाठी प्राचीन मंदिरातील घंटांनी चालवलेला गजर
जमिनदोस्त होऊ दे.
कर्णकथेतील पुढील यातना मला देण्यासाठी
त्यांनी पसरलेली शब्दांची दलदल
तिचे त्यांच्या हेतूंसाठी खड्डे होऊ देत
लागू दे आग अस्मानाला
खवळू दे त्यांचे यज्ञदेव
त्यांनी ज्यांची पूजा केली ते हरामचोरांचे रखवालदार
शतकांच्या अरण्यांमधून त्यांनी उकिरड्यांना भक्तिपूर्वक गाईलेल्या प्रार्थना
सर्व सडून जाऊ दे
येवू दे माझ्यावर त्यांच्या वंदनीय भोंदूंचा मोर्चा
ही मारेकऱ्यांची महावस्त्र धुवांधार मी फाडत जाईन
कत्तलखोरांच्या या सर्वच राहुट्या बेगुमान मी जाळत जाईन
परमेश्वरपुत्रांची ही मिरासदारी लाथेखाली आता तुडवीत जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन.

# "आत्म"र्थी प्रेतांसंबंधी

तेव्हापासून वांझोटी झाली
त्या मुलुखातील प्रयोजने
आणि शब्दही ठार नपुंसक
तेव्हापासून प्रेते चर्चा करतात
त्या मुलुखात पाल्हाळीक
येथील सनातन अंधारावर थुंकून गेलेल्या
एका प्रचंड विद्रोही सूर्याची नित्य
ऐकतो की त्या मुलुखातील
सवस्त्र 'आत्म'र्थी प्रेते
आता आपापली थडगी वाहतात
फक्त आपल्या डोळ्यांच्या अंधारातून
ते भयंकर थांबतात तिथे
साकार होते सहज स्मशान
आणि जळते आभाळ मुकाट
त्या मुलुखावरचे प्राण फुटून
तेव्हापासून...
त्या मुलुखातील आंधळ्या भूमिवर
पसरलाय काळा बर्फ सर्वत्र
आणि काळ्या हवेचे निर्णायक भार
तेव्हापासून तेथील पाकळ्याशून्य फुले
हंबरतात त्यांच्या हरवलेल्या झाडासाठी
आणि उगवतात तेव्हापासून काळे बुडबुडे
तेथील वैराणाच्या निष्प्राण देठोदेठी

●

## माणसांसाठी आरती

शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो
दर नव्या पावलापाशी नित्य नवाच अंधार भेटतो
असे पाहिले या छोटयाशा आयुष्यात की आयुष्याचाच संताप येतो
जिथे जन्म उभा राहिला तिथेच असे कोसळणे आले
जिथे लिहावी स्वप्ने सुंदर तिथेच जगणे फुटून वाहिले
भोवती असे आक्रंदन की वेडा होऊन जीव फुटावा
भीक मागतात अनाथ यातना ज्यांचा प्रेतांनाही पाझर फुटावा
आणि पूजा स्वीकारतात इथे रक्ताने माखलेले खुनी हात
सारा जहरी इतिहास जसा नव्याने उलगडतो या बेशरम काळोखात
ज्यांचे जन्म ओस पडले इथे त्यांचा तुम्हास हिशेब देतो
शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो.

जाळ होतो कल्पनाशक्तीचा जेव्हा बघतो निरपराध जळताना
कुणाकडे आहेत इथल्या जगण्याचे हक्क सदासर्वकाळ
कुणाच्या पापांनी असे जहर फुटले इथल्या दिशांना
जयंत्या साजऱ्या होतात मनूपक्षियांच्या गुढया पताकांनी
तशी वर्षे सजतात खुशाल दुबळयांवरील बहिष्कारांनी
इथे सुखे रुजवलीत रक्तावर प्रेतांवर निष्पापांच्या
सुखवस्तु पुण्यश्लोकांनी, संस्कृतिरक्षकांनी
मानवी रक्ताचे कोटयावधी दिवे भरदिवसा लावून
दिवाळी करावी बेभान साजरी जशी इरसाल चोरांनी
पतिव्रतांच्या इज्जती निर्भय प्रदर्शनात मांडून
पापे अलंकारिलीत इथे शिरजोर नीतिमंतांनी
भोवती विव्हळणाऱ्या दिव्यांवर थुंकून

जशा कविता अलंकारिल्या जातात इथे आकाशदिव्यांनी
ज्यांना पापे वरदान आहेत इथे त्यांची नावे जाहीर करतो
शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो

त्यांच्यासाठी ही कविता ज्यांच्या श्वासांना दिशा नाहीत
त्यांच्यासाठी ही कविता ज्यांच्या हृदयांना आशा नाहीत
त्यांच्यासाठी ज्यांना इथे ठाव नाही गाव नाही नाव नाही
ज्यांची दुनिया अजून जन्मली नाही इथे
आणि भविष्यालाही माहीत नाही ज्यांचे युग
हे माझे शब्द प्रकाशाची स्तोत्रे गाणारी झाडे होवोत
त्यांच्या वैराणात
वर्तमान ज्यांच्याशी कृतान्त खलपुरुषासारखा वागतो
आणि भूतकाळाने कोंडून मारले ज्यांना शतकांच्या अग्निबनात
या माझ्या शब्दांचे विद्युत दिवे होवोत
त्यांच्या अंधारखिन्न स्मशानात
आणि ज्यांच्या मागे मरणे दौडविली जातात
त्यांच्यासाठी संरक्षक कवच ठरोत हे शब्द माझे.
मी नाही पाहू शकत खून या फाटलेल्या भयभीत डोळ्यांनी
मी पाहू शकत नाही लाचार माणूस
जो ओघळत असतो उल्केसारखा रित्या सुनसान डोळ्यांनी
ब्रह्म्या सटवीची कारस्थाने
पुसली जावोत त्यांच्या ललाटावरील या माझ्या शब्दांनी
त्यांच्यासाठी ही कविता ज्यांना भूक संकटासारखी वाटते
आणि पोटे कापाविशी वाटतात दैवदुर्विलास म्हणून
थडथडते माझी खचलेली हवालदिल छाती निरंतर इथे

कुठल्याही क्षणी पाहावे लागेल जगणे हराम करणारे भीषण म्हणून
गोदऱ्यांप्रमाणे आयुष्ये ज्यांची इतरांसाठी त्यांची खंत कवितेत माझ्या जळत ठेवतो
शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो.

जन्म वाहून नेणाऱ्या दुःखाच्या गाड्या
कुठल्या दिशेने भरभरून येऊन रित्या झाल्या त्यांच्या मुलुखात
की जन्मताच आपापली कलेवरे खांद्यावर घेऊन
रिवाजाप्रमाणे जे मृत्यूच्या प्रवासाला निघतात
की धर्माने संस्कृतीने ओकून टाकले ज्यांना सूडाने निर्वातात
की जे कोसळतात पावसासारखे
आणि संपून जातात ग्रीष्मावकाशात
त्यांच्यासाठी ही कविता ज्यांच्या जीवनात तत्त्वज्ञाने थुंकत असतात
आणि धर्म ज्यांना पापपुत्र म्हणून दुरुनच झिडकारतो
नको म्हणतो.
मी टाकणार नाही ग्रंथापंथांच्या बिऱ्हाडांभवती माझे सवाल
मी शोधतो इथे महारोगी ठरवलेल्यांच्या ओंगळ ओसाड मुलुखात
धर्म संस्कृती आणि ईश्वरत्वाचे अर्थ
आणि वाजणाऱ्या अद्वैताची उत्तरे
ज्यांच्या ओठांशी जडवलेले आहेत हलाहलाचे महासागर
आणि पाठीवर ललाटाची पिढीजात लक्तरे
आणि त्या सर्वांना बोल लावीत राहीन मी
ज्यांनी कल्पांतात मांडली त्यांची बेवारस घरे
ज्यांचे पुण्य बदनाम आहे इथे त्यांच्यासाठी हे पाप करतो
शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो.

●

# निर्वाणीचे पत्र

डोळ्यांच्या या खाचात माझ्या पाहा सूर्यास्तांची रांग
आणि दरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग
मी शब्द शोधतो भाऊ या निर्णायक काळोखात
तडफफडतो नित्य जसा कोंडला गेलो अग्निबनात
आणि या स्वयंसिद्ध स्मशानात हंबरलो तरी काय
या पालवीभक्षक निष्पर्ण वृक्षवस्तित ओरडलो तरी काय
वणवे उभे आहेत भाऊ या शापीत ओठात वादळलेले
नसानसात आहेत दिवे कुट्ट विषाचे पाजळलेले
कुठल्या सागरात बुडून माझा दाह शांत करू सांग
किंवा दरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग

मेंदूच्या या मुलुखामध्ये दहशत घेऊन दिवस येतो
थांबत नाही रात्र रात्र असा जिवभर जाळ होतो
पावलोपावली सज्ज माझ्या कल्पांत आहेत खडे
खिदळतात भोवती माझ्या कळपाकळपांनी हाडे
कुठे नेऊ विसाव्याला उघडलेले ऊर सांग
किंवा दरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग

सावली धरील माझ्या श्वासांच्या कवंधांवर
असा तुकडा मौजूद नाही एकही इथल्या आभाळात
परके वाटतात भाऊ इथले रस्ते इथली हवा
चांदणे फुटत नाही मला इथल्या पावसात
कुठले नाते क्षणभर आळवू मनात
सागर अंगावर पांघरून घेताना
परदेशासारखे वाटते इथल्या माणसात
असा हरामखोर जन्म इथून वाहून नेताना
ओठात थडकलेला लाव्हा त्याला कुठले उत्तर सांग
किंवा दरक्षणी मरत मरत कसे जगावे तेवढे सांग

●

# मी इथल्या दिशांच्या

मी इथल्या दिशांच्या सूडबुद्धीची थुंकी
तिरस्कृत
आणि त्यांच्या लाडक्या परंपरांचा निषिद्ध भ्रमनिरास
मी उभा राहिलो
माझ्या जुलूमग्रस्त भाळावरील लाचार तगमग पुसून
संस्कृतीचे अन्न शिजवायला
मी नाकारली माझी हाडे
मी उठलो त्यांच्या देवांच्या मुळावर
मी हसलो भेसूर त्यांच्या अडाणी तत्त्वज्ञानांना
मी धिक्कार केला विश्वविख्यात कमाईचा त्यांच्या
एखाद्या जंगलासारखे पेटून चौफेर
विखरून दिले त्यांची झडती घेणारे माझे सवाल त्यांच्या मुलुखात
मनांचे खुंट झालेल्या
उमेदींचे शंबूक झालेल्या
अगतिक वाहत्या महारोगी ओंडक्यांसाठी.
त्यांच्या वंशांच्या खाचात खोल
मी पाहिली कुढत्या वेदनांच्या यात्रांची शतके
त्यांच्या पाठींच्या प्रतिकारशून्य खड्डयांमध्ये
धर्माने निर्मून लादलेल्या पापांचे अक्षय भांडवलदार
त्यांच्या संभवांच्या ताटात न सामावणारा कुंभिपाक
त्यांच्या भोसकलेल्या वर्तमानातून दु:ख सांडते त्यांच्यावर
त्यांच्या घरात जगत नाहीत ते
त्यांची जन्मदु:खे तिथे निर्धास्त राहतात.
त्यांच्यावर कोपलेल्या दिशांच्या इथल्या आवारात
ज्वालांच्या लाटा परमात्म्याचा गजर करीत
त्यांच्यावर तुटून पडत असतात
हुबेहुब निस्संदिग्ध वास जळत्या प्रेतांचा
त्यांच्या राहुटयातून पडलेला असतो.
जसे भांडवली धर्मशास्त्रांनी लादलेले करार त्यांचा पाठपुरावा करतात.

आणि बंदुकीची गोळी तसा संताप शिरतो उरात
किलावेनमानीतील जळते जीव
तसे कासावीस होते शतखंडित अंतराळ
मी धावतो त्यांची जळकी नशीबे हातात घेऊन
मी वेचतो त्यांचे जन्मप्रहारांनी विखुरलेले श्वास
माझ्या संतप्त शब्दात.
मी उन्मळतो
मी मला उभे करतो.
(मी ओवतो जिवाची अफलातून काहीली शब्दात.
मी जळतो माझ्या डोळयांच्या पेटत्या चुलींमध्ये
माझे शब्द भिजून येतात माझ्या काळचा ठिक्कर रक्तात.
जमत नाही मला शब्दांचे नक्षीकाम
दु:ख रंगवून रंजक करणारे गुंजनवादी कूळ नाही माझे.)
ही वंचना उगवली नाही कधी मनाच्या क्षितिजातून
हाडांच्या हुडचावर जळणारा बेचैन दिवा
माझ्या हिरमुसल्या रक्ताचा आहे.

माझ्या आयुष्याची भ्रूणहत्या केली आहे या भूमीने
माझ्या बहिष्कृत स्फुरणांच्या अनाहूत अक्षरांवर
उठविल्या आहेत तिने संतप्त शापमुद्रा
ऋषिकुळातील चमत्कारिक आंधळचा आणि शोषक आग्रहांनो
मी हकनाक लुबाडला गेलो आहे
या काळचा बाजारांच्या गावात
खूचप महागात पडले मरण मला
इथल्या द्रष्टचा आचार्यांच्या पुण्यवान नगरात
एथल्या सनातन वांझोटचा धुक्यातील
खानदानी सोंगाडयांनो.
लक्ष्य झपाटणाऱ्या अवसानघातकी तमासगिरांनो
तुमचा असहाय्य बळी होण्यापलिकडे
संबंध नाही इथे कशाशीही माझा
माझ्या श्वासांवर बसतात तुमच्या कावळचांचे कळप नित्य
घुबडांनी टोचून काढली आहे नजर माझी
पाली गिळताहेत मेंदू

आणि ग्रंथींमधून भरल्या आहे मुंग्यांच्या गच्च यात्रा
मी फासतो उकळते डांबर
तुमच्या तथाकथित देवाच्या तोंडाला
देव उभा करणाऱ्यांच्या कारस्थानी शब्दांना
त्या कावेबाज अभिनयसम्राट क्लृप्त्यांना
आणि विघातक भावकवितांना प्रेरणा होणारा चंद्र
मी उकळत्या डांबरात बुडवितो.
डांबर फासून मी निषेधितो
सूर्याच्या बांधिलकीचे घृणास्पद षडयंत्र
मी फासतो काळे सर्वच पाताळयंत्री पांढऱ्यावरती
हिमालयावर उभा राहून मी गर्जून दाखवितो
माझ्या काळचा कविता परंपरांना, भावकवितांना
प्रतिष्ठित शोषक लांडग्यांच्या अध्यात्मगंधी कळपांना
नट्टापट्टा करून मनामनातून हिंडणाऱ्या म्हाताऱ्या पक्षपाती संस्कृतीला
वर्ण आशि वर्गपाती तत्त्वज्ञानांना
आणि ग्रंथालयांमधून परब्रह्म होऊन नांदणाऱ्या शहाजोग अंधाराला

नासक्या शब्दांची आर्ष पठारे ज्यांनी दिली माझ्या खांद्यावर
मला ज्ञात आहेत त्यांच्या धमन्यांमधील विषाची कोठारे
लफ्फेदार अध्यात्म नेसून जे वाटा अडवून फिरतात
त्यांच्या यात्रेचा विराट धिक्कार मी माझ्या शब्दात पेरला आहे.
माझे शब्द नेसवीन मी माझ्या दुःखाला
निषिद्धांच्या भग्न अभंगांचे जळते त्रिकाल
माझ्या शब्दात भिनलेले आहे
मी शिवू निघालो आहे माझ्या कवितेने
त्यांच्या छिन्नभिन्न आयुष्यांचे भूतभविष्य वर्तमान
मी ठेवून दिले माझे हृदय त्यांच्या विपरीत मरणोत्सवात
जे कंदिलाप्रमाणे वेचत फिरते
त्यांच्या डोळ्यात गुंतलेला अंधार
लक्षलक्ष हातांनी दूर करू पाहते माझी कविता
त्यांच्यावर युगांपासून अंथरलेले बेदरकार पहाड.

जळते आजही माझी जिव्हा
या भूमीने दिलेल्या शापात
या अंतराळातील भीषण धूळवर्षावाने
जळते रक्तकणातील दळणवळण माझ्या
इथेच जन्मले माझे हत्‌भागी पूर्वज
अस्तित्वाची निर्वात अंतराळे घेऊन
आणि शेणाच्या पाटचांप्रमाणे जन्म वाहत गेले इथूनच
इथेच कैद झाली त्यांची शोषित वाणी
फाशीच्या तक्तावर इथेच लटकाविली गेली
त्यांच्या हृदयातही फुलू न शकलेली मुक्तीची भाबडी स्वप्ने
या धूर्त शतकांच्या जंगलात विखरूप बेपत्ता झाले
काळोखाने वेड लागलेले त्यांचे हैराण जीव
आणि मी अजूनही विसरलो नाही
माझ्या बाळपणावर दबा धरून बसलेले क्रूर भुकेले मनसुबे
अजून मला स्वप्ने पडतात त्या नरकाची
त्यात वळवळणाऱ्या माझ्या नातेवाईक किडयांची
मी विसरणार नाही त्या जीव आवळणाऱ्या
कोंदट कुजट वृत्तीच्या रखेल्या संध्याकाळी
विषाच्या झडी लावणारे पावसाळे
आणि माझ्या ओठाशी सतत भिडलेले
नरककुंभ घेऊन असलेले परंपरांचे हजारो हात
अनिकेत शब्द माझे
अनिकेत माझे संवेदन
जळत आहे या अनोळखी साशंक वाटांवरून.
माहीत आहे माझा पाठलाग करणाऱ्या जन्मजोग दुर्दैवाला
माझ्या मनातील अपरंपार काळ्या शतकांचे भार
काळे समुद्र अपरंपार
मला खाऊन हसणारे एक काळे अंतराळ चिरकाल.
नासले आहे इथल्या नद्यांचे पाणी
कोड फुटले आहे भयंकर इथल्या दिशांना
वास मारतात जीवघेणा इथल्या गावाशहरातील गल्ल्या
कावीळ झाली आहे इथल्या विचारांना
सडलेली आहेत इथली वळणे, हमरस्ते, चौरस्ते

सडलेले आहेत घराघरातील प्रकाशकिरण
किडलेली आहेत मंडळे इथे
आणि मायबापांच्या वळणावर गेलेल्या संस्था
किडवलेली आहे मानवता इथे
किडलेले आहे इथून वाहणाऱ्या समग्र हवेचे वर्तन
आणि मंदिरशाही कायम इथे बदचलन
कुठे लपवावे तोंड
कशा चुकवाव्यात आपल्या निषेधाच्या झळा
जिथे जावे तिथे जन्म सावलीसारखा सोबत येतो
कशी उणी करावी काळजाला पडणारी घरे आपल्यातून
येणाऱ्या प्रत्येकच दिवसाच्या पाटीवर
मला खाली पाहयला लावणारा कत्तलखोर इतिहास असतो.

प्राणांमधील पालथी नगरी अंगावर दु:खाचे थर घेऊन
उगवतेय माझ्या जगण्यात नित्य
हे ढेकळांसारखे अगणित चेहरे, स्वत:पासून हरवलेले
किंवा हरवावीत जन्म देणारी झाडे
आणि उघड्यावर पडावीत गांगरलेली फुले तसे
आटलेल्या विहिरींसारखी मने पोटे किंवा
दुष्काळात माणसांनी गावे सोडल्यावर
उरणाऱ्या घरांसारखी बेवारस विवरे
दिवस नेमाने उगवतात
नेमाने मावळतात
हे नित्याचे भेगाळलेले. खाली माना घालून
वेळी अवेळी सवयीने नम्र हात जोडूनच असतात
युद्धात अवयव गेलेल्या सैनिकांसारखे हे मोहल्ले
शतके आलीत आणि गेलीत रोलरप्रमाणे त्यांच्यावरून उद्दाम
त्यांचे उर्वरित अवशेष हमरस्त्यांप्रमाणे
नेहमीच मुके मुके पाहतात
जाणारे येणारे तिरस्काराचे हसू ओकतात अजूनही त्यांच्यावर
लुटून नेतात त्यांच्या कण्हणाऱ्या घरातून बांगड्यांचे हात
आणि सर्वदा हे गाडल्या खांबांसारखे
हे होतात कधी हिरोशिमा

त्यातून कधी अगतिक उगवतात
किंवा इतिहासभर ड्रेनेजसारखे वाहत असतात.

मी तुडवीन इथला ऐतिहासिक काळाबाजार
शतकाशतकांनी रचलेला संतानी चरित्रकोश
फाडून फेकून देईन विश्वाच्या पार
मी असे दुर्दैवी स्फुरण आहे
ज्याला ते जालीम पाप म्हणतात
मी आहे कोंडलेले तडफडते तुफान
ज्याला ते अभिनिवेश म्हणतात शाप देतात
देहामनावर दंश त्यांचे जसे वाळवीन टोकरून काढले मला
थुंकतात त्यांच्या नजरा जणू दुर्गंधी येते माझ्या शब्दांना
चौकाचौकात जमाव त्यांचे माझा दुस्वास लिहीत असतात
अनुकूल नाहीत मला परंपरांच्या इच्छा
अनुकूल नाहीत माझ्या कवितेला इथले प्रघात
की प्रक्षिप्त आहे मी इथे
प्रक्षिप्त आहेत माझे तडफडते शब्द
आणि माझे हे शिक्कामोर्तब केलेले जगणे
—मी विचारतो नाव
माझ्या जगण्याला शीर्षक देणाऱ्या पाखंड्याचे
विचारतो त्याची पदवी.
त्याला पदवी देणाऱ्याचा अधिकार
मी विचारतो पत्ता, सगळी पापाची संतान
पाठीशी घालणाऱ्या पक्षपाती शास्त्रांचा
या सगळ्या लुटारूच्या अवलादिना
पोटाशी धरणाऱ्या हलाहलनिधी परमेश्वराचा
मी माझ्या सर्वनाशाची माझी कविता
अशी मशालीसारखी हातात घेऊन
पेटवून देईन हा अमानुष चक्रव्यूह
केरकचऱ्यात जगवलेत मी श्वास माझे
रक्ताळत आले हेटाळणीच्या काचामधून आयुष्य
आणि हैराण करतात आजही मला
माझ्या करपलेल्या हृदयाची छायाचित्रे

आणि मी कुरवाळतो सगळ्या शापितांची प्रेते
मी चुंबून घेतो गदगदल्या ओठांनी
आजच्या लक्ष लक्ष बळींची प्राक्तने
त्यावरील नियोजित आघात
आणि मी कोसळतो
मी कोसळतो एखाद्या बहिष्कृत पर्वताच्या दुभंगलेल्या कड्यासारखा
बेभान माझ्या कवितेत
—मी इथल्या दिशांच्या सूडबुद्धीची थुंकी तिरस्कृत
आणि निषिद्ध भ्रमनिरास
त्यांच्या लाडक्या परंपरांचा
●

## कैसा हा उन्हाळा

आवरत नाही आतले कल्लोळ
संतापाने भाळ फुटो पाहे ॥
रोज येती वार्ता नभ फाटल्याच्या
तडकते वाचा जाळ होतो ॥
कैसा हा उन्हाळा कैसी बंदिशाळा
उभा जन्म काळा झाला येथे ॥

●

## जे जे भूत भेटे

कोणत्या बळाने सोसावे हे क्षण
डोळियांना उन्ह गांजते हे
पाय ठेवू ऐसी भूमी नाही कुठे
जे जे भूत भेटे ते ते ढोंगी
आपुले मरण पाहुनी घ्या डोळा
भणंगांनो गळा काढू नका
देवाचीच इथे अवघी संतान
तिथे बोंबलून काय मोक्ष

●

## चोरपुरुषांनो

चोरपुरुषांनो तुम्हा नमस्कार
तुम्ही अपरंपार जगा बापा
तुम्ही कार्यकर्ते तुम्ही देशभक्त
आम्हा तुम्ही फक्त खावे की गा
तुम्हा पाठीराखे देवांचे कळप
आम्हालाच पाप पुण्य तुम्हा
युगे अठ्ठावीस तुमची मिरास
आम्हाशी संडास केले तुम्ही

●

## नागड्यांनी साऱ्या

परमात्मा आमुचा शत्रू सर्वकाळ
शोषकांचे बळ हेतुसिद्ध
जळो त्यांचे तोंड वाणी होवो रांड
पोशिती कुभांड आजही जे
देवाच्या गळ्याचा घेईन मी घोट
चितारीन पाठ खेटराने
जाळा ते अध्यात्म भांडवली एक्का
चुलीमध्ये फेका कर्मयोग
नागड्यांनी साऱ्या मशालूनी यावे
युद्धात ओढावे माजोऱ्यांशी

●

## आम्ही झालो गुंफा

नका दाऊ आम्हा । देवाजीचा धाक ।
तोही आम्हा साप । ठेचू तया ॥
तुमचे अध्यात्म । आम्हालागी शिवी ।
त्याला आम्ही ओवी । गावी कैशी ॥
तुमच्या हेतुंची । साकारली मूस ।
संस्कृती तियेस । म्हणा तुम्ही ॥
पाखंड्यांनो आता । नका मारू थापा ।
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या ॥

●

## यारे वादळुनी

यारे वादळूनी पेटवा ह्या भिंती
उदास एकांती सरू नका
रक्ताने रेखाटा स्वप्न उजेडाचे
उदंड अग्निचे नृत्य करा
कालचे उखाणे आजला वांझोटे
आज नवे काटे काळोखाला
'काल' मेला त्याचा नको आज वेढा
आज विषकाढा ओंजळीत
आपुले मरण पाहता का डोळा
करा घोळामोळा रंगोलीचा ॥

●

## बेहिशेबी वन्ही

पोळल्या झाडांनी एक व्हावे क्षणी
दंडेलीला अग्नी द्यावयाला
येतो तो दिवस लाज नाही ऐसा
जीव पसापसा नित्य होतो
काळ्या गोऱ्या साऱ्या वाळल्या पोटांनी
बेहिशेबी वन्ही व्हावे आता

●

## उगवलो आम्ही

न साहुनी भले पेटविता गाव
अब्रुचा लिलाव स्त्रीयांचिया
मातले म्हणता धर्म बाटविला
थुंकता आम्हाला पाहुनिया
उगवलो आम्ही हे तुम्हा संकट
तुमची की खाट खडी झाली
इथून तिथून तुम्हा पाठीराखे
आम्हीच पारखे जगण्याला

●

## दुःखरात्र ✓

पीडितांना साऱ्या माझी विनवणी
पेटली धरणी झोप फेडा
बोलवितो तुम्हा पोरका आकांत
नको धर्मपंथ खूळ मध्ये
लुटारुंनी देश खिशात घातला
युगधर्म झाला भ्रष्टाचार
कुणाच्या कृपेने पाप पूज्य झाले
निघाले दिवाळे उजेडाचे
मागू नका कुणा यातनांची दवा
तुम्हीच पेटवा दुःखरात्र
●

## आम्ही जाळू ✓

राजकवी ऐसे पोकळ कण्यांचे
वांझोटचा गाण्यांचे नटरंगी
दिसाया साजिरे बांधती गजरे
नित्याचे हुजरे दलालांचे
व्यापक तत्त्वज्ञ हेच कलाकवी
जैसी की नटावी "पेंधी" कुणी
बोलणे उत्कट वागणे घाटाचे
पापाच्या भाटाचे पुतळे हे
चिवडुनी पुस्तके करिती रचना
मान "भुसा"ऱ्यांना बाजारात
आम्ही जाळू ऐशा ढोंगांची बिऱ्हाडे
आम्हीच नागडे होऊ जाणो ॥
●

# हेचि सांगो वाटे

हेचि सांगो वाटे इहलोकिच्या लोका
तुम्ही आम्हा फुका मारियेले
कापुनिया जिती पावलांची धाव
श्वासांवरी घाव घालियेला
तुम्ही इथे दिशा मुक्या मारियल्या
वेदना पेरल्या ओठी मुक्या
येथोनी वादळे रोखू नका कोणी
ही युद्धपर्वणी नागड्यांची

# काय आठवावे

काय आठवावे
सगळेच वाळवंटलेल्या तृषेसारखे कासावीस आहे
काय आठवावे
सर्वच तर जळत ओसाड वैराण होत आले आहे
काय आठवावे
सगळेच तर आयुष्य मुकाट गुदमरलेले कोंडलेले आहे
काय आठवावे
अजून उरातील बहरकळांना लागलेले वणवे विझले नाहीत
काय आठवावे
गळाभर उध्वस्त हिरोशिमा आणि सगळेच तर हुंबरडपागत आहे
काय आठवावे
आठवांनीही तर सर्व आयुष्यावर निखारेच पसरले आहेत
काय आठवावे
●

## धाकली

किती एक रांगोळ्या उधळलेल्या पाहिल्या
कितिदा ओहोटून डोळे स्मशान झाले
हातांना कायम थंडवणाऱ्या शब्दावर
माणूस पेटवलेला पाहिल्यावरही
या जायबंदी आसवांनी विश्वास कसा ठेवावा
—त्या वेटोळे घालून बसलेल्या सनातन क्षितिजावर
माझ्या बहिष्कृत अपेक्षांचे रक्त
अनिकेत साकळले आहे
आणि बेमौत साकळले आहेत
कुटिल कोंडित अगतिक संतापाने
चिरडलेल्या संवेदनांचे लक्ष लक्ष मोर्चे
जे अप्रकाशित आहेत अजूनही
या पावसाळून आलेल्या हातांमध्ये
..त्यांच्या खरवडलेल्या डोळ्यांच्या सांस्कृतिक खिडारांमधून
मी येथल्या संस्कृतीला उलथीपालथी करून पाहतो
पाहतो इतिहासाकडे, शाब्दिक परमात्म्याकडे
अध्यात्माकडे, न्यायानीतिकडे
आणि सर्वत्रच भरून असलेला दिसतो मला
विराटाचा स्वामी काळोख. इरसालांचा वशराखा
आणि ऐकायला येते त्याचे भेसूर खिदळणे सर्वभर
—आता शब्दामागील षंढत्वाच्या सोहळ्यात
आपलाही मुत्सद्दी टाळ जुळवावा
कठीण आहे
कठीण आहे इथे सर्वथा सूर्यसर्व जगता येणे
म्हणजेही कबुल करावे
आपल्या जगण्याचे हिजडे वास्तव
किंवा अपर्यायी प्रायश्चित्त म्हणून एकदिलाने
मढेल प्राण खरवडून काढावेत आपापले
किंवा जगावे जगावे
जगतोच आहोत
कलेवरे जाहीर करतोच आहोत
●

# मी मागितली

मी मागितली झाडांना पुष्पपिसाऱ्याच्या चमत्काराची सिद्धि
आणि आभाळाला नक्षत्रांची स्वतंत्र सुगंधी रांगोळी मी मागितली
मी एक क्षितिज मागितले माझ्या मनगटातील युगाच्या उदयासाठी
आणि मोहोरणाऱ्या पायांसाठी उजेडाची उजाड न होणारी
खंबीर वाट मी मागितली
हृदयाने माझ्या मागितली एक नजर जिच्यात तिरस्कार नसेल
आणि एक अपर्यायी विश्वास ज्यातून माणूस गहाळ नसेल
चार रात्रीनंतर चार दिवसही अपेक्षिले माझ्या
उपटून फेकलेल्या आयुष्याने
मागितले प्रवाहासारखे वाहणे आणि कंठासाठी भयमुक्त गाणे
मी मागितले धरतीसाठी सुसभ्य वास्तव सकलसमांतर
मागितली पंखांची अनिर्बंध दौलत
आणि उड्डाणासाठी परमात्मा न मानणारे निरोगी अंबर

●

# त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना

त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते...
उदास उदास जळते वाणी आणि ओंजळभरून आभाळ फाटते
नंतर गरजणारे सूर्यसंदेश दफन केले आपणच मोहल्या मोहल्यात
आपल्या पराभवाचे अंतराळ छद्‌मी हसू हसत आहे
आपल्या घरावरच्या बढाईखोर अंतराळात
दोस्तहो ! आपणच आपल्या पायाखाली निर्दय सुरूंग पेरून घेतले
आपणच असे घातपाती रस्त्यांना आपल्यावरून चालू दिले
आपणच आपल्याला नंतर सुपूर्द केले भीषणतेच्या हातात
दोस्तहो ! गावकुसाबाहेरची घरे आपली गावात शिरताना
आपणच परतवीत आहोत नरकाच्या उचंबळत्या उत्सवात
डोळे जळताहेत पश्चात्तापाने सर्वत्र पाने गळाल्यासारखे वाटते
त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते...

सदैव म्यानातून शब्दच बाहेर आले तर युगाचा जरासंध
चिरता येत नाही दोस्तहो !
सूर्याने आग ओकावी ते व्यासपीठ हिजड्यांच्या हवाली करणारांना
इतिहास निर्दयपणे लाथा मारतो दोस्तहो !
दोस्तहो ! तुम्ही वणव्यात उड्या घेणारे
तुम्ही रक्ताने अवकाश चितारणारे
तुम्ही वादळांशी भांडणारे सूर्यवंशी दोस्तहो !
मात्र तुमच्या मुठीतील हा अंधार पाहून मन तडकून उठते
त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते...

दोस्तहो,
या आटलेल्या विहिरींना प्रश्नांचे पलिते द्यावे
या विझलेल्या चुलींना निखाऱ्यांचे वैभव द्यावे दोस्तहो !
या पेटणाऱ्या गावांसाठी तुम्ही
कोसळणारे बहाद्दूर मेघयुग व्हावे !
नागड्यांसाठी, या उध्वस्तांसाठी अभयाचे कवच व्हावे तुम्ही !
हजार वाटांनी आक्रमण करणाऱ्या दुर्दैवाला थांबविण्यासाठी
हजार वाटांवर प्रतापी पहाड व्हावे तुम्ही !

दोस्तहो
त्याच्या दिग्दर्शक आठवणींना सोडचिठ्ठ्या दिल्या आपण
त्या आपल्या कनवाळू बापाने दिलेली उजेडाची इस्टेट
राजकारणाच्या जुगारात हरलो आपण
आणि प्रत्येकच आघाडीवर आपण हरणारे युधिष्ठीर पुढे केले
त्याच्या क्रांतीमान प्रतिज्ञांना वेश्या करून
त्यांना बाजारात उभे केले आपण
आपल्या युगान्तक दुर्दैवाचे आपणच शिलेदार आहोत
आणि आपल्या अस्तकारी चुकांचे आपणच शिल्पकार आहोत दोस्तहो !
या दिवाळखोर गर्दीतून चालतांना आता हातच गळाल्यासारखे वाटते.
त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना आता अपराध्यासारखे वाटते...

त्या मावळलेल्या प्रकाशायणाची नंतर उरलेली प्रभाही
सोयीनुसार त्या अस्तकल्लोळातच कुणी ढकलली दोस्तहो !
कुणी शोधले मेणबत्त्यांच्या प्रार्थनावादी उजेडात
नव्या भवितव्याचे अवघड बांधकाम ?
कबूल की आपण गावाच्या कायम बाहेर होतो.
कबूल की आपले जन्म कायम भूकबळी ठरले इथे
कबूल की आपण प्रेते होतो.
कबूल की इतिहासभर इतरांसाठी रस्ते होतो
पण हेही कबूल करा दोस्तहो की विजयाची गॅरंटी असतानाही
युद्ध आपण बुद्धचाच नाकारले
कबूल करावे की एक ऐतिहासिक ज्वालामुखी
आपण गांजाची चिलीम पेटविण्यासाठी वापरला
कबूल करावे की त्या अपूर्व तुफानाची युगप्रवर्तक स्वप्ने
आपण खिशासाठी तोरणे म्हणून वापरली. घरे गाठली.
आणि आपल्या पापांच्या पताका फडफडत ठेवल्या
या पताकांच्या उत्सवात वावरतानाही आता गुदमरल्यासारखे वाटते
त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते...

दगड हातांच्या दिशेने झेपावत नसतात
हातांची वाट पहात असतात दोस्तहो !
पण जीव ओवाळून टाकायचे असतात

22829
2800

त्या धगधगत्या धन्य हातांवर
जे क्षेपावत अनावरपणे दगडांचा शोध घेतात
दोस्तहो,
आपण झेपावणारे हात होणे टाळले
आपण गजरे माळले. तुरे आणि हार माळले
अन्नचे लचके तोडणाऱ्या वर्तमानाला
आपण शब्दानेही हटकले नाही दोस्तहो !
आपण घेतले मारेकरी घरात प्रतिकार न करता
आपण आमंत्रिले त्याच इतिहासाला
आपल्या उपाशी आयुष्यांवर चरण्यासाठी
आणि दोस्तहो ! एका बेशरम कैफात आपण भोवळत राहिलो
मावळत राहिलो विव्हळत राहिलो.
आपण परतवून लावलीत आपणाला बोलावणारी भाग्योदयी क्षितिजे
आपण नेहमीच पंख नसलेले कोंबडे गरुड म्हणून आकाशात सोडले
आपण सर्वांनी ही अभद्र संध्याकाळ भोवती जमा केली दोस्तहो
या संध्याकाळी झाकोळताना खिन्न काळीजच चिरडल्यासारखे वाटते
त्याच्या आठवणींशी डोळे भिडवतानाही आता अपराध्यासारखे वाटते—

अपराध्यासारखे वाटते या अपरंपार दुर्धर काळोख कोठडीत
या वांझ यातनांच्या बलात्कारी मिठीत
काय कौतुक करावे या मेंदूंचे ?
या हाताहातातून वावरणाऱ्या कोट्यावधी भोंदूंचे ?
काय गाणे गावे या हंगामी दिव्यांचे ?
तुम्ही गाता त्या ओव्यांचे ?
या उत्सवाचे. या आनंदाचे. या तृप्त तृप्त सुखाचे
दोस्तहो !
क्रांतीची अग्नीगंगा झेलणारे आजचे वास्तववंत भगिरथ
शोधतोय मी या अवसानघातकी दावेदार अंधारात
सागराची उलथापालथ करणारी खवळती वादळे
धांडोळतो मी या रौरवाच्या अमानुष शापात
त्या पराक्रमी अग्नीकल्लोळाची दाहक अवलाद शोधतोय् मी
या घराघरांच्या उदास उदास जंगलात

हे निष्फळ जंगल तुडवताना ठरल्यासारखे
पावलोपावली आता अस्त भेटतात
हे पराभूत जगणे वाहताना आता आपल्यालाच हसत राहावेसे वाटते
उदास उदास जळते वाणी आणि ओंजळभरून आभाळ फाटते
त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना आता अपराध्यासारखे वाटते.

●

## हा जन्म भोगतो मी

मोहरून ही विषाची आली छिनाल रानं
कंठात फाटलेल्या पडले मरून जगणे
दारात चंद्र नाही आला अजून माझ्या
वैराण जिंदगीची हाती उदास गाणी
श्वासांवरी पसरल्या बर्फाने काय मागू
पायास या सदाची बिलगून आग होती
काळोखलो कितीदा दुनियेतल्या नीतिने
हृदये इथे इमानी नर्कात मडत होती
उपकार काय मानू अंधार कोठडीचे
हा जन्म भोगतो मी धुपत्या चुलीप्रमाणे

●

# उजेडाच्या प्रार्थना

कुठल्या क्षितिजाला इमानदार सूर्य मागावा
दिसतो तो समुद्र ओहोटून गेलेलाच दिसतो
कुठल्या गावात ऐकायला मिळतील उजेडाच्या प्रार्थना
भेटतो त्या क्षणाचा गर्भपात झालेलाच असतो
संपतील का हे दिवस कधी कुठे उभे राहून पाहावी वाट
उन्हात वाहणारी उपाशी घरे आणि पाय ठेवावा तिथे निखारा असतो
रात्र रात्र थांबत नाही कधी दारातील मोडक्या दारांचे निर्वासित रडणे
अशावेळी जगणे हृदयात ठणकत राहते आणि स्फोट होत नसतो
सूर्याशिवाय चंद्राशिवाय आकाश डोळ्यात उगवत राहते हंबरत राहते
कंठ होतो स्मशान स्मशान आणि रक्तात काळोख नाचत राहतो
कुठल्या वाटेवर विसंबून चालावे कुठला क्षण होईल कूस
रूजत नाहीत रक्तात हाका मुकाच माळ जळत राहतो

●

# कोंडी

शोधिली वेड्यापरी ती झूट होती मंदिरे
लपविला माथा परी उरी पेटती ही अंबरे
हा कसा अंधार माझ्या नाचतो डोळ्यांवरी
हरपली वाचा पडून मी कापल्या रस्त्यापरी
गोठला अधार मजला वेढुनिया अंतराळे
ही कशी कोंडी की कंठी जीव तडफडूनी जळे
कालचे वणवे जिवाला आजही कवटाळिती
ओंजळी निष्पर्ण वठल्या शोक व्याकूळ मांडिती
पेटली धरती उधाणून पेटली ही अतराळे
पेटले डोळे उभे अन् पाय माझे आंधळे

६५

# मारुती कांबळे

मारुती कांबळे ! तू जगतच नव्हतास अंधारयात्रिका इथे कधीही
तेव्हा त्यांनी तुला जिवे मारले असणे शक्यच नाही.
अरे ईश्वर त्यांचा, आभाळ त्यांचे दिशा आणि भूमि त्यांची
सारेच त्यांनी खरिदलेले तुला उजेड ते द्यायचे नाहीत
सूर्य अत्यंत हरवलेल्या कोंदट घनदाट अरण्यहृदया
तुझ्यातील काळोखाचा अंगारा उधळण्याची वेळ अजून आली नाही ?
युगांच्या लाथांचे पहाडी ओझे वाहणाऱ्या मान्यवर गुलामा
युगांची विष्ठा वाहण्यासाठीच जन्माला घातलेली
तुझी काळी डोई पेटण्याची वेळ अजून आली नाही ?
आणि हे प्रेतवर्या ! वेदांच्या आधिच्या आणि नंतरच्या शतकांना
त्यांनीच निर्मिलेल्या तुझ्या पांगळेपणाची शरम वाटली नाही
आणि माणसाला यावी तशी कणवही आली नाही.
--अरे ईश्वर त्यांचा आभाळ त्यांचे दिशा आणि भूमि त्यांची
सारेच त्यांनी खरिदलेले तुला उजेड ते द्यायचे नाहीत.

तुझ्या गळ्यातील गाडग्याने आणि कमरेच्या फांदीने मी शर्मिंदा आहे मारुती
अजून तुझ्या प्राक्तनीचा विटाळ संपला नाही दु:खपुत्रा
तुझे प्रत्येकच क्षितिज अध्यात्माचे विष देऊन मारले होते
आणि ओवीशिवाय पिठाशिवाय फिरवित आलास फुटके जाते
तू आहेस दोन पायांचे स्मशान भावनांच्या कबरी घेऊन चाललेले
येथील वंचितांच्या उराउरात आहेत तुझे मारलेले मनसुबे टांगलेले
तुझ्या डोळ्यात अमावस्यांचे पहाड पेरणारे हात इथे जगन्नाथ आहेत
इथल्या खोपटाखोपटातील अंधारात तू फाशी दिला गेलास
आणि मेला नाहीस मारुती असे गूढवादी इथले रिवाज आहेत.
अरे ईश्वर त्यांचा आभाळ त्यांचे दिशा आणि भूमि त्यांची
सारेच त्यांनी खरीदलेले तुला उजेड ते द्यायचे नाहीत

तुझ्या निश्वासांचा अम्लान अंधार अरे माझ्याही डोळ्यात सांडतो आहे
तू उगवतोस आंधळ्या अरण्यात प्रकाशत नाहीस आणि अस्ताला जातोस
हे माझ्याही आयुष्याने तगमगत पाहिले आहे.

उत्थानगुंफा : छप्पन्न

पण दु:ख पुत्रा ! लक्ष लक्ष ओसाड भविष्यांजवळ तुझे निरोप पोचले आहेत
संस्कृतीच्या पायातील अदृश्य अभागी दगड आहेस मारुती तू !
आणि आता हजारो केशवसुतांच्या महाकाव्यांचा दाहक नायक झाला आहेस तू
या भूमिच्या सापत्न पुत्रा तुझा कर्मविपाक तुला भ्यालेला आहे.
तुझ्या ओसाड कंठात लेण्या खोदणाऱ्या हातांचे संकल्प झेपावत सुटले आहेत
तू मेला नाहीस मारुती कांबळे ! मेलेले जीवन फक्त जगलास. जगतो आहेस.
आतातरी आपला सूर्य अचूक निवड. कुठवर ओढशील वांझोटे जाते.
अरे ईश्वर त्यांचा आभाळ त्यांचे दिशा आणि भूमि त्यांची
सारेच त्यांनी खरिदलेले तुला उजेड ते द्यायचे नाही.
मारुती कांबळे ! तू जगतच नव्हतास अंधारयात्रिका इथे कधीही
तेव्हा त्यांनी तुला जिवे मारले असणे शक्यच नाही.

# पावसाळी मोसमांनो

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो !
आभाळातून पडत नसतात उजेडाची सार्वभौम युगे
मी म्हणतो ! या मातीच्या कणाकणाच्या पायात प्रथम
आपण ज्वाळांचे चाळ बांधू
अंधाराच्या निर्घृण घृणेत विस्फोटक वादळांचे
सजग पहारे बसवू आपण
वैराण गळ्यांना आणि ओसाड डोळ्यांना
चौकाचौकात प्रथम आषाढमेघांसारखे दाटून आलेले पाहू आपण
आणि पेरून ठेवू येथील खोपटातील
यातनांच्या ऐतिहासिक अरण्यात
विक्राळ विजांचे शिस्तशीर काफिले

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
मी म्हणतो–
की समाजसंस्थांच्या पाशवी आकृतिबंधांची गणिते
कालपर्यंत मावळलेल्या पक्षपाती दिवसांच्या मैफलीत बसून
सोडविता येत नाहीत हे प्रथम जाहीर करू
आणि आपल्या ओंजळीतील अंधाराला दफन करायला
कालचे कुठले शतक मूठभरही प्रकाश देऊ शकणार नाही
हेहि प्रथमच स्पष्ट करू !
आणि हेहि जाहीर करू की आम्ही हतवीर्य होणारे सूर्य
ओठात घेतले नाहीत
दगाबाज निष्कर्ष आपल्या पदरात सजतील
इतके बेभान आपण होणार नाही हे भान बाळगू
आणि पानांच्या वैभवांनी हिर्वळले नाहीत
अंगप्रत्यंगातून फुलांचे चांदणे उधळीत फुलले नाहीत
सुगंधाचा श्रावण होऊन दर्वळले नाहीत
त्या अन्यायग्रस्त झाडांच्या साक्षीच काढून
आपण धन्य व्हायचे सोडून देऊ

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
आपण उद्याच्या सूर्याशी करू दोस्ती
आपण विजांशी करू गोष्टी
आपण नाचू वादळांच्या मोर्चात
उजेडाची आपण उभारू वस्ती !
आपण प्रारंभ करू वाळवंटत आलेल्या अंगणात
विद्रोही रांगोळ्या काढायला
मी म्हणतो—
या माळरान डोळ्यात एका विद्रोही संस्कृतीचे
ब्ल्यूप्रिंट मांडू आपण
प्रथम आपल्या शब्दातील आभाळाशी त्यांचे
नाते बांधू आपण
कुठल्याही क्षितिजावर डोळे विझवून चालायचे नाही
लक्षात ठेवू की पोटात सुरूंग वागवणारे उंबरठेही
फितूर होतात
आणि लक्षात ठेवू की हे ओळखण्याची क्षमता
जे लीलया पेलतात
त्यांच्या पावलांना वाटांच्या वहिवाटी लुबाडीत नसतात.

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
जागे राहा.
डोळ्यात तेल घालून भोवताल पाहा
नजरेतील क्षितिजे सांभाळा आणि ध्यानात ठेवा
माती ज्यांच्याजवळ आपली मनोगते मांडते
त्यांचा विचार उजेडाच्या युगासाठी कळस होत असतो
त्यांच्याच अपराजित खांद्यावर वर्तमान साभिमान बसतो
आणि उपेक्षित अरण्यांच्या काळजांना अंगार लावीत सुटतो.

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो—
आपले शब्द युगाच्या युद्धमान हातातील मशाली होतील
आपले शब्द न्यायासाठी खुशाली होतील
आपले शब्द आंबेडकर होतील. सॉक्रेटिस होतील
आपले शब्द ईश्वरासाठी दैववादासाठी मंदिरासाठी चिता होतील

आपले शब्द कर्मविपाकासाठी कॅन्सर होतील
आपले शब्द मार्क्स होतील, मानवेंद्रनाथ रॉयही होतील
आपले शब्द लोहिया होतील ज्योतिबाही होतील
आपले शब्द चार्वाक होतील पाब्लो नेरूदा होतील
आपले शब्द गोर्की, मायकॉव्हस्की होतील आणि केशवसुतही होतील
आपले शब्द बुद्ध होतील आणि युगप्रवर्तक युद्धही होतील
आपले शब्द सुरुंग होतील मनूच्या अवलादीसाठी तुरुंग होतील
आपले शब्द इथल्या कोटयावधी डोळयांच्या वाळवंटात नाचणारी
विद्रोही चंद्रभागा होतील.
आणि लक्षात ठेवा पावसाळी मोसमांनो
की त्यावेळीही आपले शब्द आपले होतील
आपले सर्व आपले होतील

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो—
प्रतिज्ञा करा की या वाळवंटांना आलेले पूर
आता ओसरणार नाहीत
ही आलेली भरती आता अपेशी मोर्चासारखी निष्फळ पांगणार नाही
पावसाळी मोसमांनो, डोळयात त्रिकाळाच्या माळा
वागविणाऱ्या उरातील लाव्हा
विझून मेल्याचे तुम्ही पाहिले आहे
आभाळभर ताणलेले विराट क्रांतीधनुष्य
इथल्या कागदी पुरोगाम्यांच्या अधःपतनासारखे कसे कोसळून पडते
हेहि तुम्हाला माहीत आहे.
तुम्हाला माहीत आहे शब्दांना कशी खिंडारे पडतात
तुम्हाला माहीत आहे, प्रतिज्ञा कशा
घर निघतात अर्थराजांचे
तुम्हाला माहीत आहे घोषणा कशा बेईमान होतात
तुम्हाला माहीत आहे इथला अपना बझार
जिथे चालते सर्वंकष खरेदी-विक्री
आणि वेळोवेळी गिरकी घेतो इतिहास
आणि मूळपदावर येवून करतो सुरू तेच आख्यान
म्हणून म्हणतो पावसाळी मोसमांनो,
आणखी थोडा वेळ ऊन खाऊ

आणखी थोडा वेळ विचार जुळवू
आणखी थोडा वेळ मागोवा घेऊ
आणखी थोडा वेळ अदमास घेऊ

क्रांतीसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो
आपण आपल्याही शब्दांची अग्निपरीक्षा घेऊन पाहू—
आपण आपल्याही ईमानदारीची निर्दयपरीक्षा घेऊन पाहू
आपण आपल्याही मनगटांची अग्निपरीक्षा घेऊन पाहू
आभाळातून पडत नसतात उजेडाची सार्वभौम युगे
आपण आपल्यालाही जरा तावून सुलाखून घेऊ !

●

## येथून पुढे

येथून पुढे मी सूर्यकुलांची लागवड करणार आहे
आणि तुमच्या निदलेल्या ओठातून
ज्वालांचे जळते पिक घेणार आहे.
पिक नासवणारे मधले मधले मेंढ प्रथम काढून टाकणार आहे.
शेकडो वर्षांची पडीत जमीन ही
आता कुठे तिच्या नजरेत स्वप्ने रांगू लागली आहेत.
इथेच मी तुमच्या महाकाव्यांची बागाईत करणार आहे
आणि उद्याच्या क्रांतीला बांधून आणणाऱ्या
युगंधर विवेकाचे खतपाणी देणार आहे
राखण करील या पिकाची माझी कविता या चोरांपासून, हरामखोरांपासून
रोग जाऊ देणार नाही फुलोरावर
आणि दगड हाणून वाचवीन पाखरांपासून
चीड माझी अंगार आहे कीड पडू देणार नाही
धुनी लावून माझे शब्दही रात्र जागवितील,
आणि मीहि बेसावध असणार नाही.
डवरीन दुंडीन तनकट सारे माल केंडू देणार नाही
जागोजागी मोळच्या बांधीन आता मी
ह्या उत्सव कुणाला लुटू देणार नाही.

●

उत्थानगुंफा : बासष्ट

# या भूमिवरती

या भूमिवरती गहिवरतो हा माथा
हुंबरते काळीज इथून येताजाता
पायामध्ये आम्ही बांधिली प्यार तुझी वादळे
अमुच्यासाठी दिशा घेऊनी गगन उभे मोकळे
तुझी आठवण पसरून देते उजेड आम्हापुढे
काळोखाला मग्रूर इथल्या अनंत जाती तडे
खचतो आम्ही कधी आणखी कोसळतो धडधडा
आणि उचलतो पुन्हा उफाळून धगधगणारा विडा
जीर्णत्वाचे बुरुज घातक कोसळवू धडधडा
तरुण सूर्यांचे काफिले अम्हीच पेटलो आता
या भूमिवरती गहिवरतो हा माथा
हुंबरते काळीज इथून येता जाता

शब्दांनी आमुच्या घेतला नव्या दिशांनी पेट
अन् गळयात अमुच्या सजले क्रांतीपीठ
प्रश्नांनी ओथंबून येती लक्ष इथे आभाळे
इथेच येती पाऊस होऊन भक्तिभारले डोळे
परंतु अजूनी जळती गावे कुठे चांदण्या लुटल्या जाती
कधी आणखी मनामनातून जळते अमुच्या दुबळी माती
आम्ही परंतु आज निघालो वणव्यावरती होऊन स्वार
हाती या आसूड विजांचे आणिक डोळाभर अंगार
लाचारी अज्ञान दैन्य अन् भीषण अस्पृश्यता
उफाळलेले सागर आम्ही मिटवू ही रुग्णता
प्रतिगाम्यांचे किल्ले उडवू उडवू जुलमी शोषक हात
यंगर्जना करिते क्रांती मनात अमुच्या आता
या भूमिवरती गहिवरतो हा माथा
हुंबरते काळीज इथून येता जाता.

# मला पाहून आता

मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायावर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे
चार्वाक माझ्या धगधगत्या घराण्याचे मूळ पुरुष आहेत
मक्खली गोशाल अजित केशकंबली आणि गौतम बुद्ध
ही खवळलेली वादळे माझे अभिवादनीय आजोबा आहेत
फुले आणि मार्क्स यांनी आशीर्वादाचे हात विश्वासून
माझ्या भाळावरच पेरले आहेत
आगरकर आणि मानवेंद्रनाथ रॉय यांनी
माझ्या मेंदूत विजांची झूंज मांडली आहे
आणि केशवसुतांनीच खुद्द तुतारी माझ्या हातात दिली आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायावर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे

इंद्र आणि शंकराचार्यांचे केव्हाच माफीसाठी विनंती अर्ज आले आहेत
ज्ञानोबापासून तुकोबापर्यंतच्या सर्व संतांनी
मला भेटून आपले अपराध कबूल केले आहेत
आणि मला नरकात पाठविणाऱ्या आपल्या शब्दांना
त्यांनी केव्हाच फाशी दिले आहे
अनंतफंदी नि रामजोशी म्हणाले ती मशाल दूर ठेवा
आम्हाला फार भीति वाटते
मोरोपंत आणि श्रीधर दोघेही भयभीत म्हणाले
तुमच्या डोळ्यातल्या वणव्याने आमचे हृदय फाटते
मला पाहून कित्येकांचे असे फार फार हाल झाले
पुराणातले देव सारे भारताबाहेर पळून गेले
शंबुकाचे मुंडके हाती घेऊन मी भयकर गर्जना केली
आणि आभाळाची छाती तेव्हा जरा धडधडा वाजू लागली

एकलव्याच्या अंगठ्यापासून मी एक वादळ हाती घेतले
आणि कर्णाच्या काळजाच्या जळत्या वनात गुन्हेगारांना मी चॅलेंज दिले
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला मी प्रलयंकारी सूर्य आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायांवर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे

माझ्या डोळ्यात फुले मार्क्स आणि गळ्यात आंबेडकर होता
मस्तकावरच्या तटतटत्या शिरात बुद्ध आणि चार्वाक होता
शब्दात ज्वाळांच्या रांगोळ्या होत्या
आवेशात आगरकर आणि करात क्रांतीचा आसूड होता
मी म्हटले ही कयामतीची घडी आहे
अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या पाखंड्यांनो
तुम्हाला घेरून माझी सुरुंगांची फौज खडी आहे
मी म्हटले आता मी थांबणार नाही
अध्यात्माला फक्तच मी तुरुंगात डांबणार नाही
मी म्हटले आता मी थकणार नाही
आणि वणवा लागलेले हात आता सागरात फेकणार नाही
युगांच्यापासून मी फाटलो आहे
आणि आज मी अपरंपार पेटलो आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायांवर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला मी प्रलयंकारी सूर्य आहे

मी परमात्म्यावर आंबेडकर रोखून विचारले
सांग आता सांग खरे पृथ्वी निर्माण तू केलीस
वर्ण आणि जाती आणि कर्मविपाक तू केलेस
उत्थानगुंफेवर हात ठेवून शपथ घेऊन सांग
त्याच्याभोवती उभी केली मी प्रश्नांच्या पलित्यांची रांग
परमात्म्याला घाम आला त्याची फरार झाली वाणी
ततपप करू लागला आला माझ्या लोटांगणी
तो म्हणाला त्यांनीच मला स्वार्थासाठी निर्माण केले

हवे होते त्यांना ते ते माझ्या मुखात कोंबून दिले
शपथ घेतो माफ कर विसर आता झाले गेले
कर्मविपाक आणि वर्ण मी नाहीत निर्माण केले
मी म्हटले खबरदार माझ्याशी, माझ्या विद्रोही कवितेशी गाठ आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायांवर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे

●

होऊनी विद्रोह जळता मारितो तुम्हास हाका
खड्गावरी तुमच्या करातील लिहीन क्रांतीच्या कविता
तुफान झालो आज मी जरा साथ द्या
हात करतो मी पुढे तुम्ही हात द्या
सूर्य झालो दोस्तहो तुम्ही कंठ द्या
आग झालो आज मी आगाग झालो
ज्वालामुखीला ओठी तुमच्या वाट द्या

मी असा बेभानुनी बेफाट झालो
शब्दामध्ये तुमच्या मला आकाश द्या
मी असा युद्धात घेईन झोकुनी
विजय आलो घेऊनी तर टाळी द्या
मोडले इमान तर मज माती द्या
आलो ढगाळून दारी तर मज नाती द्या
आलो जरी रक्ताळूनी तर कूस द्या
आलो जरी कामा तिथे तर मांडी द्या
दोन माझ्या आसवे द्या सोबतीला
तुमचाच मी होतो कुणी तरी एवढा विश्वास द्या

# चार्वाक

सुवर्णमुकुटधारी शोषकांच्या जुलुमांच्या राती...
तुम्ही आम्हा दलितांचे पहिले सरसेनापती
तुमच्या विद्रोहाच्या रथाचे चाक
ईश्वरशाहीच्या भूमिने कृष्णकपटाने गिळिले
आणि तुमचे सरण तिच्या ग्रंथाग्रंथातून तेव्हापासून जळले
पण यापुढे तुमची जयंती आणि पुण्यतीथिही आम्ही साजरी करणार आहोत.
चार्वाक , तुमचा पराभव झाला
आणि आमच्या विजयांच्या गर्भहत्या इतिहासभर चित्कारल्या
तिथूनच आमच्या शब्दांच्याही वाटा रानोमाळ झाल्या
आणि उपासमार तनामनाची निर्दय तुरुंगभर झाली
रक्ताच्या पावसांत तुमची पडझड झाली
तुम्ही उध्वस्तून गेला
सत्याच्या यातनानी तुम्ही सुखीही झाला
आणि येणारा प्रत्येकच दिवस आमच्या आयुष्यांवर नरक ओतीत राहिला
तुमच्या हातातून वाचून पळालेला परमेश्वर
पुढे पुढे फारच माजला
आणि त्याने तेव्हा जारी केलेली आणिबाणी
अजूनही संपत नाही
चार्वाक –, लक्षलक्ष बेलछींची शपथ
आमची माथी आज भडकली आहेत
चार्वाक..., तुम्ही त्याकाळचे विद्रोही. आमचे आदिविद्रोही
आम्ही आज निघालो आहोत
चार्वाक .., या कवीच्या प्रतिभेचा माथा
तुम्ही उभारलेल्या मूलभूत आंदोलनापुढे नम्र आहे
ही आमच्या–माझ्या नम्र हृदयाची
तुम्हाला आवडेल अशी शायरी
चार्वाक..., ही सर्व संस्कृतीच्या नावाने लिहिलेली "जेल डायरी"

●

उत्थानगुंफा : अडुसष्ट

इंद्रकुलाने दिलेल्या दुषणांचे वलय दिसले तुझ्याभोवती
आणि माणसांच्या चिंतका तुझ्या मनाला जात नव्हती
एवढ्यासाठीही तुझ्या शब्दातला जाळ घेतला आहे मी हाती
सिद्धार्था, तू कोणाचा पोरगा होतास
हा सर्वपूज्य प्रश्न तू तुझ्यापुरता निरर्थक करुन टाकलास
पण विरोधाच्या वादळवाऱ्यात क्रांतीचा अवघड गर्भ
तुझ्या उच्चारांनी उरीपोटी वागवला
म्हणून त्या उच्चारांनी दलितांच्या दुःखाची माउली होण्याचे युगप्रवर्तन सिद्ध केले
तू विलक्षण होतास सिद्धार्था !
कर्मकांडाच्या हुकूमशाहीत तू आऊटसायडर होऊन वादळलास
तू उभारलेस महायुद्ध मूर्तिभंजनाचे
आणि फाशीच्या तक्तावरून मरणासन्न उजेडाला सोडवलेस
पण तुझी पाठ फिरल्यावर या पोरक्या उजेडाने आत्महत्या केली सिद्धार्था
तेव्हापासून त्याच्या राखेतून सूर्यमाला सरसरुन झेपावण्याआधी
कालपर्यंत इथे अंधाराची आराधना
आणि माणसांचे श्वापदीकरण करण्याचा कारखाना अनिर्बंध सुरू होता
तुझ्या रक्तानेच पुढील शतकांनी तुझ्या पराभवाची पाने लिहिलीत
सिद्धार्था, ते तुझे रक्त माझ्या आयुष्याचा आकांत झाले आहे
सिद्धार्था, ऐहिक यातनांच्या यात्रांचे नवे संदर्भ तू उद्‌घाटीत केलेस
तू कर्मविपाकाला अथांग अस्वस्थ केलेस
आणि तुला पाखंडी ठरवणाऱ्या त्रिल'क्षणांनी'
तुला माझ्या नास्तिक अहंतेशी बांधून टाकले
आत्मा आणि परमात्मा या निखळच दोन ध्रुवांच्या अर्काट बुवाबाजीचे मुंडके
तुझ्या पायाजवळ थरथरत येवून पडले होते,
जेव्हा तू महान म्हणून माणसावर
आणि प्रस्तुत म्हणून त्याच्या मांडणीवर प्रतिभेचे बोट ठेवले होते
पण सिद्धार्था, माझ्या मनाच्या व्याकुळतेला जिवलग वाटणाऱ्या
अत्यंत दुःखी माणसांपैकी तू एक आहेस
तू पोलादाच्या काळजाने बोलत होतास
आणि तुझ्या आतड्याचा असल्याप्रमाणे शतकांचे पडदे सारुन

मला विद्रोहाचे दूध पाजत होतास
अंधाराच्या गळ्याभोवती माझे हात आवळले जावेत
असे योजनांचे आराखडे आखीत होतास
माझ्या वाणीत ही तुझ्या तेजाची वर्दळ आहे
माझ्या जिभेवर तुझ्या मनातील ही पेटती नक्षत्रे आहेत सिद्धार्था !
सिद्धार्था, अस्वस्थतेने अंतापर्यंत तुझ्या प्रज्ञेच्या चिंध्या झालेल्या मी पाहिल्या आहेत
तुला दलितांच्या खांडववनात मुसळधार कोसळतांना पाहिले आहे
तुझी अगतिक माणुसकी ठिणग्यांच्या आसवांनी एकाकी रडताना मी पाहिली आहे
न्यायाच्या उरावर उभारलेल्या जुलुमी सस्थानावर
तुटून पडताना तुला पाहिले आहे
सत्य सांगण्याचा तू केलेला भयंकर अपराध
मानचिन्ह म्हणून भाळावर मिरवित राहीन सिद्धार्था मी
सिद्धार्था, मीही एक अपराध करु
लहान तोंडी मोठा घास घेऊ ?
सिद्धार्था, अरे भल्या माणसा सत्य सांगण्याचाच अपराध करायचा होता
तर या मुलुखातील अंधाराच्या विजययात्रेत कशाला जन्म घेतलास
अरे इथल्या व्यवस्थेने सत्याची जबरदस्त धास्ती घेतली आहे
तुला इथे जिवंत जाळले असते तरी मला दु:ख झाले नसते सिद्धार्था
पण माणसांच्या उत्थानाचा तुझा व्यूह कुरुपवण्यासाठी
साऱ्या शतकांनी त्यावर तेजाब उधळलेले मी पाहिले आहे
आणि सिद्धार्था, माझ्या प्रतिभेच्या समग्र दिशा
या यातनांनी काळवंडून गेल्या आहेत
संतापाने चौखूर उधळलेल्या आहेत.
अरे तुझ्या आयुष्याने तेव्हाही बेलछीच्या अमानुष हत्याकांडाच्या वार्ता ऐकल्या असतील
तुझ्याहि वर्तमानात शिरसगांव आणि किलावेनमनी चित्कारले असेल
धाकली आणि ब्राह्मणगांव आक्रंदले असेल
आणि तुला हृदय असह्य झाले असेल
सिद्धार्था, आजच्या लक्षलक्ष बेलछींनी धाकलींनी माझ्याही मस्तकाच्या चिंध्या
केल्या आहेत. आणि मलाहि हृदय असह्य झालेले आहे
सिद्धार्था, शोषितांच्या दु:खाच्या अंतापर्यंत
सुखाला स्पर्शही न करण्याची प्रतिज्ञा करणारा तू
माणुसकीच्या माथी मुकुट झाला आहेस
त्यांच्यावर कोसळणाऱ्या दु:खासाठी स्वत:चे ऊर पुढे करणारा

माऊलीच्या आर्त मनाचा माझा प्यारा विवेकवादी आहेस तू
पण माफ कर सिद्धार्था
तुला भगवान ही शिवी मी देऊ शकत नाही
माफ कर मी पाखंडी आहे आणि तुझी पूजा करु शकत नाही
माफ कर तुला 'महात्मा' हे कूप्रसिद्ध दूषणही देऊ शकत नाही
माफ कर सिद्धार्था, की तुझ्या मुखमंडलावरील चिरशांती
मला भाविकांची भाकडकथा वाटते
माफ कर माझ्या डोळ्यातील जखमांना तू निरंतर बेचैन
आणि धगधगताना दिसतोस
माफ कर सिद्धार्था तुझ्या शत्रूंनी तुला दिलेल्या
पाखंडी या विरुद्धामुळे तू मला अधिकच जवळचा वाटतोस
तू अनात्मवादी म्हणून माझा सोबती वाटतोस
निरीश्वरवादी म्हणूनच माझा साथी वाटतोस
माझ्या सोबत येऊ शकणारा वाटतोस
तुला माहीत नाही सिद्धार्था
तुझ्या नावाने बोटे मोडित नंतर अनेक अंधारयुगे आली
अजूनही या मुलुखातील मनु तुझ्या नावाने गरळ ओकतो
तिरस्कार थुंकतो
तुझ्या विचारांचे काळीज नाकारुन तुला स्वीकारणारे
आणि तुला नाकारणारे अलिकडे खूपच वाढले आहेत
पण हे तू पाहू शकला असतास
तर माझी खात्री आहे सिद्धार्था
"मी बुद्धिष्ट नाही" असेच व्याकूळ वैतागाने
उरी फुटून तू म्हणाला असतास
कदाचित ठिणग्यांच्या आसवांनी रडला असतास
कदाचित
किंवा या तुझ्या विटंबनेखातर
स्वतःच्याच पायाखाली निर्दय सुरुंग झाला असतास
किंवा
कदाचित "बुद्ध" असणे भयंकर नामंजूर करुन
खवळल्या सागरासारखा क्रुद्ध क्रुद्ध झाला असतास
किंवा कदाचित भयंकर निर्णयशाली "युद्ध युद्ध" झाला असतास

# ज्योतिबा गोविंदराव फुले

तुझ्या थडग्यावरील विझलेली ध्वजा चेतवून
आता आम्ही आमच्या खांद्यावर घेतली आहे
ज्योतिबा, आमच्या उत्थानाच्या इतिहासालाही हृदय आहे
आणि तुझ्या आठवणींच्या आशयावर ते आसवांनी ओथंबून आले आहे
काळजांना आग लागल्याशिवाय हात तरवारी होत नसतात,
आणि पायाखालील जमीन पेटल्याशिवाय
मस्तकात नव्या जमिनीचे पीळ उफाळून येत नसतात।
आम्हाला माहीत आहे इथल्या आभाळाहून तुझे काळीज मोठे होते
आणि प्रकाशलास त्या काळाहून
तुझे हृदय मोठे होते हेहि आम्हाला माहीत आहे
तुझ्या वाणीवर क्रांती फिदा झाली होती
आणि तुझ्या करणीने स्थिती द्विधा झाली होती
तू बांधलीस कबर इंद्रप्रस्थाची विद्रोही प्रतिभेची शर्थ करून
आणि इतिहासाचे संधि-साधू सांधे आलास खिळखिळे करून
वर्तमानाची क्षितिजे परंपरांच्या बंदिवासातून सोडवित
तू जायबंदी केलीस भूतकाळातील शोषणाची हेड आफिसेस
आमच्या क्रॉनिक अंधारावर तुटून पडलेला तू पुन्हा एक "ज्योतिबा"
ज्योतिबा, तुझ्याही पराक्रमाच्या विजा आमच्या मनगटात सळसळत आहेत.

●

# कार्ल मार्क्स

मार्क्स, आम्ही तुला पाहिले नाही.
पण तुझ्या युगभेदक नजरेतून आम्हीही सुटलो नाही.
कारण तुझ्या शब्दांनी मनू अर्धमेला झाला
आणि तुझ्या शब्दांनी तुझे चित्र आम्हास दिले
तेव्हा तू आमच्या मनाचा रहिवासी झालास
आम्ही कधी पेटलो. कधी फाटलो.
कधी ओघळलो कधी भेगाळलो
अनंत काळ आम्ही चिता झालो आणि आता चित्ते झालो
मार्क्स, काय करावे मार्क्स आम्ही, काय करावे
अर्धे आयुष्य पाठीवर घेवून तू हद्दपारी भोगलीस
तुझ्या देशाने तुला बाहेर हाकलले
आणि इथे आमचा देश आम्हासाठी तुरुंग झाला.आमच्याच देशात आम्ही 'बाह्य' झालो
आम्हीही हद्दपार झालो असतो तर धन्य झालो असतो मार्क्स !
पण ते झाले नाही, आमचे जन्मच जीवनातून हद्दपार झाले
तू जगू शकलास मार्क्स पण आम्ही मरुही शकलो नाही, वाचूही शकलो नाही
असू दे मार्क्स आता मागे फार वेळ पाह्यचे नाही
तुलाही ते आवडायचे नाही

—मार्क्स तुझ्या मॅनिफेस्टोच्या मशाली विझवूनच
या देशात दु:ख धांडोळण्याचे एक आधळे नाटक रंगले
आता आमच्या दिशा तुरुंगाच्या भिंती फोडून आमच्या मनगटात उभ्या आहेत
आमची आयुष्यें आता तुझ्या कल्पनेतील मशाली झाली आहेत
मार्क्स, तू असतास तर आम्हा तेज:कणांना तू हृदयाशी कवटाळले असतेस
आम्हाला माहित आहे
'धर्म ही अफूची गोळी आहे' या तुझ्या प्रहाराने
आमच्या जन्मांच्या भाळावरील शापांचे चिरंतन चरकले
आणि कर्मविपाकाच्या बेडचा चळचळा कापल्या, इतक्या दुरुनही.
तुझ्या सांगण्यानुसार आम्ही प्रत्येकच गोष्टीविषयी शंका घेऊ लागलो
खूपच चोखंदळ झालो आणि आम्हाला लाचार, दलित करणारा

परमात्मा आमच्यापुढे 'मन' खाली घालून उभा राहिला
असू दे मार्क्स हे !
आता मागे फार वेळ पाहयचे नाही, तुलाही ते आवडायचे नाही

पण मार्क्स आता सुरु व्हायला पाहिजे. दिशांनी पेट घ्यायला पाहिजे
मार्क्स तुझ्या हृदयाचे वणवे
या कवितांच्या हाती मी दिले आहेत
तू हवा होतास मार्क्स आज
हा जन्मजात नरकाचा उकळता निषेधनामा
हा पशूंच्या नावाने मांडलेला युद्धनामा
हा अस्पृश्यांसकट सर्व दलित जनतेचा जाहीरनामा
वाचायला तू हवा होतास
मार्क्स तू हवा होतास
तुझ्या विजयाच्या या चाहुलखुणांनीही
तू निखाऱ्या सारखा फुलला असतास
आणि वादळासारखा आम्हाला सोबत असतास
मार्क्स, आज तू हवा होतास
●

उत्थानगुंफा : चौऱ्याहत्तर

# केशवसुत

धगधगत्या वणव्यासारखा
तू भांडलास इथल्या काळोखाशी
हाती येईल ते हाणून
त्याच्या मग्रुरीचा मेरु तू कासाविस केला
तू उजेडाच्या धरणाच्या भिंती फोडल्यास
अरे ईश्वराचे थोबाड खेटराने रंगवणारा तू
माणसासाठी तुझा शब्द माय झाला
आणि मनामनातील मनूसाठी
तू संतप्त पोलादाचा पाय झाला
तू तडकवलेस तक्त परंपरांचे
आणि प्रथापुत्रांच्या लाथेखालील प्रजेसांठी
एकाकी जळत प्रतिभा जाळत राहिलास
त्या तुझ्या विद्रोहाच्या तळ्यावर
आमच्या नतमस्तकांची नम्रता नोंदवून
तुझ्या स्वप्नांचे शिल्प आम्ही कोरू लागलो आहोत
केशवसुता, आम्ही ज्वालामुखी झालो आहोत
इथल्या काळोखाशी
आम्ही तुझ्या दाहकतेने भांडू लागलो आहोत
●

# भीमराव रामजी आंबेडकर

आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस
तो सुईदोरा कुठे ठेवलास
गांजलेल्या जन्मांना नरकातून ओढून पोटाशी घेतले
ती माऊलीची माया तू कुणाजवळ ठेवलीस
सगळ्या मापदंडांनी चरणरज व्हावे
असा तुझा बुलंद आवाज तू कुठे ठेवलास
अरे मी ज्याची 'भक्ती' करावी, शक्ती करावी
ते तुझे इमान तू कुठे ठेवलेस
आणि मला समजून घेऊ शकेल
ते तुझे सागराएवढे शहाणपण तू कुठे ठेवलेस
ज्यांच्यावर विनम्र होऊन मी ललाट ठेवावे
ते तुझ्या चरणांचे युद्धतीर्थ तू कुठे ठेवलेस
असत्याला ढोंगाला लाथांनी तुडवणारे
तुझे ते कठोर निर्णयशास्त्र कुठे ठेवलेस
अरे या मनुच्या मुलांनाही माणूस होणे भागच पडेल
अशी तुझी ती जलाल घटना तू कुठे ठेवलीस
परमेश्वराच्या प्रेतावर बसून कर्मविपाकाला माती दिलीस
ती अनेकांना हैराण करणारी युगंधर जिद्द तू कुठे ठेवलीस
अरे या बेशरम अत्याचाऱ्यांना फाडताना आम्ही विजयी होऊत
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस, कुठे ठेवलेस ?

●

# हाक

कधी नव्हे असे आज आभाळ भरून आले आहे
आणि स्मशान पेटेस्तोवर इथे विद्रोहाचा पाऊस कोसळणार आहे
तुमच्या मनगटाचा गर्व माझ्या उरभर दाटून आला आहे
ही कविता माझी आहे आणि माझ्या-तुमच्यातील सूर्यायणाची आहे
या निकाली पर्वणीला निष्पर्ण होऊन कसे चालेल दोस्तहो
या कवितेतून येणारी हाक शेकोटयांच्या पेटत्या बनाची आहे

# परिशिष्टातील बारा कविता

१

माझे आसमंत कोरीत मी मोहोरतो आहे
माझे हृदय विकत मागणाऱ्या बाजाराला उद्देशून मी जहरतो आहे.
कुठल्याही बदल्यात मी माझ्या आयुष्याकडे पाठ फिरविणे नाकारले आहे
मी शब्दांशी सौदा केला नाही शब्दांनीच मला पोटाशी घेतले आहे
आणि उरीपोटी वागवले आहे
माझ्या काळजाभोवतीच्या माणसांच्या गर्दिला धार लावताना
मलाही मी तीक्ष्ण होताना पाहिले आहे

२

मोर लुचलेला पिसारा शोधतो पाय फसलेल्या चिखलभर
एक पक्षी साक्षी मागत पंखहीन, रडतो काळोखभर
असे कसे माहेर बाई हे माय नाही आणि कुठे बापही नाही
असे कसे कोडेही म्हणावे हे ज्याला धरतीही नाही आणि आकाशही नाही

३

हे मोसम फुलांचे रंग आणि पाकळ्यांचे आकार बदलून घेतात बेमालूम
पण तेवढ्याने गर्भार अक्षरांचा आशय बदलत नाही
मी पेश केले आहे माझे हंबरणारे काळीज आणि माथे भडकलेले वादळ
माझ्या पद्धतीने माझ्या अक्षरांमध्ये. अनपेक्षित नक्षत्रे भोवती उतरली
अनपेक्षितच आयुष्याचे अंतराळ पावसाळून आले
आणि माझे उत्कट रक्त बाहूंची कमान उभारून
स्वागतासाठी उफाळून असे पुढे आले

४

माझी कविता
उपाशी जन्मांसाठी उपोषणाला बसली आहे
आणि बसली आहेत
तिच्या उशापायथ्याशी डोळ्यांची वाळवंटे
तिच्या उरापोटात उकळणारे
नव्या अलंकारांचे लक्षलक्ष आकार
आणि रक्ताने आंघोळ करणारा बेबंद अंधार
आता भोक पडलेल्या नावेसारखा
बेचैन झाला आहे

५

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली. माथी हरपली.
नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
-कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही

६

अंगणामध्ये दिवस उभा
शिवेवरती क्रांती
मेंदू कापून फेकला तरी
दुर्लभ आता शांती
टाळ विटाळ तोड फोड
गल्लीबोळ उधाण उधाण
या बाजूने उठाव होईल
पेटत येईल रान रान

७

क्षितिज मला शोधित आले
पाणी गाणी गात आले
माझ्या वार्तांनीही
बाभूळबन स्वत:च्याच काटयांनी फाटत राहिले
त्या तिथल्या अंधारवाडीत
एक पहाड आपली पिले पोटाशी घेऊन बसला आहे
रंग वितळत राहिले
उजाड पात्रे आटलेल्या स्वप्नांच्या नावाने
बेफाम आकांत मांडित राहिले
पंख पसरवून शब्द
एक आभाळ चोचीत घेऊन आले
दुपार भयभीत परत फिरली घरी जायला
आणि नक्षत्रसंकेतांनी अंतराळ
माझ्या कवितेतील पहाटेशी बोलत राहिले

८

माझी पकड झिडकारून कधी मन मोकळे होऊन उडून गेले
कधी मनच मोडून पडले पावलापुढे तेव्हा दबा धरून बसलेल्या अंधाराने
माझे तान्हे घर चोरून नेले. ही पायातील युद्धस्वी पैंजणे आजची आहेत
त्याआधी बेडयांनाही पैंजण समजून माझे आयुष्य
सरावानेच दु:खासोबत नाचले आहे
माझ्या भूतकाळासारखेच एक जालीम वीष मी आज नव्यानेच बांधलेल्या
शेजारच्या स्टोअरमध्ये पाहिले आहे आणि कालच्या कभिन्न आठवणींनी
माझ्या डोळयातील वर्तमानाचे बांधकाम आपादमस्तक अंधारून आले आहे
भांवावून गेले आहे

९

नक्कीच तुरुंगाच्या भिंती रक्तबंबाळ झाल्या असतील
नक्कीच कैद्यांच्या मुठींचे पोलाद संतापले असेल
ताठरले असतील श्वास. हादरला असेल मंदिरांचा मोहल्ला
नक्कीच तुरुंग जीव घेऊन पळू लागला असेल
रेगिस्थान नक्कीच वज्रफुलांचे झाड झाले असेल
सरणाच्या राखेला मजबूत अंकूर फुटले असतील. धूळ तापू-संतापू लागली असेल
माझे अस्तित्वही आज ज्वाळांची जुळणी झाले आहे
नक्कीच तुरुंगाच्या भिंती रक्तबंबाळ झाल्या असतील.

१०

रक्तमाखल्या या रस्त्याने जाववेल तेवढे जा
पण त्या रक्ताची चौकशी करू नकोस
वागू नकोस पायरी सोडून
तू स्वतंत्र आहेस
तुला उपलब्ध असलेला नरक खाता येईल तेवढा खा
जीव देण्याची दगदग—हा मूर्खपणा करू नकोस
तू जन्मायच्या आधीच तो त्यांनी घेऊन टाकला
आहे सदय होऊन. हे शहाणपण अंगी बाणव
अथांगाच्या नावाने अप्लिकेशन कर
आणि सवयीने मंदिराच्या आज्ञेत संपून जा
पायरीवरच खेळ मांड आपल्या जातीच्या
याच ध्येयवादाने तू ईश्वरप्रिय होशील
मोक्षाचा धन्य धनी होशील
एवढेही केलेस तरी माझा शत्रू म्हणून
तू प्रसिद्ध होशील
सर्वांचाच लाडका होशील. थू.

११

सवयीलाच वंदन करीत राहावे
अन्यथा पागल होणे टळावे असे इथे काय आहे
येकेका ऋतूचे रूप पाहिले येथील रस्त्यांच्या
पाहून अपरंपार ओहोटून जाऊ नये असे इथे काय आहे
एकेक लीळा पाहिली वस्तीवस्तीत इथेतिथे
पायाखालची जमीन सरकून जाऊ नये असे काय आहे
. . .
इतिहासाच्या पालखीत बसूनच वर्तमान आमच्यावर तेजाब झोकतो आहे
शांत निश्चित बसून राहावे असे इथे काय आहे
वाजत गाजत अंधार फिरतो मनमानी करतो
प्रकाशाची चारदोन बदनाम बेटे सोडून जाळू नये असे इथे काय आहे

१२

आहे जीव तोवर पाखडीत जाणारच आहे
शेवटचा दिस गोड होवो न होवो
आता बांधलेच आहे घर या निषिद्ध मैदानात
आतडयांचे गहिवर कुणी घेऊन येवो न येवो
तुम्ही किनाऱ्यावरचे कुमार नजरांचे नजराणे घेत राहा
उधळलो आहे मी प्रवाहात आता, परत भेट होवो न होवो
माझी सगळी सामर्थ्ये घेऊन माझ्या पद्धतीने
मी शोषणाच्या सोहळयाचे नाक घेतले आहे
अंधारातून चाललो आहे मी श्वास पेटवून
माझ्या आयुष्याला हवी, ती पहाट येवो न येवो
तुम्ही अंधाराला एक्स्टेंशन देऊ शकता. थोर आहात
तुम्ही उझेड जाळू शकता नवजात, घनघोर आहात
मी मला तुमच्यात संपवू इच्छित नाही कधी
असे एकाकी पेटणे, पेटवणे मुक्रर केल्यावर
वणवा बुडवायला समुद्र मिळो न मिळो
आहे जीव तोवर पाखडीत जाणारच आहे
शेवटचा दिस गोड होवो न होवो
●

# अनुक्रमानुसार कविता, निर्मिती काळ आणि स्थळे

१) प्रारंभ ॥ २७ मार्च ६५ ॥ औरंगाबाद
२) यापुढे ॥ १८ डिसें. ६६ ॥ औरंगाबाद
३) एक दुःखयात्रा ॥ १३ मार्च ६८ ॥ पैठण
४) खवळलेला तांबडा समुद्र ॥ १३ मार्च ६८ ॥ पैठण
५) श्रद्धांजली ॥ १३ मार्च ॥ पैठण
६) क्रांत्युत्सवासाठी ॥ १४ मार्च ६८ ॥ पैठण
७) आगच झालो आहे ॥ १४ मार्च ६८ ॥ पैठण
८) भीषणभूत ॥ १४ मार्च ६८ ॥ पैठण
९) मी पाहतो ॥ १४ मार्च ६८ ॥ पैठण
१०) माझी प्रेतयात्रा ॥ १४ मार्च ६८ ॥ पैठण
११) अटळ स्फोट ॥ १५ मार्च ६८ ॥ पैठण
१२) वैरी ॥ १९ जाने. ६९ ॥ पैठण
१३) उत्थानासाठी ॥ ३० एप्रिल ६९ ॥ पैठण
१४) नाकारावे लागतील ॥ २० जाने. ७१ ॥ नागपूर
१५) काढिला खणुनि काळोख ॥ ७ जाने. ७१ ॥ नागपूर
१६) विद्रोहाची नौबत ॥ ३ फेब्रु. ७१ ॥ नागपूर
१७) पुन्हा एकदा ॥ १० फेब्रु. ७१ ॥ नागपूर
१८) बांगला देश ॥ १३ डिसें. ७१ ॥ नागपूर
१९) फसवणूक ॥ १६ डिसें. ७१ ॥ नागपूर
२०) निषेधनामा ॥ १७ जाने. ७२ ॥ नागपूर
२१) "आत्म"र्थी प्रेतांसंबंधी ॥ १२ मे ७२ ॥ नागपूर
२२) माणसांसाठी आरती ॥ २५ मार्च ७२ ॥ नागपूर
२३) निर्वाणीचे पत्र ॥ २७ एप्रिल ७२ ॥ नागपूर
२४) मी इथल्या दिशांच्या ॥ १० जून ७२ ॥ नागपूर
२५) कैसा हा उन्हाळा ॥ १७ ऑ. ७४ ॥ नागपूर
२६) जे जे भूत भेटे ॥ १७ ऑ. ७४ ॥ नागपूर
२७) चोर पुरुषांनो ॥ १७ ऑ. ७४ ॥ नागपूर
२८) नागड्यांनी साऱ्या ॥ १७ ऑ. ७४ ॥ नागपूर
२९) आम्ही झालो गुंफा ॥ १८ ऑ. ७४ ॥ नागपूर
३०) यारे वादळुनी ॥ १८ ऑ. ७४ ॥ नागपूर

REFBK-0022625
REFBK-0022625

ओळख

३१) बेहिशेबी वन्ही ॥ १९ ऑ. ७४ ॥ नागपूर
३२) उगवलो आम्ही ॥ १९ ऑ ७४ ॥ नागपूर
३३) दु:खरात्र ॥ १९ ऑ. ७४ ॥ नागपूर
३४) आम्ही जाळू ॥ १९ ऑ. ७४ ॥ नागपूर
३५) हेचि सांगो वाटे ॥ १९ ऑ. ७४ ॥ नागपूर
३६) काय आठवावे ॥ २० ऑ. ७४ ॥ नागपूर
३७) धाकली ॥ ३० मे ७५ ॥ नागपूर
३८) मी मागितली ॥ १५ सप्टें. ७५ ॥ नागपूर
३९) त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना ॥ १७ सप्टें. ७५ ॥ नागपूर
४०) मोहरून ही विषाची ॥ २१ सप्टें. ७६ ॥ नागपूर
४१) उजेडाच्या प्रार्थना ॥ २२ सप्टें. ७६ ॥ नागपूर
४२) शोधली वेड्यापरी ॥ २३ सप्टें. ७६ ॥ नागपूर
४३) मारुती कांबळे ॥ ३० सप्टें. ७६ ॥ नागपूर
४४) पावसाळी मोसमांनो ॥ १ जाने. ७७ ॥ नागपूर
४५) यापुढे आता मी फक्तच ॥ १ फेब्रु. ७७ ॥ नागपूर
४६) या भूमिवरती ॥ १३ फेब्रु. ७७ ॥ नागपूर
४७) मला पाहून आता ॥ १८ फेब्रु. ७७ ॥ नागपूर
४८) होऊनी विद्रोह ॥ २१ फेब्रु. ७७ ॥ नागपूर
४९) चार्वाक ॥ ३ मार्च ७७ ॥ नागपूर
५०) सिद्धार्थ गौतम बुद्ध ॥ ३ मार्च ७७ ॥ नागपूर
५१) ज्योतिबा गोविंदराव फुले ॥ ३ मार्च ७७ ॥ नागपूर
५२) कार्ल मार्क्स ॥ ५ मार्च ७७ ॥ नागपूर
५३) केशवसुत ॥ ५ मार्च ७७ ॥ नागपूर
५४) भीमराव रामजी आंबेडकर ॥ ५ मार्च ७७ ॥ नागपूर
५५) कधी नव्हे असे ॥ २१ मार्च ७७ ॥ नागपूर
५६) परिशिष्टातील बारा कविता ॥ १४, १५ सप्टें. ७७ ॥ नागपूर

●

आवक २२६२५ २४००

३१) बेहिशेबी वन्ही ।। १९ ऑ. ७४ ।। नागपूर
३२) उगवलो आम्ही ।। १९ ऑ ७४ ।। नागपूर
३३) दु:खरात्र ।। १९ ऑ. ७४ ।। नागपूर
३४) आम्ही जाळू ।। १९ ऑ. ७४ ।। नागपूर
३५) हेचि सांगो वाटे ।। १९ ऑ. ७४ ।। नागपूर
३६) काय आठवावे ।। २० ऑ. ७४ ।। नागपूर
३७) धाकली ।। ३० मे ७५ ।। नागपूर
३८) मी मागितली ।। १५ सप्टें. ७५ ।। नागपूर
३९) त्याच्या आठवणींशीही डोळे भिडवताना ।। १७ सप्टें. ७५ ।। नागपूर
४०) मोहरून ही विषाची ।। २१ सप्टें. ७६ ।। नागपूर
४१) उजेडाच्या प्रार्थना ।। २२ सप्टें. ७६ ।। नागपूर
४२) शोधली वेडयापरी ।। २३ सप्टें. ७६ ।। नागपूर
४३) मारुती कांबळे ।। ३० सप्टें. ७६ ।। नागपूर
४४) पावसाळी मोसमांनो ।। १ जाने. ७७ ।। नागपूर
४५) यापुढे आता मी फक्तच ।। १ फेब्रु. ७७ ।। नागपूर
४६) या भूमिवरती ।। १३ फेब्रु. ७७ ।। नागपूर
४७) मला पाहून आता ।। १८ फेब्रु. ७७ ।। नागपूर
४८) होऊनी विद्रोह ।। २१ फेब्रु. ७७ ।। नागपूर
४९) चार्वाक ।। ३ मार्च ७७ ।। नागपूर
५०) सिद्धार्थ गौतम बुद्ध ।। ३ मार्च ७७ ।। नागपूर
५१) ज्योतिबा गोविंदराव फुले ।। ३ मार्च ७७ ।। नागपूर
५२) कार्ल मार्क्स ।। ५ मार्च ७७ ।। नागपूर
५३) केशवसुत ।। ५ मार्च ७७ ।। नागपूर
५४) भीमराव रामजी आंबेडकर ।। ५ मार्च ७७ ।। नागपूर
५५) कधी नव्हे असे ।। २१ मार्च ७७ ।। नागपूर
५६) परिशिष्टातील बारा कविता ।। १४, १५ सप्टें. ७७ ।। नागपूर

●



प्रा. मनोहर सहा सात वर्षापासून एम्.ए. ला मराठी शिकवितात. कविता लिहिणे हा त्यांच्या आस्तित्वास्थितिने दिलेला शापही भोगतात. त्यांच्या कविता एकाच विशाल, क्रांतीकारी व महान कवितेचा घटकशः पण स्वतंत्र सौंदर्याकृतीरूप आविष्कार. समीक्षकांचे पढियंते होण्यासाठी पाश्चात्यांचे अंधानुकरण, भावानुसरण व भारतीयत्वीकरण करणाऱ्या काव्यकृतीत मनोहरांची कविता बसत नाही. आत्मनिष्ठेचे बुलंद बळ घेऊन समुहोत्यानाशी असलेला आपला रक्तबंध ती साकार करते. रसिकाला अक्षरशः हादरवून सोडते. नव्या व्यवस्थेचा सूर्याविष्कार ही त्यांची दिशानिष्ठा. शत्रूवर्गियांची कलाशास्त्रे हेतुसकट या कवीने शरभेंदी केली आहेत. मराठीत अपूर्वसे धगधगते विचारानुभव, वेग-आवेगाची आसूड दर्शने उलगडतांना रसिकता विद्रोही सौंदर्यानुभव भोगते. मनोहरांची कविता पुरोगामी रसिकतेचे पारणे फेडील. पुरोगामी जीवनजाणिवेच्या कवितेचा पुढचा टप्पा होईल हे निश्चित.

— भाऊ समर्थ